संस्थापक
साने गुरुजी
साप्ताहिक
# साधना
Weekly Sadhana
Date of issue
शनिवार,
३ जुलै २०२१
मूल्य रु.२०
(एकूण पृष्ठे : ४४)

"
प्रश्न : किंवा असे आहे का की, आपले खूप जास्त राजकारणी लोक वृद्ध असतात म्हणून ते भूतकाळाविषयी जास्त बोलतात?
– नाही, तसे काही नाही. तुम्ही पहा, तो आपल्या परंपरेचा भाग आहे. काही देशांमध्ये त्यांचा संपूर्ण भूतकाळ दोनशे वर्षांचा असतो. भारताचा भूतकाळ जर पाच हजार वर्षांचा असेल, तर आपल्या सार्वजनिक चर्चाविश्वात त्या प्रमाणात भूतकाळ वर्चस्व गाजवणारच.

प्रश्न : पण जो समाज पुढे सरकतो आहे, त्याने भूतकाळाच्या चिखलात इतके रुतून बसावे का? कारण भूतकाळात अनेक नकारात्मक घटक असतात.
– नाही, आपण भूतकाळात रुतून बसलेलो नाहीत!

प्रश्न : आणि भूतकाळातील ते नकारात्मक घटक आता पुन्हा उफाळून आलेले दिसतात?
– तुम्ही जर पाच हजार वर्षांचा इतिहास तपशीलवार अभ्यासलात तर तुम्हाला असे आढळेल की, हा देश कोणत्याही विशिष्ट काळात भूतकाळाच्या चिखलात रुतून बसलेला नाही. तसे जर झाले असते तर हा देश कधीच नामशेष झाला असता!

प्रश्न : पण आज आपण जातींच्या विळख्यात अडकलो आहोत, धार्मिक समस्यांमध्ये गुंतून पडलो आहोत, अनेक पूर्वग्रहांमध्ये सापडलो आहोत. मागील दहा वर्षात या देशातील राजकारणाने आपली दिशा हरवली आहे?
–आपल्या राजकारणाची दिशा हरवलेली नाही. विशिष्ट अडथळ्यांवर मात करून आपले राजकारण पुढे आले आहे, तो आपल्या इतिहासाचा भाग आहे. त्यामुळे आपण स्वतःला प्रशिक्षण दिले पाहिजे, त्या इतिहासासह जगण्याचे आणि सर्व प्रकारच्या अडथळ्यांवर मार्ग काढत पुढे जाण्याचे.
"

## नरसिंह राव यांची अद्‌भुत मुलाखत

### शेखर गुप्ता




नव्या युगातील करिअर्सचे एकमेव प्रवेशद्वार!
Basic Computer / Smartphone Skills
Smart Typing Skills
Digital Skills for Daily Life
eCitizenship Skills
21st Century Study Skills
Coding Skills
MS Office Skills
Remote Working Skills
Go Green
Ergonomics
Digital Etiquettes
Cyber Security Skills
MS-CIT
आंतरराष्ट्रीय दर्जाचा परिपूर्ण कंप्यूटर कोर्स
www.mkcl.org/mscit
अस्खलित इंग्रजी बोलण्यासाठी शिका 'क्लिक् इंग्लिश'
KLiC English
Speak English
Communication Skills
(संभाषण कौशल्ये)
English Language Skills
(इंग्रजी भाषा कौशल्ये)
Soft Skills
(मृदू कौशल्ये)
MKCL KLiC English
Gateway to Job Success
www.mkcl.org/english
MKCL
॥ ज्ञानदीप लावू जगी ॥
www.mkcl.org
करियर ओरिएंटेड 'क्लिक्' कोर्सेस
हार्डवेअर व नेटवर्किंग
अकाउंटिंग
ग्राफिक डिझाईनिंग
डिजिटल आर्ट
प्रोग्रामिंग
विक्री व बँकांचे व्यवस्थापन
MKCL KLiC Courses
Gateway to Knowledge Lit Careers
www.mkcl.org/klic
बीबीए (वर्क-बेस्ड पदवी)
BBA (BPM)
Business Process Management
मराठी माध्यमातील पदवी अभ्यासक्रम
१२वी उत्तीर्ण, प्रवेशाच्या वेळी वय १८ वर्षे पूर्ण
स्वयं-अभ्यास + स्वयं-व्यवसाय किंवा उपजीविका
३ वर्षांच्या स्वयं-व्यवसाय किंवा स्थानिक उपजीविकेद्वारे प्रत्यक्ष कामाचा अनुभव व कमाई
प्रत्येक सेमिस्टरमध्ये ४ ई लर्निंग विषयांच्या अभ्यासक्रमांद्वारे सैद्धांतिक ज्ञान
कामातून ज्ञानप्राप्ती व ज्ञानप्राप्तीतून फलदायी काम
BBA (BPM)-यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक यांचे पदवी प्रमाणपत्र
बीबीए
स्वयं व्यवसाय
Work-based Degree by YCMOU & MKCL
ybba.mkcl.org
कोर्स उपलब्ध:
केंद्रात/घरी
कंप्यूटरवर/स्मार्टफोनवर
प्रवेशासाठी MS-CIT केंद्राशी संपर्क साधा किंवा
अधिक माहितीसाठी मिस्ड कॉल द्या 022-43661661.

संस्थापक संपादक : साने गुरुजी
Date of issue
३ जुलै २०२१
वर्ष ७३ / अंक – ४५
संपादक:
विनोद शिरसाठ
**सहयोगी संपादकमंडळ :**
अभय टिळक
अतुल देऊळगावकर
मनोहर जाधव
रझिया पटेल
मुखपृष्ठ मांडणी : **गिरीश सहस्रबुद्धे**
अक्षररचना : **सुरेश माने**
मुद्रितशोधन : **विनायक भंडारी**

‘साधना’ हे साप्ताहिक मालक, साधना ट्रस्ट यांचेसाठी प्रकाशक हेमंत नाईकनवरे यांनी मुद्रक, आनंद लाटकर कॉम्प-प्रिंट कल्पना प्रा.लि., २५/१, यशगंगा इंड. इस्टेट प्रा.लि., वडगाव बु।।, पुणे ४११०४१ येथे छापून, **साधना साप्ताहिक, ४३१ शनिवार पेठ, पुणे ४११०३०.** येथे प्रसिद्ध केले.
**Ph.: 020-24451724 /**
**Mob.: 7028257757**
weeklysadhana@gmail.com
http://weeklysadhana.in
**साधना मीडिया सेंटर (पुस्तक विक्री केंद्र)**
Ph. : 020-24459635

वार्षिक वर्गणी :
**एक वर्षासाठी : ९०० रुपये**
**दोन वर्षांसाठी : १८०० रुपये**
**तीन वर्षांसाठी : २७०० रुपये**

वर्गणीची रक्कम रोख किंवा/म. ऑ./डी. डी./चेक ‘साधना साप्ताहिक’ या नावाने काढून, साधना कार्यालयाकडे पाठवावी. किंवा साधना साप्ताहिक, बचत खाते क्र.**60025586634, IFSC MAHB 0000001, बँक ऑफ महाराष्ट्र,** बाजीराव रोड शाखा, पुणे ३० येथे वर्गणीची रक्कम जमा करावी आणि नाव, पत्ता, फोन नं. इत्यादी तपशील साधना कार्यालयाला इ-मेल अथवा फोन करून कळवावेत.

(अंकातील सर्व छायाचित्रे इंटरनेटवरून साभार. अंकात व्यक्त झालेल्या सर्वच मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)



## अनुक्रम

४ संपादकीय
**नरसिंह राव यांचे खरे मूल्यमापन आणखी २५ वर्षांनी?**

७ **नरसिंहराव यांची अद्‌भुत मुलाखत**
– शेखर गुप्ता

२१ **हो, मी हिंदू आहे!**
– आनंद करंदीकर

२५ **एक सेवाभावी, व्रतस्थ व्यक्तिमत्त्व**
– दशरथ पारेकर

२९ **क्षोभ :१८९६ मधील प्लेगच्या काळातील**
– परशुराम हरी थत्ते

३७ **अलक्ष्यरूप : दासी ते स्वामिनी**
– सुहिता थत्ते

४० **प्रतिसाद**
– डॉ. श्रीकांत परळकर, डॉ. अनिल केशव खांडेकर,
– अरुण वि. कुकडे, संजय लडगे, सुभाष आठले,
– नकुल पार्सेकर, सत्यरंजन खरे.

संपादकीय

# नरसिंह राव यांचे खरे मूल्यमापन आणखी २५ वर्षांनी?

२८ जून १९२१ ते २३ डिसेंबर २००४ असे ८३ वर्षांचे आयुष्य लाभले त्या पी.व्ही. नरसिंह राव यांचे जन्मशताब्दी वर्ष या आठवड्यात संपले. पूर्वीचे हैद्राबाद संस्थान, नंतरचे आंध्र प्रदेश आणि आता तेलंगणा राज्य असलेल्या दुर्गम भागात त्यांचा जन्म झाला. विद्यार्थी चळवळीत असतानाच ते हैद्राबाद मुक्ती संग्रामात सहभागी झाले आणि त्यानंतर राजकारणात ओढले गेले. १९५७ मध्ये म्हणजे वयाच्या ३६ व्या वर्षी पहिल्यांदा ते विधानसभेवर निवडून गेले आणि पुढील वीस वर्षे विधानसभेचे सदस्य राहिले. दरम्यान काही वर्षे आंध्र प्रदेशाचे मंत्री व सव्वा वर्ष मुख्यमंत्री राहिले. त्यानंतर केंद्र सरकारमध्ये इंदिरा गांधी व राजीव गांधी यांच्या मंत्रिमंडळात संरक्षण, गृह, परराष्ट्र, मनुष्यबळ विकास इत्यादी खात्यांचे मंत्री राहिले. त्यातही १९८० ते ८४ या काळात सलग साडेचार वर्षे ते परराष्ट्र मंत्री होते हे विशेष महत्त्वाचे मानले जाते. १९८६ मध्ये राष्ट्रीय शैक्षणिक धोरण आखले गेले ते त्यांच्याच काळात, म्हणजे ते राजीव गांधी मंत्रिमंडळात मनुष्यबळ विकासमंत्री असताना.

नरसिंह राव यांचे व्यक्तिमत्त्व किती बहुआयामी होते हे समजून घ्यायचा प्रयत्न केला तर कोणीही थक्क होईल. एक ते दीड डझन भाषा ते बोलू-समजू शकत होते असे सांगितले जाते. एका तेलगु नियतकालिकाचे संपादन त्यांनी काही काळ केले. काही तेलगु साहित्याचे हिंदी अनुवादही त्यांनी केले, हरी नारायण आपटे यांच्या ‘पण लक्षात कोण घेतो?’ या माईलस्टोन मानल्या जाणाऱ्या मराठी कादंबरीचा तेलगु अनुवाद त्यांनी केला (काही काळ पुणे येथील फर्ग्युसन महाविद्यालयात ते विद्यार्थी होते तेव्हा त्यांनी मराठी भाषेवर चांगलेच प्रभुत्व मिळवले). या देशाला कॉम्प्युटर साक्षरता माहीतही नव्हती, त्या काळात नरसिंह राव यांनी सॉफ्टवेअरचा उत्तम परिचय करून घेतला होता. काँग्रेस पक्षाचे निवडणूक जाहीरनामे तयार करण्याच्या कामात त्यांचा सहभाग प्रमुख मानला जात असे. त्यांची राजकीय ओळख सांगताना ‘चाणक्य’ आणि त्यांचे एकूण शहाणपण सांगताना ‘बृहस्पती’ ही संबोधने वापरली जात असत.

वयाच्या पन्नाशीनंतरची तीन दशके ते भारताच्या राष्ट्रीय राजकारणातच राहिले. त्या काळात ते महाराष्ट्रातील रामटेक मतदारसंघातून दोनदा लोकसभेवर निवडून गेले. पंतप्रधान झाल्यावर आंध्र प्रदेशातील नंद्याळ मतदारसंघातून तर पंतप्रधानपद संपत होते तेव्हा (१९९६ च्या लोकसभा निवडणुकीत) ते ओडिशा राज्यातून निवडून गेले होते. १९९१ मध्ये मात्र त्यांनी दिल्ली सोडून हैदराबादला जाण्याची पूर्ण तयारी केली होती आणि म्हणून ती लोकसभा निवडणूक त्यांनी लढवली नव्हती. तेव्हा त्यांचे वय ७० वर्षे म्हणजे राजकारणाच्या दृष्टीने फार नव्हते, मात्र अनेक आजारांचा सामना करीत असल्याने उर्वरित आयुष्य राजकारणाच्या धकाधकीपासून दूर राहत वाचन-लेखनात घालवावे, असे त्यांचे त्या वेळचे नियोजन होते.

त्यांच्या पत्नीचे निधन ते पन्नाशीत असतानाच झाले होते. त्यांना आठ अपत्ये होती, मात्र त्यांच्यासाठी आर्थिक तरतूद त्यांनी फारशी केलेली नव्हती. त्यामुळे त्यांच्या एका मुलाच्या शिक्षणाची जबाबदारी त्यांच्या एका जावयाने घेतली होती,

तर त्यांच्या मुलीच्या वैद्यकीय शिक्षणासाठी त्यांनी कर्ज काढले होते. अखेरच्या काळात त्यांचे न्यायालयीन खटले लढविणाऱ्या वकिलांची फी देण्यासाठी त्यांनी आपले हैदराबाद येथील घर विक्रीस काढले होते. त्यांचा एक मुलगा काही काळ लोकसभेवर खासदार होता आणि एक मुलगा आंध्र प्रदेशात काही काळ आमदार व मंत्री होता. मात्र घराणेशाहीचा आरोप राव यांच्यावर कधी झाला नाही. त्यांनी Insider या आत्मचरित्रात्मक कादंबरीत आपल्या राजकीय आयुष्याचे रेखाटन काही प्रमाणात केले आहे.

निवृत्तीचे आयुष्य जगण्यासाठी हैदराबादला निघालेल्या नरसिंह राव यांच्या गळ्यात अगदी अनपेक्षितपणे पंतप्रधानपदाची माळ पडली. याचे कारण १९९१ च्या लोकसभा निवडणुकीचा प्रचार अंतिम टप्प्यात असताना राजीव गांधी यांची हत्या २१ मे रोजी झाली, तेव्हा काँग्रेस कार्यकारी समितीने तातडीने अध्यक्ष म्हणून सोनिया गांधींची निवड केली. पण ते पद स्वीकारण्यास सोनिया गांधींनी नकार दिला. तेव्हा काँग्रेसचे अध्यक्ष व पर्यायाने निवडणुकीत जय मिळाला तर पंतप्रधान कोण होणार असा प्रश्न निर्माण झाला. तेव्हा सोनिया गांधी यांचा निर्णय अंतिम ठरणार हे उघड होते. सोनियांनी पी.एन. हक्सर यांचा सल्ला घेतला, त्यांनी तत्कालीन उपराष्ट्रपती शंकर दयाळ शर्मा यांचे नाव सुचवले. शर्मा यांनी पंतप्रधानपद पूर्ण वेळेची मागणी करणारे असल्याने आणि त्यांची तब्येत तितकीशी साथ देत नसल्याने नकार दिला. त्यानंतर पी.एन. हक्सर यांनी नरसिंह राव यांचे नाव सुचवले आणि मग त्यांना निरोप गेला. ही आठवण नटवरसिंग यांनी आपल्या Walking with Lions या पुस्तकात How P V became PM ? या लेखात सांगितली आहे. (या लेखाचा अनुवाद साधनाच्या १ जून २०१३ च्या अंकात प्रसिद्ध केला आहे).

काय गंमत आहे पाहा, शब्दशः बॅगा भरून व घरातील सामानाची बांधाबांध करून तयार असलेल्या नरसिंह राव यांच्याकडे काँग्रेसचे अध्यक्षपद असे चालून आले आणि त्यांनी ते स्वीकारले. त्यानंतर दोन आठवड्यांनी निवडणुकीचे निकाल लागले, काँग्रेसला २३६ जागा मिळाल्या, बहुमतापासून तो आकडा ३६ ने कमी होता. त्यामुळे डाव्या व अन्य लहान पक्षांच्या साह्याने सरकार चालवावे लागणार हे उघड होते. नरसिंह राव यांनी १६ जूनला पंतप्रधानपदाची शपथ घेतली खरी, पण काँग्रेसमधील अनेक नेते त्या पदावर दावा सांगणारे होते. उघड दावा जरी फक्त शरद पवार यांनी केलेला दिसला तरी एन.डी.तिवारी, अर्जुन सिंग, माधवराव शिंदे हे त्रिकूटही आघाडीवर होते. वस्तुतः दीर्घकाळ विरोधात राहून १९८६ मध्ये म्हणजे जेमतेम पाच वर्षांपूर्वी काँग्रेसमध्ये आलेल्या आणि वयाच्या पन्नाशीत असलेल्या शरद पवारांनी पंतप्रधानपदावर दावा करणे हे अगदीच घाईचे होते, पण त्यांनी ते केले खरे. त्यानंतर वरील चौकडीला व पक्षांतर्गत अन्य विरोधकांना कधी सांभाळत तर कधी शह देत नरसिंह राव यांनी वाटचाल केली.

शरद पवार यांना १९९३ मध्ये संरक्षण मंत्रिपद सोडून महाराष्ट्रात येण्यास राव यांनी भाग पाडले आणि ते पद अन्य कोणाला न देता अखेरपर्यंत रिक्त (अर्थात पदभार पंतप्रधानांकडे) ठेवण्यास पवार यांनी राव यांना भाग पाडले, एवढी एक वस्तुस्थिती लक्षात घेतली तरी पक्षाच्या अंतर्गत काय स्वरूपाचा तणाव होता याची कल्पना येते. शिवाय, सुब्रमण्यम स्वामी या विरोधी पक्षातील कारस्थानी नेत्याला कॅबिनेट मंत्र्याच्या दर्जाचे पद देऊन गप्प बसवणे आणि अटलबिहारी वाजपेयी या विरोधी पक्षातील लोकप्रिय नेत्याला संयुक्त राष्ट्रसंघात भारताचे प्रतिनिधीत्व करण्यासाठी पाठवून एकाच दगडात अनेक पक्षी मारणे अशी कामे राव यांना करावी लागत होती. ही केवळ वानगीदाखल काही उदाहरणे आहेत, अशा लहान-मोठ्या किती आघाड्यांवर त्यांना किती प्रकारच्या चाली प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष खेळाव्या लागल्या असतील, याची गणती करता येणार नाही.

त्यांचे सरकार अडचणीत (अल्पमतात) आले तेव्हा झारखंड मुक्ती मोर्चाच्या खासदारांना फोडून ते त्यांनी वाचवले, त्या प्रकरणात लाच दिल्याचे आरोप झाले. हर्षद मेहता या शेअर बाजारातील दलालाने, राव यांना एक कोटी रुपये बॅगमध्ये भरून कसे दिले, हे राम जेठमलानी या वकिलाच्या उपस्थितीत प्रात्यक्षिकासह माध्यमांना दाखवले, तेव्हाही प्रचंड खळबळ माजली. हवाला प्रकरणात अडवाणी व विरोधी पक्षातील अनेक दिग्गज लोक सापडले तेव्हा ते कारस्थान राव यांनीच केले असे सर्वांनी मानले. चंद्रास्वामी व सत्य साईबाबा यांच्याशी असलेल्या संबंधांमुळेही राव हे कायम टीकेचे लक्ष्य राहिले. अनेक वेळा निर्णयच न घेणे यामुळे 'निष्क्रिय' आणि अनेक प्रकरणांवर भाष्यच न करणे यामुळे 'मौनीबाबा' असे त्यांना संबोधले गेले. आणि बाबरी मशीद पाडली गेली त्याचा सर्वांत मोठा दोष तर राव यांच्या निष्क्रियतेलाच दिला जातो. किंबहुना त्या कृतीला त्यांची मूकसंमती होती असेही मानले जाते. नंतरच्या काळात भाजपला त्यांच्याविषयी जवळिक आणि

काँग्रेसला त्यांच्याविषयी तिडीक वाटत राहिली, त्याचे तेच मुख्य कारण राहिले आहे. राव यांनी अयोध्या प्रकरणावर अखेरच्या काळात पुस्तक लिहिले आणि पंतप्रधान म्हणून काम करताना घटनात्मक चौकटीत जे शक्य होते ते सर्व केले असेच त्यात नोंदवले आहे. मात्र हवाला प्रकरण व बाबरी मशीद या दोन्ही प्रकरणात राव यांनी तांत्रिकतेला अतिरिक्त महत्त्व दिले, असे त्या दोन्ही प्रकरणांचा अधिक सखोल वेध घेतल्यावर लक्षात येतेच!

राव पंतप्रधान झाले तेव्हा पंजाब धुमसत होता, खलिस्तानची मागणी (इंदिरा गांधींच्या हत्येनंतरही) संपलेली नव्हती. तिथे विधानभा निवडणुका घेऊन शांतता प्रस्थापित झाली त्याचे मोठे श्रेय राव यांना द्यावे लागते. आसाममधील बंडखोरीही संपलेली नव्हती आणि काश्मीर प्रश्न तर होताच. त्या दोन्ही राज्यांतील स्थिती राव यांनी चांगलीच नियंत्रणाखाली आणली. पाकिस्तान व चीन या दोन्ही शेजाऱ्यांनी त्या काळात आगळीक करू नये, एवढी काळजी घेतली. आणि मंडल आयोगाची अंमलबजावणी गाजावाजा न करता सुरू केली. स्थानिक स्वराज्य संस्था बळक करण्यासाठी ७३ व ७४ वी या घटनादुरुस्त्या झाल्या, त्यांच्याच काळात. मात्र त्यांच्यासमोर सर्वांत मोठे आव्हान होते ते विस्कटलेली अर्थव्यवस्था सावरण्याचे. देश दिवाळखोरीच्या उंबरठ्यावर असताना त्यांच्याकडे पंतप्रधानपद आले होते आणि त्यांनी मनमोहनसिंग या अर्थतज्ज्ञाला अर्थमंत्री करून देशाच्या अर्थव्यवस्थेला नवे वळण दिले. त्यांनी सुरू केलेल्या आर्थिक सुधारणा कार्यक्रमांचे एका बाजूने प्रचंड स्वागत झाले आणि दुसऱ्या बाजूने प्रचंड टीका झाली. दोन्ही बाजूंचे काही युक्तिवाद अद्याप कायम आहेत, काही युक्तिवाद अधिक तीव्र झाले आहेत. मात्र आर्थिक धोरणांची सर्वसाधारण दिशा तीस वर्षांनंतरही तीच राहिली आहे. केंद्रात व राज्यांमध्ये विविध पक्षांची, युत्यांची वा आघाड्यांची सरकारे आली तरीही.

अशा या नरसिंह राव यांचे मूल्यमापन कसे करायचे हा एक कठीण प्रश्न आहे. तशी संधी जन्मशताब्दी वर्षात चांगली घेता आली असती. कारण कोणत्याही व्यक्तीची जन्मशताब्दी येते तेव्हा तिचे विचार व कार्य यांच्याकडे अधिक निरपेक्षपणे पाहता येते, त्या व्यक्तीला ओळखणारे नंतरच्या एक-दोन पिढ्यांतील लोक हयात असतात म्हणून आणि पुरेसा काळ लोटल्यामुळे व दृश्य परिणाम दिसायला लागलेले असतात म्हणूनही! परंतु त्यांचे जन्मशताब्दी वर्ष आले आणि गेले, फारसे काही घडलेले नाही. कोविड साथीमुळे निर्माण झालेली परिस्थिती हे वरवर दिसणारे कारण असले तरी, काँग्रेस पक्षाने त्यांचे नाव घेणेच सोडून दिलेले असल्याने फार काही घडलेच नसते. ज्या पक्षात राव यांनी आयुष्य घालवले तो पक्षच त्यांचा वारसा सांगत नसेल तर अन्य कोण व किती करणार? अर्थात, नेहरूंचे पन्नासावे स्मृतिवर्ष आणि सव्वाशेवे जयंतीवर्ष आले आणि गेले, इंदिरा गांधींचे जन्मशताब्दी वर्ष आले आणि गेले, तेव्हाही काँग्रेसने काहीच केले नव्हते. किंबहुना काँग्रेस पक्षाची मरगळ सात वर्षे विरोधी पक्षात असूनही हटायला तयार नाही. काँग्रेस पक्ष नतद्रष्टपणा सोडायला तयार नाही.

हे खरे आहे की, काँग्रेस पक्षाची घसरण सुरू झाली राव यांच्याच काळात. पण ती घसरण का सुरू झाली आणि कशी रोखता येईल, याची कारणमीमांसा त्यांनी केली आहे मार्च १९९२ मध्ये तिरुपती येथे झालेल्या काँग्रेस अधिवेशनात. त्यावेळी त्यांनी केलेले भाषण आजच्या काँग्रेस पक्षालाही तितकेच किंबहुना अधिक मार्गदर्शक ठरू शकेल असे आहे. साधारणतः दहा हजार शब्दांच्या त्या लिखित भाषणात राव यांनी काँग्रेस पक्षासाठी आणि या देशासाठीही काल-आज-उद्या अशी मांडणी केली आहे. लोकशाही, धर्मनिरपेक्षता, समाजवाद आणि अलिप्ततावाद (आंतरराष्ट्रीय राजकारणात) या चार स्तंभांचा आधार घेतल्याशिवाय हा देश टिकून राहणार नाही, आधुनिक होणार नाही असे ठाम प्रतिपादन केले आहे. अलिप्ततावाद हे आता मोठे आव्हान म्हणून दिसत नसले तरी दक्ष राहावेच लागणार आहे, कारण त्याचा संबंध देशाच्या सार्वभौमत्वाशी आहे. समाजवाद म्हणताना त्यांच्यासमोर नेहरूंना अभिप्रेत असणारे कल्याणकारी राज्य असेच अपेक्षित आहे, त्याची प्रत्यक्षातील स्थिती पुन्हा पुन्हा तपासावी लागणार आहे. लोकशाही व धर्मनिरपेक्षता ही दोन आव्हाने अधिकाधिक तीव्रता धारण करीत आहेत. त्यामुळे रावांची मांडणी त्यांच्या जन्मशताब्दी वर्षानंतरच्या पाव शतकासाठी विचार करावा अशी आहे. त्यांची कथनी व करणी यांच्यातील संगती व विसंगती कशी ओळखायची हा खरा प्रश्न आहे. राव यांचा पंतप्रधानाचा कालखंड संपला तेव्हा ते ७५ वर्षांचे होते, त्यानंतर आता २५ वर्षे उलटली आहेत. पण एवढा काळ त्यासाठी पुरेसा नसावा. त्यामुळे आणखी २५ वर्षांनी म्हणजे त्यांच्या १२५ व्या जयंती वर्षात त्यांचे यथायोग्य मूल्यमापन होईल कदाचित!

◆

शेखर गुप्ता

# नरसिंह राव यांची अद्‌भुत मुलाखत

२८ जून १९२१ ते २३ डिसेंबर २००४ असे ८४ वर्षांचे आयुष्य लाभलेले पी.व्ही.नरसिंहराव १९९१ ते ९६ या काळात भारताचे पंतप्रधान होते. त्यांची ही मुलाखत शेखर गुप्ता यांनी एनडी टीव्हीसाठी घेतली आणि ८ मे २००४ रोजी प्रसारित झाली. तेव्हा सार्वत्रिक लोकसभा निवडणुकीचा प्रचार अंतिम टप्प्यात होता. त्यानंतरच्या आठवड्यात निकाल लागले आणि 'शायनिंग इंडिया' व 'फील गुड' हे दोनही घटक चर्चेत असूनही भाजप आघाडीचा पराभव झाला आणि डॉ.मनमोहनसिंग यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेस आघाडीचे सरकार आले. ही मुलाखत झाल्यावर सात महिन्यांनी नरसिंह राव यांचे निधन झाले. एनडी टीव्हीवर झालेल्या 'वॉक द टॉक' या कार्यक्रमातील निवडक २५ मुलाखतींचे पुस्तक गेल्या वर्षी रूपा पब्लिकेशन्सकडून आले आहे. त्या पुस्तकात ही मुलाखतही आहे. नरसिंहराव यांची जन्मशताब्दी या आठवड्यात संपली आहे, म्हणून त्या मुलाखतीचा अनुवाद इथे प्रसिद्ध केला आहे. – संपादक

पी.व्ही. नरसिंह राव हे काही आपले सर्वाधिक मितभाषी पंतप्रधान नव्हते. तो मान डॉ.मनमोहन सिंग यांच्याकडे जातो, आर्थिक सुधारणा कार्यक्रम राबवणारे अर्थमंत्री या नात्याने त्यांचा राजकरणात प्रवेश झाला. पण राव हे ऑन रेकॉर्ड बोलण्यासाठी सर्वाधिक नाखूष असलेले दुसरे पंतप्रधान म्हणता येतील. ज्यांच्याशी माझी व्यक्तिशः ओळख होती असे ते पहिले पंतप्रधान. ते पंतप्रधान असताना त्यांनी मला 'इंडिया टुडे'मध्ये छापण्यासाठी एक मुलाखत दिली होती, पण त्यातील बराच भाग त्यांना आधी प्रश्न पाठवले आणि त्यांनी त्याची लिखित उत्तरे पाठवली असा होता; त्यानंतर अर्धा तास अनौपचारिक संवाद व छायाचित्रे काढण्यासाठी दिला होता. पण त्यांचा अनुभव, त्यांची बुद्धिमत्ता आणि आनंददायक असे खोडकर वाक्प्रचार किंवा वाक्यप्रयोग करण्याची त्यांची सवय, यामुळे त्यांच्याशी झालेला प्रत्येक संवाद माझे एक प्रकारचे शिक्षण ठरायचा. भारतातील आघाडीच्या इंग्रजी वृत्तपत्राचा संपादक म्हणून काम करीत असतानाही माझे शिक्षण चालूच आहे. त्यामुळे नरसिंह राव यांच्याशी मी संपर्क ठेवून होतो, ते सत्तेवरून पायउतार झाल्यावर आणि काँग्रेस पक्षाने त्यांना अडगळीत टाकल्यावरही. अखेर माझी चिकाटी फळाला आली आणि ते या मुलाखतीसाठी तयार झाले. कॅमेऱ्यासमोर त्यांनी दिलेली, पूर्ण लांबीची म्हणावी अशी ही पहिली मुलाखत आहे. नवी दिल्ली येथील त्यांच्या निवासस्थानी घेतलेली ही इंग्रजी मुलाखत ८ मे २००४ रोजी एनडीटीव्ही वरून प्रसारित करण्यात आली. ते विविध विषयांवर मोकळेपणाने बोलले, त्यात शहाणपण होते. पण वेगवेगळ्या प्रकारे विचारूनही एका प्रश्नाचे उत्तर त्यांनी दिले नाही. तो प्रश्न असा की, '१९९५ मध्ये तुम्ही पंतप्रधान असताना भारताने अणुचाचण्या करण्याचा घेतलेला निर्णय, अमेरिकेचे तेव्हाचे अध्यक्ष बिल क्लिंटन यांनी आणलेल्या दबावामुळे रद्द केला का?' त्या प्रश्नावर त्यांनी मला एक वाक्य ऐकवून गप्प केले.

ते वाक्य असे, 'अरे भाई, कुछ तो मेरे साथ चिता मे जलने दो!'

**प्रश्न** – तुमच्याशी संवाद साधायला मिळणे आणि तेही कॅमेऱ्यासमोर हा माध्यमातील कोणासाठीही दुर्मिळ प्रसंग आहे...

– माझ्यासाठीही तितकाच दुर्मिळ प्रसंग आहे हा..

**प्रश्न** – तुमच्या विनोदबुद्धीची धार बोथट झालेली नाही तर किंवा तिची तीव्रता फिकट झालेली नाही, सत्तेवरून पायउतार झाल्यानंतरही?

– नाही. सत्तेवर होतो तेव्हा ती धार थोडी बोथट झाली होती, सत्तेवरून पायउतार झाल्यावर ती परत आली असावी.

**प्रश्न** – तुम्ही सत्तेवर होता तेव्हा ती काही प्रमाणात गमावली होती का?

– गमवावीच लागते. तुम्ही सत्तेवर असता तेव्हा जीवनातील अनेक गोष्टी गमवाव्या लागतात...

**प्रश्न** – तुमच्यातील विनोदबुद्धीसुद्धा?

– पूर्णतः नाही, पण काही प्रमाणात. तुम्हाला वस्तुस्थितीचा सामना करावा लागतो आणि जेव्हा वस्तुस्थितीचा सामना करीत असता तेव्हा विनोदबुद्धी तुम्हाला वस्तुस्थितीपासून दूर घेऊन जाते.

**प्रश्न** – तुम्ही पंतप्रधान असतानाचा असा एखादा प्रसंग आठवतोय का की, तेव्हा इतक्या मोठ्या जबाबदाऱ्या नसत्या तर तुम्ही त्यावर छान हसला असता?

– मी २७ वर्षे सत्तेवर होतो, त्यामुळे तुम्ही कल्पना करू शकता – माझ्यासाठी इतक्या दीर्घ प्रवासानंतर ते लक्षात ठेवणे किती अवघड असेल.

**प्रश्न** – तुम्ही तो प्रवास फक्त पाच वर्षांचा समोर ठेवला– म्हणजे पंतप्रधानपदाचा काळ– तर तसा काही प्रसंग आठवतोय?

– नाही तसे करू शकणार. मी एका राज्याचा मुख्यमंत्री होतो, त्याआधी तिथे मंत्री होतो, नंतर केंद्रात मंत्री होतो, दरम्यानच्या काळातील काही महिने सत्तेबाहेर होतो. आणि जीवन तर वाहते आहेच. जेव्हा तुमचा अनुभव हा संपूर्ण आयुष्याशी निगडित असतो तेव्हा विशिष्ट कालखंड समोर ठेवून सांगता येत नाही. आणि तसे करणे योग्यही ठरणार नाही. तुमच्यासमोर नेहमी परिप्रेक्ष्य असला पाहिजे आणि तसा परिप्रेक्ष्य आकाराला येण्यासाठी २७ वर्षे हा खूप मोठा काळ झाला.

**प्रश्न** – तुम्ही पंतप्रधान होता तेव्हाचा असा एखादा विचित्र प्रसंग आठवतोय, जेव्हा तुम्हाला वाटले की आपण या जबाबदारीच्या पदावर नसतो तर खूप हसलो असतो?

– तसे नेमके सांगता येणे खूप अवघड आहे. पण सार्वजनिक जीवनात सतत दुर्मुखलेले राहणे आवश्यक नाही. कधी कधी तुम्हाला स्वतःवरच हसण्याची वेळ येते आणि राजकारणात ते सर्वाधिक महत्त्वाचे शस्त्र ठरू शकते.

**प्रश्न** – आता सांगा, तुम्ही राजकारणात प्रतिष्ठा मिळवली आणि आपल्या ज्येष्ठ राजकीय नेत्यांमध्ये (चांगल्या कारणांसाठी) सर्वाधिक शांत राहणारे अशी तुमची ख्याती आहे, तर ती वृत्ती तुम्ही कशी जोपासली किंवा विकसित केली? की तुमच्याकडे ती वृत्ती उपजत किंवा जन्मापासून आहे? की ती एक युक्ती किंवा रणनीती आहे? की तुम्ही स्वभावतःच लाजरे आहात?

– तुम्ही आता जे वर्गीकरण केले त्या सर्वांचा ती एक भाग आहे. ती वृत्ती पूर्णतः जोपासना करून आलेली नसते, पूर्णतः उपजतही नसते. तुम्हाला तुमचा दृष्टिकोन परिस्थितीशी जुळवून घ्यावा लागतो, जर तुम्ही तसे करू शकला नाहीत तर अयशस्वी ठरता. मग काय होते तर, प्रत्येक जण तुमच्याकडे पाहून असा विचार करतो की, तुमचा दृष्टिकोन योग्य नव्हता. म्हणून तुम्हाला निर्माण झालेल्या परिस्थितीशी जुळवून घ्यावे लागते, सभोवतालाशी मिळतेजुळते व्हावे लागते आणि विशिष्ट संदर्भांशी जोडून घ्यावे लागते.

**प्रश्न** – तुम्ही मुलाखती कधीच दिल्या नाहीत. मला वाटते मागील आठ वर्षांतील तुमची ही पहिलीच मुलाखत असेल. त्यामुळे अनेक गोष्टी स्वतःशीच ठेवण्यात तुम्ही माहीर आहात?

– नाही. मी माझ्यापुरत्याच गोष्टी ठेवतो हे खरे नाही. अनेक गोष्टीत ढोबळ रस असणाऱ्यांना तसे वाटते. माझे तुमच्यासारखे नाही, तुम्ही माझ्याकडे येता तेव्हा तुम्हाला एकाच गोष्टीत रस असतो – राजकारण.

**प्रश्न** – बरोबर. पण तुमच्याशी मला टेनिस–विषयीसुद्धा बोलायचे आहे, त्याकडे मी नंतर येणारच आहे.

– हो जरूर. मी असे पाहत आलोय की, कुठे व काय घडते आहे, यासंदर्भात मी पत्रकारांशी बोलतो तेव्हा ते पुन्हा पुन्हा उत्स्फूर्तपणे व हमखास राजकीय प्रश्नाकडे वळतातच. याचा अर्थ असाच होतो की, त्यांच्यात असे काही तरी असते ज्यामुळे ते बांधले गेलेले असतात आणि जोपर्यंत त्याकडे ते वळत नाहीत तोपर्यंत त्यांना चैन पडत नाही.

**प्रश्न –** पण पत्रकारांना का दोष देता? तुम्ही या देशातील सर्वाधिक अनुभवी राजकारणी लोकांपैकी आहात, राजकारण हेच तुमचे जीवन राहिले आहे. तर मग राजकारणाविषयी पुन:पुन्हा बोलण्यात वाईट काय आहे?

– असो. तर मुद्दा असा की, एकोणिसाव्या शतकातील तुमचा अनुभव हा इतिहास आहे, विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात अनुभव आला तर अनुभव म्हणता येईल त्याला, पण त्यातील किती आज कालसुसंगत म्हणता येईल? प्रत्यक्ष कार्यवाहीचा संबंध येतो तेव्हा, तुम्ही पूर्वी काय म्हणाला होता हे सांगावे लागत असेल म्हणजे शंभर वर्षांपूर्वी असे म्हटले होते वगैरे तर पोपट बनता, तुम्ही माणूस राहत नाही. आणि हा प्रकार राजकारणी लोकांमध्ये कमी असतो...

**प्रश्न –** पण हा रोग राजकारणी लोकांमध्ये सर्वत्र आढळतो.

– तुम्ही सर्व राजकारण्यांना एकाच तागडीत टाकू नका किंवा एकाच प्रकारात त्यांचे वर्गीकरण करू नका. राजकारणी लोकसुद्धा माणसेच असतात, त्यांच्यातही तितकीच विविधता असते, जितकी अन्य क्षेत्रातील लोकांमध्ये असते. मला आशा आहे, तुम्ही त्यांची गणना अद्याप माणसांतच करीत असाल.

*‘‘हो, व्हाईट कॉलर लोकांनी मानवी चेहऱ्याबद्दल मला कधीच विचारले नाही. ते असे म्हणत राहिले की नव्या सुधारणांमुळे ते आनंदी आहेत, त्यांच्या उत्पन्नात वाढ झाली आहे. छानच, ज्यांचे सर्व व्यवस्थित चालू होते ते कोणी काही बोलत नव्हतं. परंतु अन्य माणसांबद्दल काय, हा माझा प्रश्न होता. जी माणसं मागे राहिली त्यांचे काय? कदाचित तो तुमचा चुलतभाऊ असेल, कदाचित तो तुमचा पुतण्या असेल जो खेड्यामध्ये थांबलेला आहे, त्याच्याबद्दल काय विचार करत आहात? त्याच्या भविष्याबद्दल काय विचार केलाय? अशा काही गोष्टी होत्या ज्यांचा हिशोब करायचाच होता. राष्ट्र म्हणजे एक छोटासा समूह नव्हे. राष्ट्र म्हणजे या देशातील सर्व लोक. मागील तीस वर्षांच्या काळात जास्त करून मी दिल्लीतच राहिलो, पण मी हे कधीही विसरलो नाही की मी कुठून आलो आहे, मी कुठे जन्माला आलो आहे, माझ्या वंगारा जिल्ह्यात जे काही घडतंय त्याकडे मी दुर्लक्ष करू शकलो नाही.’’*



**प्रश्न –** तुम्ही तसे करीत असाल तर मी तुमच्याशी सहमत आहे.

– तुम्ही संमती देत आहात, पण तुमच्या चेहऱ्यावर मिश्किल हास्य दिसते आहे.

**प्रश्न –** नाही. माझे काही मिश्किल हास्य नाही. तुम्ही मघाशी विनोदाबद्दल बोललात, त्या आवरणातून मी अद्याप बाहेर आलेलो नाही. पण तुम्हाला असे आढळले का की, आपले खूप जास्त राजकारण आणि खूप जास्त राजकारणी लोक भूतकाळाविषयी बोलतात? आपल्या राजकारणात भविष्याविषयी फार आश्वासकता दिसत नाही. एक तर भूतकाळातील अन्यायाच्या विरोधात मतदान केले जाते किंवा भूतकाळातील वैभवासाठी तरी! तर आपले राजकारण भूतकाळात इतके गोठलेले का असते?

– तुम्हाला असे एखादे क्षेत्र माहीत आहे का, ज्यात फक्त भविष्यकाळाविषयी बोलले जाते?

**प्रश्न –** आता अमेरिकेतील अध्यक्षीय निवडणुकीकडे पहा. तिथले लोक बोलतात– त्यांच्या मुलाबाळांविषयी, नातवंडांविषयी, आरोग्याच्या सुविधाविषयी, करपद्धती विषयी, शिक्षणाविषयी. भारतात मात्र जास्त करून बोलले जाते मंदिराविषयी किंवा मशिदीविषयी, गांधी–नेहरूंविषयी किंवा भगवान रामाविषयी किंवा मार्क्स–लेनिनविषयी. तुम्ही भारतातील तीन राजकीय प्रवाह (काँग्रेस, भाजप, कम्युनिस्ट) पाहिले तर असे दिसते की, ते सर्व प्रवाह त्यांचे भूतकाळातील वैभव व कर्तबगारी यांचा आधार घेऊन किंवा भूतकाळात त्यांच्यावर कसा अन्याय झाला हे सांगून आजच्या मतदारांची मते उद्यासाठी मागतात.

– हे पहा, तुम्ही भूतकाळात काय केले आहे त्या आधारावरच तुमची भविष्य काळाविषयीची आश्वासने किती बळकट आहेत हे ठरत असते. जर तुम्ही भूतकाळात काहीच केलेले नसेल आणि भविष्यासाठी खूप सारी आश्वासने देत असाल तर तुमची विश्वासार्हता धोक्यात असते. मतदार हे इतक्या स्पष्ट शब्दांत तुमच्या तोंडावर नाही सांगत. पण ते तुम्हाला मतदान करीत नाहीत. तर भूत– वर्तमान– भविष्य ही साखळी आहे. तुम्ही यांत्रिक पद्धतीने त्यांना स्वतंत्र करू शकत नाही आणि असे म्हणू शकत नाही की हा भूत, हा वर्तमान, हे भविष्य. वर्तमानात जन्म घेतलाच नाही तर भविष्य घडणार कसे?

**प्रश्न –** किंवा असे काही आहे का की आपले खूप जास्त राजकारणी लोक वृद्ध असतात म्हणून ते भूतकाळाविषयी जास्त बोलतात?

– नाही, तसे काही नाही. तुम्ही पहा, तो आपल्या परंपरेचा भाग आहे. काही देशांचा संपूर्ण भूतकाळ दोनशे वर्षांचा असतो. भारताचा भूतकाळ जर पाच हजार वर्षांचा असेल, तर आपल्या सार्वजनिक चर्चाविश्वात त्या प्रमाणात भूतकाळ वर्चस्व गाजवणारच.

**प्रश्न –** पण जो समाज पुढे सरकतो आहे, त्याने भूतकाळाच्या चिखलात इतके रुतून बसावे का? कारण भूतकाळात अनेक नकारात्मक घटक असतात.

– नाही, आपण भूतकाळात रुतून बसलेलो नाही!

**प्रश्न –** आणि भूतकाळातील ते नकारात्मक घटक आता पुन्हा उफाळून आलेले दिसतात?

– तुम्ही जर पाच हजार वर्षांचा इतिहास तपशीलवार अभ्यासलात तर तुम्हाला असे आढळेल की, हा देश कोणत्याही विशिष्ट काळात भूतकाळाच्या चिखलात रुतून बसलेला नाही. तसे जर झाले असते तर हा देश कधीच नामशेष झाला असता!

**प्रश्न –** पण आज आपण जातींच्या विळख्यात अडकलो आहोत, धार्मिक समस्यांमध्ये गुंतून पडलो आहोत, अनेक पूर्वग्रहांमध्ये सापडलो आहोत. मागील दहा वर्षांत या देशातील राजकारणाने आपली दिशा हरवली आहे.

– आपल्या राजकारणाची दिशा हरवलेली नाही. विशिष्ट अडथळ्यांवर मात करून राजकारण पुढे आले आहे, तो आपल्या इतिहासाचा भाग आहे. त्यामुळे आपण स्वतःला प्रशिक्षण दिले पाहिजे, त्या इतिहासासह जगण्याचे आणि सर्व प्रकारच्या अडथळ्यांतून मार्ग काढत पुढे जाण्याचे. आपण पाहिले आहे, इटालियन स्थलांतरित आयरिश स्थलांतरितांशी लढले आहेत, आयरिश स्थलांतरित अन्य देशातील स्थलांतरितांशी लढले आहेत आणि असेच चक्र चालत आले आहे. लक्षात घ्या, मानवी स्वभावाची एक छटा अशी असते, जी स्वतःला इतरांपासून वेगळे मानत असते. ते अगदी नैसर्गिक आहे. काही वेळा तर अगदी क्षुल्लक किंवा मूर्खपणाच्या वाटाव्यात अशा गोष्टी दाखविण्याची उर्मी मानवी मनात जागृत होते आणि मग आम्ही तुमच्यापासून, किंवा शेजाऱ्यांपासून किंवा इतरांपासून कसे वेगळे आहोत हे दाखवले जाते.

**प्रश्न –** या तुमच्या मुद्याचे स्पष्टीकरण म्हणून एखादे उदाहरण सांगता का?

– हो. समजा तुम्ही शारीरिक दृष्टीने एक शक्तिशाली माणूस आहात तर तुम्हाला असा देखावा करावासा वाटणारच की, मी तसा आहे. म्हणजे एखाद्या शारीरिक दृष्टीने कमजोर माणसाशी तुम्ही बोलता तेव्हा तुम्ही ते शब्दांत मांडत नाही, पण तुमच्या मानसिक स्तरावर ते असतेच. तुम्ही एखाद्या देशाविषयी त्याच्या नागरिकाशी बोलत असाल तर, त्याच्या बोलण्यात एक प्रकारचा तोरा किंवा अभिमान असणारच!

**प्रश्न –** तुम्ही आता जे सांगताय त्यातून आपल्या राजकारणातील ताण तुम्ही ध्वनीत करताय का? मला आणि या मुलाखतीच्या प्रेक्षकांनाही ते सूक्ष्म (सटल) असू शकते...

– नाही. त्यात सूक्ष्म असे काही नाही, हे खूपच सरळ आहे. एखादी व्यक्ती स्वभावाने आक्रमक असते, मात्र ती आतून भित्री असू शकते. ती व्यक्ती आपला भित्रेपणा लपवण्यासाठी आक्रमक रूप धारण करू शकते. अशा प्रकारची माणसं तुम्ही पाहिली असतील.

**प्रश्न –** तुम्ही भाजपाच्या संदर्भात बोलत आहात?

– नाही, नाही! तुम्ही एक मोठे जाळे पसरलेले आहे, पण मी बोलतोय त्याचा संबंध पक्षीय राजकारणाशी नाही.

**प्रश्न –** पण सध्याच्या काळात जे काही चालू आहे ते पाहता, म्हणजे शायनिंग इंडिया, फील गूड फॅक्टर ८ टक्के ग्रोथ रेट या भाजप सरकारच्या प्रचाराबद्दल तुम्ही कसा विचार करता? तुम्ही त्याकडे कसे पाहता? त्यांचे ते दावे तुम्हाला प्रभावित करतात? तुम्ही त्यामुळे चकित होता, की त्यामुळे त्रासून जाता?

– नाही, मी का त्रासून जावं? मी कधी त्रासून जावं हे मला माहिती आहे. जेव्हा कोणी तरी म्हणतात की भारत चमकतोय (इंडिया इज शायनिंग), तेव्हा त्याचा अर्थ असा असतो की त्यासाठी ते कारणीभूत आहेत, म्हणजे त्यांनी ते घडवले आहे. अर्थातच याबाबत मतभिन्नता असू शकते.

**प्रश्न –** बरोबर..

– हे पाहा... पाऊस चांगला झाला आहे, मी शेतकरी आहे, माझ्या शेतात पीक चांगले आले आहे, त्यामुळे मी दुःखी होण्याचं काहीच कारण नाही. माझ्यासाठी तो आनंदाचाच भाग असेल. पण मी जर असे म्हणायला लागलो की 'पाऊस मी आणला आहे', तर त्यावर मतभिन्नता असणारच. अगदी तसेच आहे हे (भाजपच्या फील गुड फॅक्टरचे).

**प्रश्न –** 'इंडिया इज शायनिंग' असे भाजप म्हणतोय. स्वातंत्र्यानंतर पहिल्यांदाच असे घडते आहे, असाही त्यांचा दावा आहे. याबद्दल तुमचा नेमका मतभेद कुठे आहे? कारण त्यांच्याकडून असेही सांगितले जात आहे की, काँग्रेसने मागील ५० वर्षांत जे केलं नाही ते गेल्या पाच वर्षांत आम्ही केले आहे.

– शेखर, मी तुम्हाला म्हणालो होतो ना, मुलाखत घेण्यासाठी आताची वेळ अतिशय अयोग्य आहे.

**प्रश्न –** नाही. आताची वेळ अधिक योग्य आहे, निवडणुकीच्या पूर्वसंध्येपेक्षा...

– इथे आपली मतभिन्नता आहे, हे तुम्हाला माहीत आहे– आता जर निवडणुकीचा काळ नसता तर या मुलाखतीत सांगण्यासारखे माझ्याकडे खूप काही होते...

**प्रश्न –** तुम्ही एक काँग्रेसमन आहात, मग निवडणुकीच्या पूर्वसंध्येला तुम्ही का बोलत नाही आहात?

– मी आता बोललो तर पक्षाचा तो प्रचार होईल. आणि तो प्रचार करायचा असेल तर मी तुमच्याशी बोलण्यापेक्षा रामलीला मैदानावर जाऊन भाषण करणे योग्य नाही का?

**प्रश्न –** सध्या सर्वत्र जे काही चालू आहे तो प्रचारच आहे. तर एका काँग्रेसमनने शांत राहण्यात काय अर्थ आहे, आताच्या या काळात?

– तुम्ही एखादा मुद्दा सार्वजनिक विचारपीठावरून मांडता तेव्हा त्याचा चुकीचा अर्थ घेतला जातो, आणि आता मला तसं होऊ द्यायचं नाहीये. मी आता तुमच्याशी बोलतोय तर मला शक्य तेवढे अचूक बोलण्याची इच्छा आहे. गांभीर्याने पत्रकारिता करणाऱ्या व्यक्तीशी मी तसेच बोलले पाहिजे. मी जेव्हा माझ्या मतदारांशी बोलतो तेव्हा आम्ही केलेल्या प्रगतीबद्दल थोडेसे वाढवून सांगणं साहजिक असतं...

**प्रश्न –** तुम्ही इथे वाढवून काही सांगू नका, हे मी थोडं वेगळ्या शब्दांत सांगतो. तुम्ही मला पूर्वी असं सांगितलं होतं की, सध्या जे काही घडतं आहे तो भारतातील आर्थिक सुधारणा कार्यक्रमांचा कदाचित तिसरा अध्याय आहे..

– हो, बरोबर.

**प्रश्न –** आणि पहिला व दुसरा अध्याय पूर्ण झाल्याशिवाय तिसरा अध्याय लिहिता आला नसता, यात तर काही वाद नाही?

– पण आणखी एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे. पहिला अध्याय कसा लिहिला गेला, तर शून्यापासून एकपर्यंत, कदाचित उणेपासून एकपर्यंत. एखादा माणूस जेव्हा ५०

वरून १०० वर आलो असं म्हणतो, तेव्हा दुप्पट झालो असा त्याचा अर्थ असतो. पण जेव्हा कोणी शून्यापासून एकपर्यंत येतो, तेव्हा ते किती पट झाले?

**प्रश्न –** ते अनंत असते...

– बरोबर, अनंत. आणि ते काम यू-टर्न न घेता यू-टर्न घेतल्यासारखे असते तेव्हा? आता तुम्हाला असा प्रश्न विचारला पाहिजे की, अवघड गोष्ट कोणती होती?

**प्रश्न –** निश्चितच, बदल करणे खूप अवघड आहे, तो गाडा वेगात चालवण्यापेक्षा...

– म्हणूनच म्हणतोय, त्यांच्या या दाव्याला फारसा अर्थ नाही... ते घडणारच होतं.

**प्रश्न –** तर आम्हाला आता हे थोडे विस्ताराने सांगा की, शून्यापासून एक पर्यंत जाणं ही प्रक्रिया नेमकी काय होती? आम्हाला १९९१ मध्ये घेऊन चला, जेव्हा तुम्ही सत्तेवर आलात आणि तुम्हाला एका मोठ्या आव्हानाचा सामना करायचा होता. आणि हा जो मोठा बदल करायचा होता, तो तुम्ही कसा केलात?

– तार्किक दृष्टीने विचार केला तर आम्ही अशा एका कोऱ्या भिंतीवर येऊन थांबलो होतो, जिथून पुढे करण्यासारखं काहीच नव्हतं. आमच्याकडे पैसे नव्हते, आपली दिवाळखोरी जाहीर करायला केवळ दोन आठवड्यांचा अवकाश होता. आणि तुम्ही कल्पना करा, भारत देश दिवाळखोर झाला याचा अर्थ काय ठरला असता? त्याआधी आपण कर्जाचे हप्ते नियमितपणे चुकवत होतो, ते आपले रेकॉर्ड होते. पण जेव्हा तुम्ही दिवाळखोर निघता, तेव्हा तुमची संपूर्ण अर्थव्यवस्था, तुमचा सन्मान, आंतरराष्ट्रीय जगतातील तुमचे स्थान, हे सर्व रसातळाला जाते. जगाला तोंड दाखवण्यासाठी तुम्हाला जागा राहत नाही..

**प्रश्न –** तुम्ही जन्मभर समाजवादी राहिलात किंवा असं म्हणू या की, तुम्ही नेहरू कालखंडाचे प्रॉडक्ट होता. तर तुम्हाला असं केव्हा लक्षात आलं की, जग बदलले आहे तर हे सर्व बदलले पाहिजे? तुम्ही सत्तेवर आल्यावर पहिल्या दोन आठवड्यांतच हे कळलं, की डॉ.मनमोहन सिंग यांच्याशी बोलणं झाल्यावर कळलं?

– लक्षात घ्या, नेहरू ही अशी व्यक्ती होती ज्यांनी सांगितलं होतं की ते नेहरूवादी नाहीत. गांधी अशी व्यक्ती होती, ज्यांनी ठामपणे सांगितलं 'मी गांधीवादी नाही.' हे वादी असणे आता गोठून गेले आहे. गांधी हे स्थितीवादी कधीच नव्हते, नेहरूसुद्धा स्थितीवादी नव्हते. हे लक्षात घ्या की, संपूर्ण कृषिक्षेत्र नेहरूंनी खाजगी म्हणून का ठेवलं? अनेक लोक हा मुद्दाच लक्षात घेत नाहीत...

**प्रश्न –** आणि लेनिन किंवा बेन गुरियन यांच्या मार्गाने जाण्याचेही नेहरूंनी टाळले...

– अगदी बरोबर. नेहरूंनी हे अनेक वेळा सांगितलं की, तुम्ही समाजवादाबद्दल बोलत असाल तर गैरसमज करून घेऊ नका. समाजवाद हा आयात करण्यासारखा प्रकार नाही, तो इथल्या परिस्थितीतून उत्क्रांत झाला पाहिजे. तर हा मुद्दा, नेहरू काय करू इच्छित होते यासंदर्भात कायम लक्षात ठेवला पाहिजे. आणि आता आम्ही जे काही करीत आहोत ते नेहरूंच्याच मार्गाने पुढे जाणे आहे...

**प्रश्न –** म्हणजे तुमच्यासाठी हे प्रचंड मोठे पाऊल नव्हते, मोठी उडी नव्हती? चिनी अर्थव्यवस्थेसंदर्भात डेंग झिओपिंगने जी मोठी उडी (ग्रेट लीप) मारली तसे हे नव्हते का?

– नाही, माझ्यासाठी तरी नाही. १९९२ मध्ये तिरुपती येथे झालेल्या काँग्रेस अधिवेशनातील माझे अध्यक्षीय भाषण तुम्ही वाचायला हवे. नेहरूंपासून मागोवा घेत आम्ही जे काही करत आहोत त्याबद्दल मी त्यात बोललो आहे. आणि त्यामुळे, आम्ही अचानक बदल केला किंवा यू-टर्न घेतला असे कोणीही म्हणू शकणार नाही. या देशाला यू-टर्न परवडणार नाहीत, कधीच परवडणार नाहीत...

**प्रश्न –** तर आता हे सांगा, यू-टर्न न घेता यू-टर्न घेतल्यासारखे काम करणे हे कसे घडवले जाऊ शकते? ती खास नरसिंहराव यांची कला आहे.

– नाही, नाही, ते तसे नाही. तुम्ही जर हे समजून घेतले की, आपण ज्या जागेवर उभे आहोत ती जागाच गतिमान आहे तर वळण घेणे सोपे होते. आपण स्थिर (static) नसतो, मी आत्ताच तुम्हाला सांगितलं तुम्ही स्टॅटिक नाही, नसताच.

**प्रश्न –** तर तुमच्या मनात अशी अजिबात भावना नाही का की, आपण पूर्वीची धोरणं मागे सोडून आलो? चाळीस वर्षे ज्याच्यावर विश्वास होता ते मागे सोडून एक नवा मार्ग पत्करला असं नाही वाटत?

– हो, तसं वाटतं तर आहे. पण मला असं वाटतं की, आपली वाढ होत आहे तर पन्नास वर्षांपूर्वीचे कपडे वापरून पुढे जाऊ शकत नाही.

**प्रश्न –** पण हे सर्व करताना तुमच्या मनात काही शंका होत्या, साशंकता होती?

– या प्रकारच्या नव्या क्षेत्रात कोणीही प्रवेश करतो तेव्हा त्याला पूर्ण खात्री बाळगता येत नाही. एखादा मूर्ख माणूसच अशी खात्री बाळगू शकेल. तुम्हाला सभोवताली पहातच चालावे लागते, डावीकडे आणि उजवीकडे, पुढे आणि मागे. सर्व प्रकारच्या धोक्याच्या जागाही काळजीपूर्वक पहाव्या लागतात, सर्वकाळ. आणि तुम्ही तसे केले नाहीत– विशेषतः नव्या क्षेत्रात प्रवेश करताना सुरुवातीच्या काळात– तर तुम्ही संकटात सापडणारच!

**प्रश्न –** तर आता सांगा, तुम्हाला कोणती अशी छिद्रं सापडली होती, धोक्याच्या जागा दिसल्या होत्या आणि त्या तुम्ही टाळल्यात?

– मला नाही वाटत ते सांगण्यासाठी ही एक मुलाखत पुरेशी होईल.

**प्रश्न –** हरकत नाही, तुमचे नवीन पुस्तक येईपर्यंत आपण वाट पाहू. मी असं गृहीत धरलं आहे की, त्या पुस्तकात आयोध्या प्रकरणाबद्दल जास्त असेल.

– नाही, ते सर्व गोष्टींबद्दल असेल. हा विषय एका स्वतंत्र पुस्तकाचा आहे एका मुलाखतीचा नाही.

**प्रश्न –** मला सांगा, तुम्ही निश्चितच त्या काळात काळजीत असाल सामाजिक सुरक्षा आणि बेरोजगारीबद्दल?

– हो अर्थातच! आम्ही बोलत होतो मानवी चेहऱ्याबद्दल, मात्र तुम्ही मला त्याविषयी कधीही विचारले नाही. लोकांनीसुद्धा कधीही विचारलं नाही की, मानवी चेहरा असला पाहिजे यासाठी आम्ही काय विचार करत होतो?

**प्रश्न –** आर्थिक सुधारणांबद्दल?

– हो, व्हाईट कॉलर लोकांनी मानवी चेहऱ्याबद्दल मला कधीच विचारले नाही. ते असे म्हणत राहिले की नव्या सुधारणांमुळे ते आनंदी आहेत, त्यांच्या उत्पन्नात वाढ झाली आहे. छानच, ज्यांचे सर्व व्यवस्थित चालू होते ते कोणी काही बोलत नव्हतं. परंतु अन्य माणसांबद्दल काय, हा माझा प्रश्न होता. जी माणसं मागे राहिली त्यांचे काय? कदाचित तो तुमचा चुलतभाऊ असेल, कदाचित तो तुमचा पुतण्या असेल जो खेड्यामध्ये थांबलेला आहे, तर तुम्ही त्याच्याबद्दल काय विचार करत आहात? त्याच्या भविष्याबद्दल काय विचार केलाय? अशा काही गोष्टी होत्या ज्यांचा हिशोब करायचाच होता. राष्ट्र म्हणजे एक छोटासा समूह नव्हे. राष्ट्र म्हणजे या देशातील सर्व लोक. माझ्या मागील तीस वर्षांच्या काळात जास्त करून मी दिल्लीतच राहिलो, पण मी हे कधीही विसरलो नाही की मी कुठून आलो आहे, मी कुठे जन्माला आलो आहे, माझ्या वंगारा जिल्ह्यात जे काही घडतंय त्याकडे मी दुर्लक्ष करू शकलो नाही.

**प्रश्न –** तुम्ही हा मोठा बदल किंवा यू-टर्न मॅनेज केला तेव्हा तुम्हाला अनेक वेगवेगळ्या लोकांच्या शंकांचा सामना करावा लागला, त्यासाठी देवाण-घेवाण करावी लागली असेल.

– मला नाही वाटत, मी ते मॅनेज केले. मी वास्तव परिस्थितीचा सामना करत होतो, तिचा स्वतःचा असा एक परिणाम होता आणि स्वतःची अशी एक गती होती. डॉ.मनमोहन सिंग यांनी त्यांचे सर्वोत्तम प्रयत्न केले, आर्थिक सुधारणा कार्यक्रम पुढे रेटण्यासाठी. मी त्यांच्यामागे खडकाप्रमाणे भक्कम उभा राहिलो, त्यांना राजकीय पाठिंबा देण्यासाठी, ठामपणे मात्र संयमितपणे. तर हे एक प्रकारचे टिमवर्क होतं

**प्रश्न –** 'वॉक द टॉक'च्या या कार्यक्रमात डॉ.मनमोहन सिंग यांना काही काळापूर्वी बोलावलं होतं, तेव्हा त्यांनी वर्णन केलं होतं की, किती शांतपणे रुपयाचे अवमूल्यन त्यांनी तीन टप्प्यांत घडवून आणलं होतं, अगदी थोड्या काळात. ते रिझर्व बँकेच्या गव्हर्नरकडे गेले, कारण तोपर्यंत तुमच्या सरकारवरील विश्वासदर्शक ठराव संमत झालेला नव्हता. आणि अर्थात तुम्ही त्यांना सांगितलं होतं की, 'सर्व काही व्यवस्थित घडणार असेल तर पुढे चला, मात्र चूक झाली तर त्याची किंमत तुम्हाला चुकवावी लागेल अर्थमंत्री या नात्याने.'

– नाही, मी त्यांना अशा प्रकारे सांगितलं नव्हतं. आपणा सर्वांना त्याची किंमत चुकवावी लागेल, असे मी बोललो होतो. कारण ती जबाबदारी काही केवळ अर्थमंत्र्यांची नसते, पंतप्रधान आणि अर्थमंत्री या दोघांचीही असते. पंतप्रधानांनी अर्थमंत्र्यांना आवश्यक तिथे राजकीय पाठिंबा द्यायचा असतो, संरक्षणकवच बहाल करायचं असतं, जर त्याला गरज असेल तर. आणि अर्थमंत्री त्या क्षेत्रातील विशेषज्ञ असल्याने मी त्यांच्या कामात हस्तक्षेप करीत नव्हतो. अर्थात जेव्हा काही उलटणार आहे असं मला वाटलं, तेव्हा मी त्यांना तसे सांगत होतो आणि मी दिलेला इशारा ध्यानात घेऊनच ते पुढील कार्यवाही करीत होते.

**प्रश्न –** पण असेही काही प्रसंग घडले, जेव्हा तुम्ही त्यांना मागे खेचले, विशेषतः सबसिडी कमी करण्याच्या संदर्भात त्यांनी निर्णय घेतले तेव्हा.

– अगदी बरोबर. अनेक प्रसंगी मी त्यांना प्रोत्साहित केलं जेव्हा ते बचावात्मक पवित्र्यात होते. आणि जेव्हा लोकांनी त्यांच्यावर हल्ला केला तेव्हा मी म्हणालो, ‘अर्थमंत्र्यांवर टीका करू नका, करायचीच असेल तर माझ्यावर करा. कारण अर्थमंत्री हे राजकारणी नाहीत, त्यांना त्यांचे काम करू द्या.’ तर लोकांना मॅनेज करणं हा प्रश्न मात्र होता.

**प्रश्न –** ही तर जास्त इंटरेस्टिंग गोष्ट आहे. सुधारणा दोन लोकांनी केल्या, त्यापैकी एक राजकारणी होता अर्थतज्ज्ञ नव्हता आणि दुसरा अर्थतज्ज्ञ होता राजकारणी नव्हता.

– ते क्रिकेटसारखं होतं.. क्रिजवरील एक खेळाडू टिकून राहत होता, जास्त धावा काढत नव्हता आणि दुसऱ्याला स्ट्राईक देऊन फटकेबाजी करत स्कोअर वाढवायला प्रोत्साहन देत होता..

**प्रश्न –** तर या प्रक्रियेत कोण बाजू लावून धरत होतं आणि कोण फटकेबाजी करत स्कोअर वाढवत होतं?

– अर्थातच, मी दुसरी बाजू लावून धरली होती आणि मनमोहन सिंग स्कोर वाढवत होते. कारण राजकीय बाजू टिकवून ठेवणं आवश्यक होतं, तरच दुसऱ्या बाजूच्या खेळाडूला त्याची उत्तम कामगिरी करता येणार होती. आणि मला असं वाटतं, डॉ.मनमोहन सिंग यांनी ते काम सर्वोत्तम प्रकारे केले आहे.

**प्रश्न –** तुम्हाला असा एखादा प्रसंग आठवतोय, जेव्हा तुम्ही खूप विचार केला होता, अमुक गोष्ट करावी की करू नये यासाठी.

– तुम्ही जर एखाद्या नाजूक प्रश्नाचा सामना करत असाल तर त्या प्रश्नाला दोन बाजू असतात, तुम्हाला त्यात तोल साधावाच लागतो. हा मध्यममार्ग बुद्धापासून आपल्यापर्यंत चालत आला आहे. पंडित जवाहरलाल नेहरू यांनी तो मध्यममार्ग उत्तम प्रकारे आत्मसात केला होता आणि त्यामुळेच आपण वाचलो आहोत, कोणत्याही एका टोकावर जाण्यापासून, संकटामागून संकटे आली त्यापासून. त्यामुळे अनेक बाबतीत आपण चुका टाळल्या आहेत, अनेक प्रकरणांत चुका टाळल्या आहेत. पण जेव्हा अशा चुका घडत नाहीत, तेव्हा त्याच्या बातम्या होत नाहीत. आणि ही खरी मोठी स्टोरी आहे.

**प्रश्न –** मला तुमची दोन्ही वर्णनं आवडली. यू-टर्न न घेता यू-टर्न घेतल्यासारखं काम करणे आणि ज्या जागेवर उभे आहोत ती जागा गतिमान असणे. खास नरसिंह राव यांच्या पद्धतीप्रमाणे.

– तुम्ही याच्याशी सहमत नाही?

**प्रश्न –** हो, निश्चितच सहमत आहे.

– पण त्या काही मी निर्माण केलेल्या संज्ञा नाहीत, मी त्यांच्यावर दावा करू शकत नाही, तो कॉपीराईट माझा नाही. त्या संकल्पना फार पूर्वीपासून आहेत. आपल्या तत्त्वज्ञांनी ते सांगितले आहे. आधुनिक तत्त्वज्ञांनी असे सांगितले आहे की, काळ हा नेहमीच प्रवाही असतो तो थांबणारा नसतो. तुम्ही मुलाखत घ्यायला येथे आला आहात, तेव्हापासून आतापर्यंत आपण अनेक क्षण पाहिले आहेत. त्यापैकी कोणताही एक क्षण तुम्ही मागे घेऊन येऊ शकणार नाही. त्यामुळे ती एक डायनॅमिक परिस्थिती आहे, सतत बदलणारी परिस्थिती, हा भाग वेगळा उघड्या डोळ्यांना दिसत नाही.

**प्रश्न –** तर मिस्टर राव, भारतामध्ये परिस्थिती इतकी वेगाने बदलेल, अशी तुम्ही कल्पना केली होती? १९९१ मध्ये तुम्ही बदल करत होता तेव्हा, २००४ मध्ये काय असेल याची कल्पना तुम्ही केली होती?

– २००४ मध्ये काय असेल याची मी तेव्हा कल्पना करू शकत नव्हतो. अर्थात करायचीच असेल तर २०१० मध्ये काय होऊ शकते, याचीही कल्पना करू शकलो असतो. पण मी पुरेसा वास्तववादी होतो, त्यामुळे मला माहीत होतं, २००४ हे वर्ष गेल्याशिवाय २०१० पर्यंत तुम्ही जाऊ शकणार नाही. आणि तेव्हाही मला लोक विचारणारे होतेच, विशेषतः जेव्हा मी सिंगापूरला गेलो भाषण देण्यासाठी (सप्टेंबर १९९४ मध्ये) तेव्हा खूप गदारोळ आणि आक्रोश होता. अनेक दैनिकांची संपादकीय आणि ऑडिटरची स्टेटमेंट होती. मी उत्तर दिले नाही. त्या प्रश्नांची उत्तरं सिंगापूरचे पंतप्रधान ली क्यूँ यांनी दिली.

**प्रश्न –** ते काय म्हणाले होते?

– जे बोलले ते इंटरेस्टिंग होते. ‘लंडनमध्ये बसून तुम्हाला भारत देश चालवता येणार नाही, तुम्हाला तुमच्या स्वतःच्या कल्पना निर्माण कराव्या लागतील, राबवाव्या लागतील. त्यामुळे खूप टीका करत बसू नका, कारण राव यांना माहीत आहे बूट कुठे चावतो आहे.’ तेव्हा मी कल्पना केली नव्हती, माझ्यापेक्षा एका ज्येष्ठ राजकीय नेत्यांकडून मला असा पाठिंबा मिळेल.

**प्रश्न –** तुम्हाला तुमच्या पक्षाने तुमचं श्रेय दिलं असं वाटतं? पहिलं या आर्थिक सुधारणा तुम्ही घडवल्या त्याचं आणि दुसरं पाच वर्षे ते सरकार चालवलं त्याचं?

– मी रोजंदारीवर काम करणाऱ्या माणसासारखे वागू

शकत नाही, म्हणजे मला आणखी रोजंदारी वाढवून द्या असं म्हणू शकत नाही. आणि मला माझ्या पक्षाने देण्याचं काय बाकी ठेवलं आहे? आणि देशानेसुद्धा मला आणखी किती द्यायला हवं?

**प्रश्न –** मी मागील पाच वर्षांबद्दल बोलतोय जेव्हा तुम्ही सत्तेवर नव्हता.

– तो प्रश्न मागील पाच वर्षांचा किंवा २५ वर्षांचा नाही. तुम्ही कल्पना करा, सर्वाधिक काळ काम केलेल्या माणसांपैकी मी आहे. आता नव्या लोकांनी, तरुण लोकांनी पुढे आलं पाहिजे आणि जबाबदारी स्वीकारली पाहिजे.

**प्रश्न –** जरा वास्तववादी होऊ या. मागील पूर्ण सहा वर्षे तुमचा पक्ष तुमच्याशी जवळीक ठेवत नाहीये, तुमचे पक्षाशी नाते तितकेसे चांगले राहिलेले नाहीये.

– माझ्या पक्षाच्या संदर्भात माझ्या मनात कसल्याही प्रकारची अढी नाही, नाराजी नाही.

**प्रश्न –** आता पहिल्यांदाच असे घडले की, काँग्रेसच्या (लोकसभा निवडणूक) जाहीरनाम्यावर तुमचा फोटो आहे.

– त्याने काही फरक पडत नाही. तुम्हाला माहिती आहे का, माझ्या पाच वर्षांच्या कार्यकाळात सार्वजनिक ठिकाणी माझे फोटोग्राफ्स कधी दिसत नव्हते, म्हणजे रेल्वे स्टेशन्स, विमानतळ किंवा व्हीआयपीच्या जागा अशा ठिकाणी.

**प्रश्न –** मी असे ऐकले आहे की, काही लोक असा विचार करताहेत की, तुमचे नाव, तुमचे चित्र, तुमचे व्यक्तिमत्व ही पक्षासाठी आता मालमत्ता बनली आहे, या निवडणुकीमध्ये?

– त्याने काही फरक पडत नाही. १९९२ मध्ये निवडणुका नव्हत्या आणि ९३ मध्येसुद्धा, त्यामुळे जर १९९५ मध्ये त्यांनी तसं केलं असतं, तर मी समजू शकत होतो. खरा मुद्दा हा आहे की, काही लोक त्याकडे खूपच जाणीवपूर्वक व काळजीपूर्वक पाहतात आणि वेगवेगळे अर्थ लावतात. मला त्या गोष्टीत रस नाही.

**प्रश्न –** पण तुमचा अनुभव लक्षात घेता आणि राजकारणात तुम्ही तितकेसे वृद्धही नाही.

– मी आता ८४ वर्षांचा आहे, राजकारणात वृद्ध कोणाला म्हणायचं?

**प्रश्न –** भारतातील परंपरा लक्षात घेता, वयाच्या ८० नंतरसुद्धा लोक पंतप्रधान बनण्याची आकांक्षा बाळगतात आणि तुमच्याकडे तर शहाणपण आहे, तुम्ही ॲलर्ट आहात.

– मुद्दा असा आहे की, मोरारजी देसाई वयाच्या ८० नंतर पंतप्रधान झाले, पण मी झालेच पाहिजे असे नाही.



**प्रश्न –** तुम्ही पंतप्रधान होऊ इच्छित नाही, पण तुम्ही भीष्मपितामह तर बनू शकता किंवा कौटिल्य? तुमच्या पक्षाने तुमच्या अनुभवाचा उपयोग करून घेतला पाहिजे.

– मला याचा आनंद आहे की, मला लिहिण्यासाठी भरपूर वेळ मिळतो आहे, जो नष्ट होणार आहे जर मी सक्रिय राजकारणात राहिलो तर. लक्षात घ्या, आपल्या व्यक्तिमत्त्वातील विशिष्ट अनुभव हे अमूल्य असतात. तुम्हाला फक्त ते कळत नाही की, ते बाहेर कसे आणायचे? आणि वर्तमानपत्रांबद्दल बोलत असाल तर, त्यांच्याशी जेवढे कमी बोलाल तेवढे ते चांगले ठरते.

**प्रश्न –** तुम्ही तसे का म्हणता?

– कारण वर्तमानपत्रांमध्ये सतत धोका असतो, मोडतोड करून विधाने वापरली जाण्याचा. आणीबाणीचा कालखंड समोर ठेवा, जे काही घडले ते चुकीच्या पद्धतीने मांडले गेले. तुम्हाला असं वाटतं का की, आणीबाणी ही फक्त अनेक चुकांनी भरलेली होती, बाकी त्यात काहीच नव्हतं. मला त्यात दुरुस्ती करायला हवी, कारण मी त्या काळात जगलो आहे.

**प्रश्न –** पण सोनिया गांधींनीसुद्धा हे कबूल केले आहे की, आणीबाणी ही चूक होती..

– ते असू द्या...

**प्रश्न –** सोनियाजी असं म्हणाल्या की, इंदिरा गांधींनाही ती चूक लक्षात आली होती आणि ते बोलणं डायनिंग टेबलवरचं होतं.

– मला इंदिरा गांधींनी थेट काय सांगितलं ते मी सांगू शकतो.

**प्रश्न –** अलीकडच्या काळात पक्षाच्या वरिष्ठ नेतृत्वाने तुमच्याशी संपर्क साधला आहे, तुमचे काही मत विचारले आहे?

– माझ्याशी संपर्क या ना त्या प्रकारे साधण्याची गरज आहे असं मला वाटत नाही, त्यासाठी काही कारणही नाही. त्यांच्याकडे त्यासाठी वेगळी माणसं/रणनितीकार असतीलच. आणि मला हे कसं कळणार की, माझ्याशी संपर्क साधण्यासाठी तुम्हाला अन्य कोणी पाठवलेलं नाही?

**प्रश्न –** तुम्ही सत्तेवरून पायउतार झालात त्याला आता सहा वर्षे झालीत.

– सहा नाही, आठ वर्षे.

**प्रश्न –** आठ वर्षांत तुमचा बराच जास्त वेळ आणि ऊर्जा कशात खर्च झाली, तर तुमच्यावरील भ्रष्टाचाराचे आरोप व खटले लढण्यासाठी. त्यातील काही अत्यंत मूर्खपणाचे आहेत याबद्दल मी पूर्वी बोललोच आहे. तर तुम्ही हे सर्व तात्त्विक दृष्टीने हाताळता की, तुम्हाला हे सर्व त्रासदायक वाटते?

– ते हाताळण्याचा अन्य मार्ग कोणता असू शकतो? मी जे काही केलं त्यापेक्षा वेगळ्या पद्धतीने करू शकलो असतो, असं तुम्ही मला सांगू शकाल? मी हे करायलाच पाहिजे होतं आणि केलं नाही, असं तुम्ही सांगत असाल तर मी ऐकायला तयार आहे.

**प्रश्न –** आज तुम्ही ८४ वर्षांचे आहात आणि तुमच्यावर खटले दाखल झाले तेव्हा तुम्ही ७६ वर्षांचे होता, म्हणजे तुमच्या राजकीय आयुष्यातील आठ वर्षे या खटल्यांनी घेतली आहेत.

– ते ठीक आहे, त्याने फरक पडत नाही. कोणत्याही खटल्यात तुम्ही काय करू शकता? जर एक खटला असेल, दुसरा खटला असेल, तिसरा खटला असेल तर त्यापासून दूर जाता येत नाही, पळून जाता येत नाही, लपवता येत नाही.

**प्रश्न –** परंतु काही लोक सांगतात ते मी जरा पत्रकारितेतील सुलभतेने सांगतो की, तुमच्या पक्षाने तुम्हाला वाऱ्यावर सोडून दिलं. आणि सांगितलं की हे खटले तुमच्यावर झाले आहेत, तुम्ही ते हाताळा; आम्ही आता पुन्हा गांधी घराण्याकडे जात आहोत.

– मी राजीनामा दिला त्याच दिवशी (याला साक्षीदार देऊ शकेन) मी हे सांगितलं होतं की, हे खटले माझ्यावर झाले आहेत. याचा परिणाम पक्षावर होऊ नये, माझ्यावरील घटल्याची सावली पक्षावर पडू नये.

**प्रश्न –** निश्चितच. तुम्ही खरं तर भारताच्या न्यायव्यवस्थेसंदर्भात असे म्हणू शकत होता आणि खटल्यांना या ना त्या प्रकारे सेटल करू शकत होता. परंतु एका निष्पाप माणसाची राजकीय आयुष्यातील आठ वर्षे अशा पद्धतीने ओरबाडली जाणं हे योग्य नव्हते.

– ठीक आहे, तुम्ही माझी केस मांडत आहात, पण मी तर तुम्हाला नियुक्त केलेले नाही. तो सर्व माझ्या आयुष्याचा भाग आहे आणि आपल्या आयुष्यात सापशिडीचा खेळ असतोच. आपल्या आयुष्यात फक्त शिडी नसते आणि जेव्हा शिडीतून तुम्ही वर जाता तेव्हा तुम्ही असं म्हणत नाही की, अनेक वेगवेगळ्या घटकांमुळे मी या स्थानापर्यंत आलो आहे. तसे म्हणणे योग्य नसते. तसेच ही दुहेरी जबाबदारी घेतली पाहिजे, सापाच्या तोंडातून खाली येण्याची आणि

शिडीवरून वर जाण्याची.

**प्रश्न –** तर तुम्हाला असं वाटत नाही का, की तुमच्या आयुष्यातील मागील आठ वर्षे वाया गेली.

– नाही, मला नाही वाटत ती वर्षे वाया गेली. हो, ती एका क्षेत्रामध्ये वाया गेली असतील, पण दुसऱ्या क्षेत्रामध्ये उपयोगाला आली. ज्या माणसाला अनेक क्षेत्रांत रस आहे कमी–अधिक प्रमाणात, त्या माणसासाठी असे एखादे क्षेत्र ज्याने त्याला बांधून ठेवलं होतं ते मागे पडलं ही इष्टापत्तीच असते. तुम्हाला नाही वाटत, त्यामुळे एक प्रकारचा रिलीफ मिळाला असेल मला? बढाई मारत नाही. मी फारच...

**प्रश्न –** फिलॉसॉफिकल.

– नाही. फिलॉसॉफिकल नाही, मी वास्तववादी (realistic) आहे. तुम्ही लक्षात घ्या, आमच्या काळात राजकारण हे करिअर नव्हतं. माझी सुरुवात झाली ती विद्यार्थी चळवळीपासून. विद्यार्थी चळवळीचे रूपांतर राजकीय चळवळीत होते तेव्हा तुम्ही काय अपेक्षा करता?

**प्रश्न –** काही लोक असे म्हणतात– त्यामध्ये तुमच्या पक्षातील टीकाकारही आहेत– की मागील पाच वर्षांत तुम्ही जे न्यायालयीन खटले सहन करीत आला आहात, तो सर्व प्रकार म्हणजे आधीच्या काळात– विशेषतः हवालाकांडमध्ये तुम्ही जे काही केलं त्याची किंमत चुकवत आहात किंवा शिक्षा भोगत आहात. किंवा तुम्ही स्वपक्षीय नेत्यांसोबत ज्या पद्धतीने वागलात त्याची परतफेड करीत आहात.

– मला तसे वाटत नाही, कारण हा सर्व अपप्रचार आहे. ऐतिहासिक व वस्तुनिष्ठ दृष्टीने पाहिले तर हे सर्व चूक आहे. अर्थात, निराधार आरोपांचा सामना करण्यासाठी तुम्हाला तयार राहिलं पाहिजे. कारण फक्त तुम्हाला हे माहीत आहे की ते सर्व आरोप निराधार आहेत, संपूर्ण जगाला ते माहीत नाही. पण प्रत्यक्षात काय घडले त्यानुसार ते खटले पुढे जातात.

**प्रश्न –** वरील आरोपांना तुम्ही निराधार म्हणत आहात, तर तुम्ही असं म्हणू शकाल का की, हवाला प्रकरणासंदर्भात काही नेत्यांवर झालेले आरोपी तुमच्यावर झालेल्या आरोपांप्रमाणेच निराधार आहेत?

– न्यायालयाला सापडले तेवढे ते आरोप निराधार आहेत. त्यापेक्षा अधिक काही नाही. त्या सर्व प्रकरणाच्या बारीक व वस्तुनिष्ठ तपशिलात तुम्ही गेलात की नाही, हे मला माहीत नाही. पण मी अशा एका क्षेत्रात आहे जिथं मी स्वतःवरील आरोपांचे पूर्णतः स्पष्टिकरण देऊ शकत नाही. लक्षात घ्या, दोन क्षेत्रं आहेत, एक कायद्याचे आणि दुसरे राजकारणाचे. त्या दोन्हीमध्ये बरंच साम्य असतं, परंतु ते एकसारखे नसतात. डावपेच सारखे नसतात, निष्कर्ष सारखे नसतात, लढलेले तर्क सारखे नसतात. त्यामुळे परिप्रेक्ष्य पाहायचा असेल तर तुम्हाला दोन्ही क्षेत्रांचा परिचय असला पाहिजे आणि हे ओळखायला शिकले पाहिजे की, राजकीय दृष्टीने योग्य ठरलेला निर्णय हा कायदेशीर दृष्टीने अयोग्य ठरू शकतो. हो, हे शक्य आहे.

**प्रश्न –** म्हणजे हवाला केसेसमध्ये तुम्ही राजकारण खेळत नव्हता?

– बिलकुल नाही.

**प्रश्न –** तुमच्या पक्षातील काही लोक असा विचार करतात की, आव्हानं देणाऱ्या लोकांना दूर करण्यासाठी तुम्ही तो मार्ग अवलंबला होता.

– कोण, कोण, कोण म्हणतात तसे?

**प्रश्न –** हवाला प्रकरणात अडकलेले सर्वजण तसे म्हणतात...

– कोण?

**प्रश्न –** हवाला प्रकरणात आरोप झाले ते सर्व जण तसे म्हणतात.

– अडवाणींच्यासह सर्वजण?

**प्रश्न –** हो, अर्थातच.

– हां, हां.

**प्रश्न –** ते निश्चितच विचार करतात की, तुम्ही त्यांना आरोपीच्या पिंजऱ्यात अडकवलं.

– तुम्ही मला मी आहे त्यापेक्षा फारच जास्त शक्तिशाली दाखवत आहात. मी त्या जागेवर फक्त पाच वर्षे आणि तेही अनपेक्षितपणे आलो होतो आणि मला नाही वाटत त्या पाच वर्षांत मी कुटिलनीती विकसित केली. जे लोक मला ओळखतात त्यापैकी कोणीही तुम्ही सांगताय तसे आरोप सदृश्य किंचितही कधी म्हटलेले नाही.

**प्रश्न –** पण लोक असे म्हणतात की, आयोध्या प्रकरणामुळे लालकृष्ण अडवाणी यांच्यावर तुम्ही खूप रागावला होता.

– मी कुणावरच रागावलो नव्हतो. एखाद्या चांगल्या राजकीय नेत्याला, चांगल्या प्रशासकाला राग येण्याचे काहीच कारण नाही. तुम्ही चोरावर रागावू शकता, पण तो तुमची पर्वा करत नाही. तो त्याचं काम करेल आणि तुम्हाला तुमचं काम केलं पाहिजे, बस्स एवढेच.

**प्रश्न –** पण मला हीसुद्धा भर टाकू द्या की, अडवाणींनी एका टप्प्यावर तुमची प्रशंसा केली आहे. ते असे म्हणाले की, लालबहादूर शास्त्री यांच्यानंतरचे सर्वोत्तम पंतप्रधान तुम्ही आहात.

– मी त्यांचा आभारी आहे आणि मला खात्री आहे, त्यांच्या त्या टिप्पणीमध्ये काही तरी गर्भितार्थ दडलेला असेल. आणि अर्थातच, याच्या उलटही काही लोकांनी म्हटलेले आहे, अनेक वेळा.

**प्रश्न –** पण शास्त्री आणि तुम्ही यांच्यात इंदिरा गांधी येतात, मला वाटतं तुम्ही त्यांचे कौतुक जास्त केले आहे.

– हो, माझा इंदिरा गांधींवर विश्वास होता, कारण त्या प्रत्यक्ष बदलांच्या अग्रदूत होत्या. पंडित जवाहरलाल नेहरू यांच्यावर विश्वास होता, कारण त्यांनी बदल कसे करायचे हे दाखवलं. अर्थात त्यांना स्वतःला ते बदल करण्यासाठी पुरेसा वेळ मिळाला नाही.

**प्रश्न –** पण इंदिरा गांधी अधिक विशेष का आहेत?

– कारण त्या योद्ध्या होत्या, जसे आपल्याकडे लढवय्ये सैनिक असतात तशा त्या होत्या. हैदराबादच्या निजामाच्या गोळ्यांचा सामना ज्या विद्यार्थ्यांनी केला ते इंदिरा गांधींचे कौतुक करणारच. त्यांनी केलेला संघर्ष तुरुंगात जाणं आणि सर्व प्रकारच्या सुविधांसह राहणे आणि परत येणे या प्रकारचा नव्हता. निश्चितच नव्हता.

**प्रश्न –** आणीबाणीच्या काळात जे लोक तुरुंगात गेले त्यांच्यासंदर्भात तुम्ही हे बोलताय का?

– नाही, बिलकुल नाही. मुद्दा आहे एका संघर्षापासून दुसरा संघर्ष वेगळा कसा असतो हे सांगण्याचा. इंदिरा गांधींनी आपल्याला असं काही दिलं ज्याचा जगाने कधी विचारच केला नव्हता. पण ते करत असताना आम्ही सर्वजण इंदिरा गांधींसारखे नाहीत. त्यामुळे त्यांची कार्यपद्धती काही लोक चुकीच्या मार्गाने वापरू शकतात.

**प्रश्न –** तुम्ही पूर्वी असे म्हणाला होतात की, इंदिरा गांधी यांचे नेतृत्व समजून घेणे भारतीयांना दीर्घकाळ अवघड जाईल.

– अगदी बरोबर. तुम्ही फक्त एवढेच पाहिले की, लोक त्यांच्या मागे धावत 'अम्मा, अम्मा, अम्मा' म्हणत होते. मी माझ्या पुस्तकात हेही दाखवलं की, लोक त्यांना 'अम्मा' म्हणत होते, मात्र त्यांच्या हत्येनंतर आंध्र प्रदेशातील जनतेने काँग्रेसच्या जागांची संख्या ४२ वरून ७ वर आणली होती. लक्षात घ्या, प्रेरणा वेगवेगळ्या असतात.

**प्रश्न –** लोक बदलतात. दुसरी एक व्यक्ती तुमची प्रशंसा मोकळेपणाने करीत असते. अटलबिहारी वाजपेयी. मला वाटतं, त्यांनी तुम्हाला आधी गुरु आणि नंतर गुरूघंटल संबोधले होते. ते कसे?

– वस्तुतः आम्ही दोघे आयुष्यभर मित्र राहिलो आहोत. मात्र त्याच वेळी आम्ही असेही म्हणत राहिलो की, आम्ही आयुष्यभर राजकीय प्रतिस्पर्धी राहणार आहोत.

**प्रश्न –** हो, ते तर आपल्या राजकारणातले सौंदर्य आहे. तर तुम्हाला त्यांच्यामधील कोणती गुणवैशिष्ट्ये विशेष भावली आहेत?

– मला असं वाटतं की, वाजपेयी यांनी या देशाला दिलेलं सर्वोत्तम योगदान म्हणजे त्यांनी आघाडीचे सरकार चालवून दाखवले. दर वर्षी निवडणुका घ्याव्या लागतील असा तो काळ होता. अशा काळात केवळ त्यांच्या नेतृत्वामुळे त्या आघाड्या टिकल्या.

**प्रश्न –** पंचवीस राजकीय पक्षांची आघाडी सांभाळली त्यांनी...

– मन वळवण्याची प्रचंड मोठी ताकद त्यासाठी असावी लागते, पण या सर्वांचा परिणामांशी काही संबंध नसतो. तुमच्याकडे जर तत्त्वप्रणाली (आयडिऑलॉजी) नसेल आणि तिला सुसंगत कार्यक्रमही नसेल तर, निवडणुकीच्या आधी तुम्हाला प्रचाराची हवाच (हाईप) निर्माण करावी लागते.

**प्रश्न –** आणि म्हणून सध्या ते तसे करत आहेत?

– तुम्हाला ते माहीत आहे.

**प्रश्न –** मला वाटतं, वाजपेयींनी भारतीय राजकारणाला आणि भारतीय इतिहासाला दिलेले सर्वांत मोठे योगदान म्हणजे त्यांनी लोकांना हे पटवून दिले की, या देशात आघाडी सरकारे चालू शकतात, काम करू शकतात. आणि त्यांनी काँग्रेसलाही हे समजून घेण्यास भाग पाडले की, आघाडीचा मंत्र स्वीकारा. तुम्ही त्यांना हे श्रेय द्यायला तयार आहात?

– श्रेय किंवा अपश्रेय व्यक्तीपेक्षा त्या–त्या परिस्थितीला दिले जायला हवे. उद्या आणखी वेगळ्या प्रकारचे एकत्रीकरण आणि वेगळ्या प्रकारची आघाडी होऊ शकेल.

**प्रश्न –** पण अन्य लोक अशा प्रकारची आघाडी चालवू शकले नाहीत. देवेगौडा नाही, गुजराल पण नाही चालवू शकले.

– त्याचे कारण वेगळे आहे, ती आघाडी अयशस्वी झाली हे खरं नाही. त्यांच्या पायाखालचा गालीचा काढून

घेण्यात आला, त्यामुळे ती सरकारे गेली.

**प्रश्न –** हो, पण त्याचे कारण तर काँग्रेस पक्ष आहे.

– देवेगौडांच्या कार्यक्षमतेशी त्याचा संबंध नाही, गुजराल यांच्या कार्यक्षमतेशी त्याचा संबंध नाही. ही महत्त्वाची तळटीप टाकली पाहिजे.

**प्रश्न –** सर, तुम्ही आता असे म्हणू शकाल का की, त्या काँग्रेसने केलेल्या चुका आहेत?

– नाही, नाही, नाही. मला मूल्यात्मक निर्णय विचारू नका.

**प्रश्न –** मी तुम्हाला राजकीय निर्णयाबद्दल विचारतोय.

– प्रत्येक घटना विशिष्ट परिस्थितीमध्ये उद्‌भवलेली असते. जर विशिष्ट परिस्थिती पुन्हा उद्‌भवली तर पुन्हा तोच निर्णय घ्यावा लागणार हे उघड आहे. अर्थात् काही प्रकरणात असं घडत नाही. ते कशावर अवलंबून असतं तर ती परिस्थिती कोण हाताळत आहे त्यावर.

**प्रश्न –** मला माहितीये, तुम्ही टेनिस खेळाचे चाहते आहात.

– हो, मी आहे.

**प्रश्न –** तुमच्याकडे विम्बल्डन स्पर्धांच्या टेप्सचा संग्रह आहे.

– हो. विम्बल्डन, युएस ओपन, ऑस्ट्रेलियन ओपन, आणि ऑल ओपन्स.

**प्रश्न –** तुम्ही मला हे सांगू शकाल का की, तुमच्यावर त्या वेळी किती दबाव होता; तुम्ही काश्मीर, बाबरी मस्जिद, चरारे शरीफ हे प्रश्न हाताळत होता तेव्हा? मानवी हक्क, अणू चाचणी प्रतिबंध करार.

– आम्हाला रोज एक तरी किंवा तीन दिवसांतून एक तरी मेसेज यायचा ॲमनेस्टी इंटरनॅशनलकडून. आमचे त्याला उत्तर असायचे, 'आमचे स्वतःचे मानवी हक्क आयोग आहेत'. त्यानंतर ॲमनेस्टी इंटरनॅशनलने भारताला विसरायचे ठरवले असावे.

**प्रश्न –** अमेरिकेने खूप जास्त दबाव आणला होता अणुचाचणी प्रतिबंधक करारावर स्वाक्षरी करण्यासाठी?

– अर्थातच. ते पंडितजींच्या वेळेपासून तसं म्हणत आलेत. तर त्यात नवीन काय आहे? आपण त्या दबावाला बळी पडलेलो नाहीये. त्यातही नवीन काही नाही.

**प्रश्न –** परंतु एक प्रश्नचिन्ह कायम आहे. त्यासाठी तुमच्या पुस्तकाची वाट बघण्याची वेळ येऊ नये. हे खरे आहे का की, १९९५ मध्ये तुम्ही पंतप्रधान असताना अणुचाचणी घेण्याच्या खूप जवळ गेला होता, पण अमेरिकन दबावामुळे त्या चाचण्या केल्या नाहीत?

– ही गोपनीय माहिती माझ्याबरोबरच नष्ट होणार आहे, ती माझ्या तोंडून कधीच बाहेर येणार नाही.

**प्रश्न –** तेव्हा नेमकं काय झालं, हे इतिहासामध्ये नोंदवलं जाण्याची योग्य वेळ कोणती?

– नाही, इतिहासाला ते कधीच माहीत होणार नाही.

**प्रश्न –** त्याचा लिखित इतिहास का होऊ शकत नाही? आता पुरेसा काळ लोटला आहे.

– नाही, मी (सांविधनिक) शपथ घेतली आहे. आणि घेतलेली शपथ माझ्यासाठी पवित्र असते, खूपच पवित्र. कॅबिनेटमधील कागदपत्रे ॲडव्हान्समध्ये वाटप करण्यासारखं ते नाही.

**प्रश्न –** एक-दोन गोष्टीबद्दल तुमचे अखेरचे शब्द सांगता का? तुमची औषधयोजना (priscription) समजू आम्ही. त्यामुळे तुम्ही त्याबाबत संकोच बाळगू नका. एक- तुमची काँग्रेस पक्षासाठी प्रिस्क्रिपशन काय आहे? हा पक्ष चांगलं काम करत नाहीये, हा पक्ष मागील सात वर्षे सत्तेवर नाहीये, पुढील पाच वर्षे सत्तेच्या बाहेर राहील असे दिसते आहे. तर काँग्रेसचे पुनरुज्जीवन पुन्हा कसं होणार किंवा हा पक्ष स्वतःला कसे सावरू शकेल?

– भारताने महान स्वातंत्र्यलढा जिंकला, त्याच्याआधी साठ वर्षे काँग्रेस पक्ष सत्तेवर नव्हता. त्यामुळे सत्ता नसणं हे काँग्रेस पक्षासाठी नवीन नाही.. आणि जर तुम्ही तसं सुचवत असाल तर काँग्रेसच्या लोकांची दिशाभूल करीत आहात. मी व्यक्तिशः काँग्रेसने सत्तेवर येण्याला कमी महत्त्व देतो. प्रश्न असा आहे की, तुम्ही देशासाठी काय करू शकता. तुम्हाला माहीत असेल, १९४६ मध्ये काँग्रेस कार्यकारिणीने केलेला पहिला ठराव होता, भारताला अलिप्त राष्ट्र म्हणून ठेवण्याचा. देशाला स्वातंत्र्य मिळण्याआधी दीड वर्षे केलेला ठराव आहे तो.

**प्रश्न –** तर तुम्ही असं सुचवत आहात की, जेव्हा तुम्ही सत्तेवर नसता तेव्हा अजेंडा बांधला पाहिजे, निर्माण केला पाहिजे?

– अगदी बरोबर, नेमके तेच केले पाहिजे.

**प्रश्न –** दुसरा प्रश्न, मला प्रिस्क्रिप्शन हवे आहे- जगामध्ये भारताचे स्थान. आताचे वाजपेयी सरकार मागील दोन वर्षांत ज्याप्रकारे अमेरिका व पाकिस्तान यांच्यासोबत चालत आहे, ती दिशा योग्य आहे?

– माझी आठवण बरोबर असेल तर पंडित जवाहरलाल नेहरूंनी त्याबाबत स्पष्टपणे सांगितले आहे. जगाचे नेतृत्व करण्यासाठी भारत प्रयत्न करणार नाही किंवा तशी मागणीही करणार नाही. मात्र जगाला एकत्र करण्यासाठी भारताचा सहभाग राहणार आहे , राहिला आहे. या दोन्हींमध्ये मतभेदांचे जग आहे. आणि मला वाटतं, भारत तीच भूमिका बजावत राहील.

**प्रश्न –** पण पाकिस्तानसंदर्भात तुम्हाला असं वाटतं का की, आत्ताची शांतीप्रक्रिया दीर्घ काळ आणि पूर्वीपेक्षा अधिक टिकावू राहील? कारण तिथे लष्कर सत्तेवर आहे आणि ते दीर्घ काळ सत्तेवर राहू शकेल.

– दिल्लीमध्ये बसून पाकिस्तानात काय चाललं आहे याबाबत अंदाज बांधता येणे खूप अवघड आहे. माझ्या माहितीप्रमाणे, अशी कोणतीही वेळ नव्हती जेव्हा भारताला पाकिस्तानबरोबर चांगले संबंध ठेवण्याची इच्छा नव्हती. हे केवळ मी स्वतः भारतीय आहे म्हणून सांगत नाही. तुम्ही सर्व वस्तुस्थिती तपासून पहा, खोलात जा, नि:पक्षपणे तुमच्या मनाचा कौल घ्या, हाच निष्कर्ष ठामपणे पुढे येईल.

**प्रश्न –** परंतु आता वाजपेयींनी ज्या प्रकारे (पाकिस्तानशी शांततापूर्ण संबंध निर्माण करण्यासाठी) पुढाकार घेतला आहे आणि त्यासाठी ज्या प्रकारची राजकीय इच्छाशक्ती दाखवली आहे ते पाहता..

– भारत आणि पाकिस्तान यांनी जवळ यावे, यासाठी केल्या गेलेल्या कोणत्याही प्रयत्नाला प्रत्येक जण मान्यता देईल.

**प्रश्न –** हो, पण तसे करायला निघालेल्या भाजप नेतृत्वाला?

– नाही, नाही. नेतृत्व कोणाचे त्याला महत्त्व नाही आणि तुम्ही त्याकडे जर चुकीच्या पद्धतीने पाहत असाल तर तुम्ही त्यात काही धागेदोरे शोधण्याचा प्रयत्न करणारच.

**प्रश्न –** तुम्हाला या युक्तिवादामध्ये अतिसुलभी-करणाचा धोका दिसतोय का?

– नाही, मला अतिसुलभीकरण कुठेही दिसत नाही. जोपर्यंत तुम्हाला शंभर टक्के यशाची खात्री वाटतं नाही, तोपर्यंत तुम्ही पुन्हा पुन्हा ते करत राहणार. परंतु प्रत्येक वेळी तुम्ही करणार ते यशासाठीच.

**प्रश्न –** १९९१ मध्ये तुम्ही २००४ कडे पाहत नव्हता. आता २००४ हे वर्ष आहे, विचार करायला वेळ आहे तर सांगा, (सत्तेवर कोणीही आले तरी) २०१० मध्ये भारत कुठे असेल?

– २०१० हे वर्ष २००४ पासून फार दूर नाही. १९९१ च्या तुलनेत ते खूपच जवळ आहे. त्यावर विश्वास ठेवायला माझ्याकडे सर्व पुरावे आहेत.

**प्रश्न –** तुम्ही असे मानता का की, भारत योग्य दिशेने वाटचाल करीत आहे?

– हो, निश्चितच.

**प्रश्न –** तर मग तुम्ही २०१० मधील भारताला कुठे पाहता? भारत हा विकसित देश झालेला असेल?

– अशा प्रकारचे वर्गीकरण मला गोंधळात टाकते. एका देशात जो मध्यमवर्ग असतो तो दुसऱ्या देशामध्ये कनिष्ठ वर्ग असतो.

**प्रश्न –** परंतु तुम्ही आशावादी आहात?

– मी पूर्णतः आशावादी आहे. पाच हजार वर्षांची सभ्यता असलेला हा देश एखाद्या पिढीने केलेल्या चुका किंवा मूर्खपणा यामुळे लयाला जाईल, असे म्हणण्यात काहीच अर्थ नाही. कोणतीही पिढी इतकी शक्तिशाली नसते जी भारताला नष्ट करू शकेल.

**प्रश्न –** पण एका पिढीचे शहाणपण...

– शहाणपण हे नदीप्रमाणे प्रवाही असते. नदीला स्वतःचे असे खोल खड्डे असतात, तिला स्वतःचे असे चढ-उतार असतात. इथे आपण थोडे फिलॉसॉफिकल होऊ या, कारण ते समजून घेण्यासाठी दुसरा मार्गच नाही. आणि हा देश फिलॉसॉफिकल आहेच.

**प्रश्न –** आणि म्हणूनच या देशाला तुमच्यासारखे नेते हवे आहेत, मुख्य प्रवाहात कार्यरत राहण्यासाठी नसतील तर किमान राजकीय चर्चा घडवण्यासाठी तरी. कारण तुमच्यासारखे लोक राजकारणात तत्त्वज्ञान आणतात, शहाणपण आणतात, अनुभव आणतात.

– मी राजकारणात दिलासा आणला आहे. इतकी गुंतागुंत आणि आकाराने इतका मोठा देश असतो तेव्हा, दिलासा मिळण्याइतके महत्त्वाचे अन्य काही नाही, कारण दिलासा हा आशा-अपेक्षांचे नूतनीकरण करत असतो..

**प्रश्न –** तुमच्याशी झालेला हा संवाद अद्‌भुत आहे. मी अशी आशा बाळगतो की, तुमच्याशी संवाद साधण्याची संधी आणखी जास्त लोकांना मिळावी, त्यांना शहाणपण लाभावे.

(अनुवाद : विनोद शिरसाठ)

आनंद करंदीकर

# हो, मी हिंदू आहे!

हिंदुत्ववादी ब्राह्मण्य टिकवून ठेवण्यासाठी कधी मुसलमानांच्या द्वेषाची आग लावून धार्मिक दंगे घडवतील, कधी मराठ्याच्या मुलीवर प्रेम केले म्हणून दलित तरुणाला ठार करतील, कधी इंटरनेटवर महाराजांची नालस्ती झाली म्हणून रस्त्यात दिसेल त्या मुसलमानाला ठार करतील, काय करतील याचा नेम नाही. मला ब्राह्मण्याची भीती वाटते. म्हणूनच मी हिंदुत्ववादी हिंदू नाही. आणि तरीही मी हिंदू आहे. अभ्यास करून माझ्या लक्षात आले की हिंदूंमध्ये असे अनेक पंथ, अनेक तत्त्वज्ञाने, अनेक जीवनशैली अशा आहेत की ज्या ब्राह्मण्यवादी, हिंदुत्ववादी नाहीत. माझे बहुतेक सर्व शेजारी हिंदू आहेत. त्यात सर्व सवर्ण हिंदू राहतात. माझे ९९ टक्के मित्र आणि सहकारी हिंदू आहेत. त्यात बहुतेक कोणीही आक्रमक हिंदुत्ववादी नाहीत. पण ते दंग्याच्या वेळी घरीच बसून मुसलमान मारले म्हणून आनंद व्यक्त करतात.

लंडनच्या पूर्व भागात मी एका 'मॉम आणि पॉप' दुकानात चहापत्ती खरेदी करायला गेलो. (लंडनच्या पूर्व भागाचा उल्लेख तिथे बरेच आशिया आणि आफ्रिकेतून आलेले लोक राहतात म्हणून, आणि 'मॉम आणि पॉप' दुकानाचा उल्लेख हे दुकानदार शेजाऱ्या-पाजाऱ्यांबद्दल 'चौकशीप्रवीण' असतात म्हणून आणि प्रस्तुत विषयाच्या संदर्भात हे दोनही संदर्भ महत्त्वाचे आहेत म्हणून केला आहे. 'लंडन'चा उल्लेख भाव खाण्यासाठी केलेला नाही!) दुकानाच्या गोऱ्या मालकीणबाईंनी, मी कुठे राहतो? कोठल्या देशातून आलो? काय करतो? माझे लग्न झाले आहे का? बायको कोठे आहे? मी किती दिवस लंडनमध्ये राहणार आहे? हे प्रश्न एकामागोमाग विचारले. त्यांची उत्तरे मिळाल्यावर त्यांनी माझ्या पांढऱ्या अस्ताव्यस्त दाढी-मिश्यांकडे नजर रोखून विचारले, ''तुम्ही हिंदू आहात का?'' मी म्हणालो 'हो.' मग ओळख पुरेशी झाली अशा अर्थाने मान हलवून तिने मला, ''चहा कोणता हवा?'' असा व्यावहारिक प्रश्न विचारला आणि माझी चौकशी संपली.

जगातील बहुतेक सगळ्या भौगोलिक भागातून आलेले लोक पूर्व लंडनच्या या भागात राहतात. अनेक धर्मांचे, अनेक भाषा बोलणारे, निरनिराळे व्यवसाय करणारे लोक इथे राहतात. मग येथील गोऱ्या दुकानदार बाईला माझी 'हिंदू' ही ओळख महत्त्वाची का वाटली? आणि मी 'हो' का म्हणालो? या दोनही प्रश्नांनी मला चिंतनशील बनवले.

ती गोरी विक्रेती प्रश्न विचारायचे म्हणून विचारत नव्हती, तिला कोठला फॉर्म भरायचा नव्हता. पण मी भारतातून आलो ही ओळख तिला पुरेशी वाटली नाही. मी हिंदू आहे का हे तिला जाणून घ्यावेसे वाटले. का?

मी हो का म्हणालो? तिच्या प्रश्नांच्या सरबत्तीतून झटकन सुटावे म्हणून मी हा सोपा मार्ग स्वीकारला नाही हे नक्की. मी कोठलाच धर्म मानत नाही असे तिला सांगितले

असते तरीही तिचे प्रश्न बंद झालेच असते आणि तिने मला चहापत्ती विकली असती. तेव्हा ‘मी हिंदू आहे’ ही माझी ओळख मला ‘योग्य’ का वाटली?

मी ‘हो’ का म्हणालो असा प्रश्न मला पडला याचे मुख्य कारण मी भारतात, विशेषत: उच्च जातीय हिंदूंमध्ये वावरताना, ‘मी हिंदू नाही, हिंदुत्ववादी ब्राह्मणी हिंदू तर नक्कीच नाही’ असे आग्रहाने सांगत असतो; यात दडलेले असावे. भारतातील उच्च जातीयांमध्ये माझी ओळख मला ‘मी हिंदू नाही’ अशी वाटते आणि लंडनमधील गोऱ्या विक्रेतीसमोर मला माझी ओळख ‘हिंदू’ अशी वाटते. ही काय भानगड आहे हा माझ्या चिंतनाचा विषय बनला.

आपली ओळख आपल्या रोजच्या वागणुकीतून आपल्याला आणि समाजाला होत असते. वरकरणी माझ्या वागणुकीत मी हिंदू असतोही आणि नसतोही. मी वेद अपौरुषेय आहेत, भगवद्गीता पवित्र आहे असे मानत नाही, पण मी सध्या त्यांचा जमेल तितका अभ्यास करतो आहे; इतर दुसऱ्या धर्माच्या कोठल्याही धर्मग्रंथाचा असा अभ्यास मी करीत नाही. मी देव मानत नाही. देव आहे किंवा नाही याबद्दल मला कोठलाही निर्णायक पुरावा मिळालेला नाही. पण देव नाही असे धरून चालले तर तोटा काही नाही आणि देव आहे असे मानून चालले तर थोडा वैयक्तिक तोटा आणि मोठा सामाजिक तोटा होतो, हे मला विचार करून पूर्णत: पटले आहे. म्हणून मी निरीश्वरवादी वर्तणूक करतो. मी पूजा-अर्चा करीत नाही, पण तरीही देवळातील घंटा वाजवण्याचा मोह मला होतोच. विंदांची ‘त्रिपदी’ हा कार्यक्रम करताना सरिता (आवाड) जेव्हा ‘भीमाचे जेवण’ कविता, गोष्ट सांगून सादर करते आणि लहान मुले त्याचा आनंद लुटतात तेव्हा आपण अंधश्रद्धांना खतपाणी घालतो आहोत असे मला वाटत नाही. मला हिंदू पुराणकथांमधील वैचित्रे आणि सहजपणे सांगितलेल्या असंभव गोष्टी यांचे आकर्षण आहे. मी जानवे घालत नाही, शेंडी तर राखत नाहीच, गंधही लावत नाही. पण नरकचतुर्दशीला उटणे लावून अंघोळ घालून घ्यायला मला आवडते. मी हिंदूंच्या कोठल्याही संघटित कार्यक्रमाला जात नाही. पण चाळीतील सार्वजनिक गणेशोत्सवाच्या बालपणीच्या आठवणी माझे मन आजही उल्हसित करतात. आरती चालू असेल तर मीही ती गुणगुणू लागतो. मी उपास करीत नाही. पण अजूनही मला श्रावणी सोमवाराला रताळ्याचा कीस खाताना वेगळाच आनंद मिळतो. मी सर्व प्रकारचे अन्न खातो, केरळमध्ये मी गोमांसही खाल्ले (ते मला आवडले नाही हा कदाचित माझ्यातील उर्वरित ब्राह्मणीपणाचा भाग असू शकेल.) आणि तरीही श्रीखंड आणि कोल्हापुरी मटणरस्सा हे माझे सर्वांत आवडते पदार्थ आहेत. मी ख्रिसमसला आकाशकंदील लावतो. पण दिवाळीत पणत्या लावताना जाणवणारे मांगल्य मला आकाशकंदील लावताना जाणवत नाही. अशी माझी कितीतरी वागणूक हिंदू असण्याची माझी ओळख सांगते आणि हिंदू नसण्याचीही माझी ओळख सांगते. त्याबद्दल मला गर्व, अभिमान, लाज किंवा अपराधी असं काहीही वाटत नाही.

विचारपूर्वक स्वीकारलेली आणि कसोशीने राबवलेली जीवनशैली सगळेच संस्कार नाकारत नाही. आणि अनेक संस्कार, विशेषत: बालपणीचे संस्कार हे धार्मिक असतात. पण माझी हिंदू असण्याची ओळख आणि हिंदू नसण्याची ओळख ही फक्त या सहज वर्तनाबद्दलच मर्यादित नाही हे मला अधिक चिंतनानंतर आता जाणवते आहे.

माझे ब्राह्मण्याबद्दलचे, हिंदुत्वाबद्दलचे आकलन हळूहळू वाढत गेले आहे. हा प्रवास अजूनही चालूच आहे. माझ्या लहानपणी माझे वडील हे माझ्या माहितीतील एकटेच व्यक्ती हिंदुत्वाच्या विरोधात होते. बाकी सगळे, म्हणजे माझी आई, सर्व नातेवाईक, सर्व शेजारी, सर्व शिक्षक, सगळे सवंगडी हिंदू होते, एवढेच नव्हे तर चित्पावन ब्राह्मण होते. ते आक्रमक, हिंसक हिंदुत्ववादी नसले तरी ‘गर्विष्ठ ब्राह्मण्य’ ही त्यांची स्वाभाविक संस्कृती होती. या ब्राह्मणी संस्कृतीत मला अगदीच असंस्कृत वाटू नये म्हणून माझ्या वडिलांनी मला मारुतिस्तोत्र, रामरक्षा आणि काही संस्कृत श्लोक अर्थ सांगून शिकवले, माझ्याकडून पाठ करून घेतले. माझ्या वडिलांनी माझी मुंज केली नाही आणि वाचलेल्या पैशातून मला क्रिकेटचे सर्व साहित्य आणून दिले. पण यापलीकडे मला हिंदुत्वाच्या, ब्राह्मण्याच्या विरोधात माझ्या वडिलांनी काही सांगितले नाही, पटविणे तर दूरच राहिले. (माझ्या वडिलांचा ब्राह्मण्याला असलेला प्रखर विरोध हा मला मी माझ्या ६५व्या वर्षी त्यांच्या कविता पुन्हा वाचल्या तेव्हा कळला!)

मी कॉलेजमध्ये शिकत असताना युवक क्रांती दलात (युक्रांद) मध्ये सामील झालो. तेथे माझी हिंदुत्व, ब्राह्मण्य यांची ओळख आणि अभ्यास सुरू झाला. युक्रांदमध्ये मला ब्राह्मण जातीत न जन्मलेले मित्रमैत्रिणी आणि सहकारी भेटले. आपण आपल्या चाळीत ज्यांना सुसंस्कृत समजत






आलो त्यांच्यापेक्षा कितीतरी अधिक सुसंस्कृत असे हे आपले नवे मित्र आहेत आणि त्यांची संस्कृती ब्राह्मणी नाही हे लक्षात आले. आणि मग मला एकामागून एक धक्के बसत गेले. पहिला मोठा धक्का 'गवई बंधू' प्रकरणात बसला. दलितांचे डोळे काढण्यात आले. त्याचा निषेध करणारे अत्यंत प्रभावी आणि झोप उडवणारे पोस्टर सुभाष तेंडलेने बनवले. युक्रांदीय मित्रांबरोबर फिरून ते पोस्टर लावताना मला प्रथम जातीय उतरंडीची चीड आली आणि माझ्या ब्राह्मण जातीची शरम वाटली. त्यानंतर मराठवाडा विद्यापीठाचे नामांतर करायला विरोध म्हणून दंगल झाली. दलितांच्या घरांची जाळपोळ झाली. महाराष्ट्राच्या विधानसभेने एकमताने केलेल्या ठरावाची अंमलबजावणी करून विद्यापीठाला महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे नाव दिले तर हे काय घडते? मला हा दुसरा धक्का होता. मी ज्या समाजात, ज्या हिंदू समाजात राहतो तो समाज मला काहीच कसा माहीत नाही? मी मराठवाड्यात उदगीरला जाऊन स्थाईक झालो. उदगीरमध्ये सायकलरिक्षा चालवणाऱ्या दलित आणि मुसलमान कष्टकऱ्यांची संघटना बांधण्याच्या कामाला लागलो. नामांतराच्या मागणीसाठी युक्रांदने काढलेल्या 'मार्च'मध्ये लातूरहून औरंगाबादला चालत निघालो. गावागावांतील गावगाडे आणि दलित वस्त्या पाहिल्या. दलित वस्तीत रात्री भीमांची गाणी ऐकली आणि दिवसा रस्त्यावरच्या सवर्ण टवाळखोरांच्या शिव्या ऐकल्या. जातिव्यवस्था, विषमता, ब्राह्मणी मनोवृत्ती आणि रीतिरिवाज आपल्या समाजात किती खोलवर आणि व्यापक प्रमाणात आहेत याचा मला साक्षात्कारी प्रत्यय आला.

त्याच वेळी आणि त्यानंतरही मी स्त्रीमुक्ती चळवळीत काम करायला लागलो. माझा कल लक्षात घेऊन माझ्या आईने मला कॅथरीन मेयो यांचे 'मदर इंडिया' हे पुस्तक वाचायला दिले. कॅथरीन मेयो या भारतद्वेष्ट्या कमी, प्रामाणिक संशोधक होत्या असे सांगितले जाते. पण त्यांनी पुस्तकाच्या शेवटी त्या काळात भारतात डॉक्टरकी करणाऱ्या स्त्री डॉक्टरांनी सरकारला केलेला अर्ज जोडला आहे. (हा अर्ज बनावट आहे असे कोणी म्हटल्याचे माझ्या वाचनात नाही.) या अर्जात वयात न आलेल्या मुलींशी जबरी संभोग करून त्यांच्या नवऱ्यांनी त्यांची काय दशा केली, याची वर्णने आहेत. ती वाचून अंगावर काटा आला. त्याच वेळी लहानपणी चाळीत ऐकलेली आणि म्हटलेली भोंडल्याची गाणी अभ्यासली आणि त्यातील भयानक

विरूप समोर आले. ब्राह्मण कुटुंबातील स्त्रियांच्या कमालीच्या छळाची, ब्राह्मण्याची गरज लक्षात आली, तिचे इतर जातींत चाललेले अनुकरण लक्षात आले, आणि पुरता हादरलो. माझा हिंदुत्वी ब्राह्मण्याला असलेला विरोध हा फक्त शेंडी, जानवे आणि शाकाहाराला असलेला विरोध नाही. तो सर्वंकष ब्राह्मण्याला, जातिव्यवस्थेला, हिंदुत्वाला असलेला विरोध आहे.

हिंदुत्ववादी ब्राह्मण्य टिकवून ठेवण्यासाठी कधी मुसलमानांच्या द्वेषाची आग लावून धार्मिक दंगे घडवतील, कधी मराठ्याच्या मुलीवर प्रेम केले म्हणून दलित तरुणाला ठार करतील, कधी इंटरनेटवर महाराजांची नालस्ती झाली म्हणून रस्त्यात दिसेल त्या मुसलमानाला ठार करतील, काय करतील याचा नेम नाही. मला ब्राह्मण्याची भीती वाटते. म्हणूनच मी हिंदुत्ववादी हिंदू नाही. आणि तरीही मी हिंदू आहे. अभ्यास करून माझ्या लक्षात आले की हिंदूंमध्ये असे अनेक पंथ, अनेक तत्त्वज्ञाने, अनेक जीवनशैली अशा आहेत की ज्या ब्राह्मण्यवादी, हिंदुत्ववादी नाहीत. माझे बहुतेक सर्व शेजारी हिंदू आहेत. मी ज्या इमारती समूहामध्ये राहतो त्यामध्ये ३०० सदनिका आहेत. त्यात सर्व सवर्ण हिंदू राहतात. माझे ९९ टक्के मित्र आणि सहकारी हिंदू आहेत. त्यात बहुतेक कोणीही आक्रमक हिंदुत्ववादी नाहीत. पण ते दंग्याच्या वेळी घरीच बसून मुसलमान मारले म्हणून आनंद व्यक्त करतात. ते कोठल्याही जातीचे असू द्या, ते ब्राह्मण्याचे बळी आहेत. मी त्यांना सारखा, प्रत्येक गोष्टीबाबत विरोध करत नाही, करू शकत नाही. पण मला त्यांना बदलायचे आहे. त्यांचे हे अमानवी जिणे मला पाहवत नाही. परवडतही नाही. पण मला त्यांच्यात राहूनच त्यांना बदलायचे आहे. कधी वाटते बौद्ध व्हावे, मुसलमान व्हावे, ख्रिस्ती व्हावे. निदान मी निधर्मी असल्याचा बिल्ला गळ्यात घालावा. पण त्याने काय साधेल? माझा सभोवतालच्या हिंदूंशी संबंध कमी होईल, दुराव्याचा होईल. हिंदुत्वाचे, ब्राह्मण्याचे नवे व बदलते आविष्कार मला कळणार नाहीत. हिंदूंमध्ये कट्टर हिंदुत्ववादी, सनातनी हिंदू कमी आहेत. बहुतेक सगळे अजाणतेपणे स्वीकारलेल्या ब्राह्मण्याचे बळी आहेत. त्यांना बदलायचे, माणूस बनवायचे तर मला त्यांच्यात हिंदू म्हणूनच राहिले पाहिजे. थोर महामानवांनी ते त्यांचे आयुष्य कसे जगले यातून या बाबत शिकवण दिली आहे. डॉ. आंबेडकरांनी आयुष्यभर ब्राह्मण्याशी लढा दिला तेव्हा ते हिंदू होते. अगदी शेवटी ते बौद्ध झाले. महात्मा गांधी तर कट्टर हिंदुत्ववाद्यांशी आयुष्यभर लढले आणि आयुष्यभर हिंदूच राहिले. मग म्यां पामराचे ते काय? होय. मी हिंदू आहे.

या चिंतनातून मला माझी ओळख अधिक चांगली झाली, पण त्या गोऱ्या विक्रेतीने मला 'तू हिंदू आहेस का', असा प्रश्न का विचारला याचे उत्तर उमगले नाही. मी तर्क लढवले. पण नेमके उत्तर मिळेना. दोन दिवसांच्या श्रमांनंतर मी तिलाच शरण गेलो. तिला म्हटले, मला कुतूहल आहे, मी हिंदू आहे का, असा प्रश्न तुम्ही मला का विचारला? ती म्हणाली, ''मला कधी कधी माणसाच्या माहितीबद्दल अंदाज करायला आवडतो. तुम्ही ज्या शांतपणे माझ्या आधीच्या प्रश्नांची उत्तरे दिलीत त्यावरून मला तुम्ही शांत, सोशीक आणि मनमिळाऊ वाटलात. म्हणून मी अंदाज बांधला की तुम्ही हिंदू असावेत. मलाही कुतूहल होते म्हणून प्रश्न विचारून खात्री करून घेतली. तुम्हांला राग तर नाही आला?'' मी म्हणालो, ''स्वत:बद्दल एवढे चांगले ऐकून राग कसा येईल? थँक यू.'' 'आता परिस्थिती बदलते आहे, पुढच्या वेळी धोका खाल' वगैरे तिचे प्रबोधन करण्याच्या भानगडीत मी पडलो नाही. मोठ्या खुशीत मी घरी आलो आणि शांत झोपलो.

**आनंद करंदीकर,** पुणे
Mob. 96045 18539

(आनंद करंदीकर यांनी विविध नियतकालिकांत लिहिलेल्या व काही अप्रसिद्ध अशा एकूण ३० लेखांचा संग्रह 'वैचारिक घुसळण' या नावाने पुढील महिन्यात साधना प्रकाशनाकडून येत आहे. राजकारण, शिक्षण व रोजगार, स्त्री-पुरुष समानता, धर्मचिकित्सा, चळवळी, विंदा करंदीकर आणि परिशिष्ट अशा सहा विभागांत मिळून ३० लेख आहेत. या सर्व लेखांचे स्वरूप ललित-वैचारिक आहे. यातील दोन अप्रकाशित लेख साधना अंकात प्रसिद्ध करीत आहोत- त्यातील एक मागील अंकात प्रसिद्ध झाला होता, हा दुसरा लेख आहे.
- संपादक)

दशरथ पारेकर



# एक सेवाभावी, व्रतस्थ व्यक्तिमत्त्व

सांगली जिल्ह्यातील वेरळा विकास संस्था व कोल्हापूर जिल्ह्यातील 'अवनि' स्वयंसेवी संस्था यांचे अध्यक्ष प्रा. अरुण चव्हाण यांचे वयाच्या नव्वदीत असताना नुकतेच निधन झाले. या दोन्ही संस्थांच्या वतीने त्यांनी विविध प्रकल्प राबविले. महाविद्यालयात इंग्रजीचे प्राध्यापक म्हणून आणि विद्यापीठात सहायक कुलसचिव पदावर कार्यरत असताना ऐन उमेदीच्या काळात नोकरी सोडून सामाजिक कार्यात झोकून देणाऱ्या या ध्येयवादी वृत्तीच्या बहुआयामी व्यक्तिमत्त्वाच्या वाटचालीचा वेध.

कोल्हापूरच्या 'अवनि' संस्थेचे अध्यक्ष व सांगलीच्या 'वेरळा विकास संस्थे'चे मानद सचिव व अध्यक्ष प्रा. अरुण चव्हाण यांचे नुकतेच कोरोनाने निधन झाले. महाराष्ट्रातील या दोन अग्रगण्य स्वयंसेवी संस्थांची उभारणी करणारे प्रा. चव्हाण हे एक पुरोगामी विचारांचे सुसंस्कृत व सेवाभावी व्यक्तिमत्त्व होते. या दोन्ही संस्थांचे काम वेगळ्या स्वरूपाचे आणि वैशिष्ट्यपूर्ण आहे. वेरळा विकास संस्था ही सांगली जिल्ह्याच्या ग्रामीण भागात रचनात्मक कार्य करणारी, तर 'अवनि'चे कार्य कोल्हापूर परिसरातील नागरी भागात. तथापि, दोन्ही संस्थांचे उद्दिष्ट मात्र समाजविकासाचे. वेरळा विकास संस्था प्रामुख्याने शेतकरी व ग्रामीण भागातील कमकुवत वर्गासाठी शेती, पाणी, शिक्षण, आरोग्य आदी क्षेत्रांत काम करते, तर समाजातील उपेक्षित, निराधार व कमकुवत वर्गातील महिला, मुली, बालकामगार यांच्या पुनर्वसन व विकासासाठी 'अवनि' कार्यरत आहे. या दोन्ही संस्थांच्या माध्यमातून ज्यांनी प्रचंड पसारा उभा केला, त्यांची दूरदृष्टी, विचार आणि कार्यपद्धती विलक्षण कौतुकास्पद म्हणावी लागेल. वेरळा विकास संस्थेची स्थापना २ ऑक्टोबर १९६९ ची. आजकाल स्वयंसेवी संस्थांचा अगदी सुळसुळाट झालेला दिसतो आणि त्यात हौशी स्वयंसेवी कार्यकर्त्यांच्या दिखाऊ संस्थांचाच भरणा अधिक असतो. मात्र, प्रा. चव्हाण यांनी वेरळा विकास संस्थेची स्थापना केली, त्या काळी संस्था ही संकल्पना फारशी परिचित नव्हती. शिवाय ज्या ग्रामीण भागात तिचे कार्य सुरू केले, तो सारा दुष्काळी भाग म्हणून ओळखला जाणारा, कमी पावसाचा आणि पाण्याची तीव्र टंचाई असणारा. त्यांचे मूळ गाव सांगली जिल्ह्यातील कवठेपिरान असले तरी त्यांचे वास्तव्य व शिक्षण कोल्हापूर व मुंबईत झालेले. शिवाय ते प्रतिष्ठित अशा घरंदाज व संपन्न कुटुंबात जन्मलेले आणि उच्चशिक्षित; तेव्हा खानापूर तालुक्यातील दुष्काळी टापूत त्यांची संस्था कशी काय कार्य करणार

आणि ते स्वत: तरी कितपत आणि किती काळ सक्रिय राहणार, असे शंकास्पद प्रश्न संस्था उभारण्याच्या प्रारंभीच उपस्थित करण्यात आले; पण प्रा. चव्हाण यांनी विचारपूर्वक निर्णय घेऊनच हे पाऊल उचलले होते. आपल्या निश्चयावर ते ठाम होते. त्यांच्या या निर्धारामागे एक विशेष पार्श्वभूमी होती.

१९४० ते ५० या कालखंडात प्रा. चव्हाण कोल्हापुरात उच्च शिक्षणासाठी वास्तव्यास असताना डाव्या विचारांच्या काही कार्यकर्त्यांच्या ते संपर्कात आले. त्या काळात त्यांचे वाचन अफाट होते. डाव्या विचारांचा प्रभाव जगातील अनेक देशांत वाढत होता. वाचनातून मानवेंद्रनाथ रॉय यांच्या विचारांचा तसेच अन्य मार्क्सवादी विचारवंतांच्या लेखनाचा त्यांना चांगल्या प्रकारे परिचय झाला होता. त्याच वेळी महात्मा गांधींच्या व्यक्तिमत्त्व व विचारांचाही त्यांच्यावर प्रभाव पडला होता. अशा परिस्थितीत निर्माण झालेल्या काहीशा वैचारिक गोंधळाच्या पार्श्वभूमीवर ते वेगळ्या वाटेचा शोध घेत होते. इंग्रजी साहित्य या विषयात मुंबई विद्यापीठाची पदव्युत्तर पदवी घेऊन औरंगाबाद व सांगली येथे इंग्रजीचे प्राध्यापक म्हणून त्यांनी काही वर्षे शिक्षणक्षेत्रात काम केले. त्यांतर औरंगाबाद येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात तसेच कोल्हापूरला शिवाजी विद्यापीठात प्रशासकीय विभागात सहायक कुलसचिव म्हणूनही काही काळ त्यांनी जबाबदारी पार पाडली. इंग्रजी विषयाचे 'विद्यार्थिप्रिय प्राध्यापक' अशी त्यांची ओळख निर्माण झालेली होती आणि प्रशासकीय अनुभवही गाठीस होता. त्यामुळे विद्यापीठात वा अन्यत्र नोकरीच्या अधिक चांगल्या संधी समोर दिसत असतानाही, समाजासाठी काही वेगळे काम करण्याच्या अंतर्गत ऊर्मीपोटी त्यांनी शिक्षणक्षेत्राकडे पाठ फिरविली; आणि कसलीही शाश्वती नसलेल्या ग्रामीण विकास सेवाकार्यात स्वत:ला झोकून दिले. खानापूर तालुक्यातील आळसंद या गावात वेरळा विकास संस्थेची पायाभरणी केली. परिसरातील सहा-सात गावांतील लोक एकत्र आणून विविध प्रकारची कामे सुरू केली. त्या मागासलेल्या भागात रस्ते, वीज, पाणी, शिक्षण व आरोग्याच्या सोयीसुविधा आदी बाबतींत वेगवेगळे उपक्रम हाती घेतले. ग्रामीण विकासाच्या दृष्टीने विहिरींची खुदाई, रस्तेरुंदी, जमीन सुधारणा व जलसंधारण, उपसा सिंचन, नवीन पीक पद्धती, क्षारपड जमीन सुधारणा, वनीकरण- यांसारख्या योजना राबविण्याबरोबरच प्रौढ शिक्षण अभियान, महिला शिक्षण, आरोग्य सेवा आणि समाज प्रबोधनविषयक कामेही सुरू ठेवली. विविध प्रकल्प राबविताना ग्रामस्थांचा सहभाग आणि बाह्य संस्थांची मदत यांचा समन्वय साधून ही कामे सातत्याने सुरू राहतील याची काळजी घेतली. १९७२ च्या दुष्काळी परिस्थितीत संस्थेने केलेले काम लाख मोलाचे ठरले. सांगली जिल्ह्याच्या पूर्वेकडील सहा तालुक्यांतील सुमारे २० हजार लोकांना चार महिने संस्थेच्या वतीने रोजगार पुरविण्यात आला. सुकडी वितरणाची जबाबदारीही संस्थेने उत्तम प्रकारे पार पाडली. दुष्काळी परिस्थितीत संस्थेने जसे वेगवेगळ्या प्रकारचे कार्य केले, तसेच गुजरातमध्ये भूकंपानंतर भूकंपग्रस्तांसाठी गृहबांधणी प्रकल्प व अन्य मदतकार्य पुरविण्याचेही उल्लेखनीय कार्य केले. वेरळा विकास संस्थेच्या पुढाकारामुळे खानापूर तालुक्यातील टंचाईग्रस्त भागाचा तर गेल्या तीन-चार दशकांत अक्षरश: कायापालट झाला. कोल्हापुरात 'अवनि'चे कार्यही श्रीमती अनुराधा भोसले यांच्या नेतृत्वाखाली जोमाने सुरू आहे. तेथील मुलींच्या शाळा व वसतिगृहाचे काम अलीकडेच पूर्ण झाले असून, अन्यही विविध प्रकल्प सुरू आहेत. या साऱ्या कामांमागे मुख्यत्वे त्यांचे नियोजन आणि प्रेरणा होती.

प्रा. चव्हाण हे इंग्रजी विषयाचे व्यासंगी अभ्यासक होते. त्यांना विविध विषयांत रस होता. त्यांचा ग्रंथसंग्रह मोठा होता आणि ते लेखनही करीत. 'तिमिरवेध' ही कोल्हापूर संस्थानच्या पार्श्वभूमीवरील त्यांची कादंबरी अनेक अर्थांनी वैशिष्ट्यपूर्ण ठरली. इंग्रजीतील ललित आणि वैचारिक वाङ्‌मयाचेही त्यांचे वाचन विविधांगी होते. भारतीय व विदेशी राजकारणाचाही त्यांचा दांडगा अभ्यास होता. त्यांचे वाचन अद्ययावत होते आणि इंग्रजी वृत्तपत्रांतून ते पत्रलेखनाद्वारे मतप्रदर्शन करीत असत. अत्यंत ताज्या विषयावरही त्यांचे वाचन अद्ययावत असे आणि ते उत्साहाने लेखनही करीत. गांधीजींचे नातू अरुण गांधी हे 'टाइम्स ऑफ इंडिया'चे सहसंपादक होते तेव्हापासून त्यांच्याशी त्यांचे निकट मैत्री-संबंध प्रस्थापित झाले होते; ते गेल्या चार दशकांच्या काळात अधिकाधिक दृढ होत गेले. गेली काही वर्षे अरुण गांधी अमेरिकेहून दर वर्षी खास भारतभेटीसाठी येत. त्या वेळी त्यांची कोल्हापूर, सांगलीत 'अवनि' व 'वेरळा विकास संस्थे'ची भेट ठरलेली असे. अनेक अमेरिकन मित्र व कार्यकर्ते या निमित्ताने ग्रामीण

भारताच्या दर्शनासाठी म्हणून आवर्जून येत. त्यांच्या या भारत दौऱ्याचे नियोजन प्रा. चव्हाण मोठ्या उत्साहाने करीत असत.

मराठीतील ख्यातनाम कवी अरुण कोल्हटकर हे प्रा. चव्हाण यांचे वर्गमित्र. ते कोल्हापूरचे. त्यांचे कोल्हापुरात स्मारक व्हावे, यासाठी त्यांनी विशेष प्रयत्न केले. केवळ त्यांच्यामुळे कोल्हटकर स्मारकाचे काम मार्गी लागले असून, आता ते जवळजवळ पूर्ण होत आले आहे. त्यांचा मित्रपरिवार मोठा होता आणि त्यात विविध क्षेत्रांतील नामवंतांचा समावेश होता. प्राचार्य म. द. हातकणंगलेकर, कृषितज्ज्ञ प्र. शं. ठाकूर, प्रयोग परिवाराचे श्रीपाद दाभोलकर, डॉ. गो. मा. पवार, डॉ. सुधीर रसाळ, प्राचार्य पी. बी. पाटील, ग. प्र. प्रधान, बाबा आढाव, आप्पासाहेब ऊर्फ सा. रे. पाटील, चित्रकार बाबूराव सडवेलकर, प्रा. द. ना. धनागरे, कॉ. गोविंद पानसरे, बापूसाहेब पाटील, प्राचार्य लीला पाटील, रवींद्र मेस्त्री अशा अनेकांशी त्यांचे व्यक्तिगत मैत्री-संबंध होते. याशिवाय देश-विदेशांतील अनेक मित्रांशी त्यांचा पत्रमित्र संबंध होता. अरुण गांधी यांच्यामुळे गांधी परिवारातील सर्वांशी त्यांचे ऋणानुबंध जोडले गेले होते. त्याचप्रमाणे कोल्हापुरातील काही राजघराण्यांशी व राज्यातील राजकीय घराण्यांशीही त्यांचे निकट संबंध होते. राजर्षी छत्रपती शाहूमहाराज हे त्यांचे आदर व प्रेरणास्थान होते. राजकीय नेत्यांपैकी वसंतदादा पाटील, अण्णासाहेब शिंदे, मधुकरराव चौधरी, स्वातंत्र्य चळवळीतील आदरणीय नेते क्रांतिसिंह नाना पाटील, जी. डी. बापू लाड, भगवान बाप्पा मोरे यांच्याशी त्यांची जवळीक होती. विविध कार्यांत ते त्यांचे मार्गदर्शन घेत असत. किर्लोस्कर घराण्याशी त्यांचा स्नेह होता. शंकरराव किर्लोस्कर तसेच मुकुंदराव व मालतीबाई किर्लोस्कर यांच्याशी अत्यंत जिव्हाळ्याचे नाते होते.

मित्रमंडळींच्या बैठकीत मनसोक्त गप्पागोष्टी करणे हा त्यांचा विरंगुळा असे. एरवी मितभाषी असणारे प्रा. चव्हाण मित्रांच्या मैफलीत अगदी रंगून जात. विविध क्षेत्रांतील विपुल माहितीचा त्यांच्याकडे खजिना होता. कोल्हापूरच्या राजघराण्यातील व्यक्तींच्या 'पडद्याआड'च्या अनेक गुपितांचा 'मैफल ठेवा'ही त्यांच्या पोतडीत असे. मुख्य म्हणजे त्यांची स्मरणशक्ती चांगली होती. खास बैठकीत राजकारण्यांशी संबंधित किती तरी रंगतदार किस्से ते सांगत असत. त्यांच्याकडे एक प्रकारची मिश्कील विनोदबुद्धी (सेन्स ऑफ ह्युमर) होती आणि दर्जेदार विनोदाला दाद

## दोन पुस्तके येण्याला कारणीभूत

डिसेंबर २०१८ च्या पहिल्या आठवड्यात एक भले गृहस्थ साधना कार्यालयात अचानक आले आणि म्हणाले, ''अरुण गांधी यांनी लिहिलेले Legacy of Love हे पुस्तक मला विशेष आवडले आहे, सोनाली नवांगुळ या तरुणीकडून मी त्याचा अनुवाद करून घेतला आहे. आमच्या संस्थेच्या कार्यकारिणी बैठकीत अशी इच्छा व्यक्त झाली आहे की, ते पुस्तक प्रकाशित करण्यासाठी सर्वप्रथम साधना प्रकाशनाला विचारावे, त्यांनी नकार दिला तर अन्य प्रकाशनाला विचारावे.'' दहा मिनिटे त्यांच्याशी बोलणे झाले, मूळ पुस्तक व त्याचा अनुवाद यांचा अंदाज पटकन् घेतला. त्याचवेळी हेही कळले की, पुढील महिन्यात अरुण गांधी भारतात येत असून कोल्हापुरात त्यांच्या 'अवनि' संस्थेला भेट देणार आहेत. मग काय, लगेच निर्णय घेतला. पुढील तीन आठवड्यांत पुस्तक तयार करायचे आणि अरुण गांधींच्या उपस्थितीत ते प्रकाशित करायचे. त्याप्रमाणे सर्व काही जुळवून आणले आणि ५ जानेवारी २०१९ रोजी कोल्हापूर येथे त्या पुस्तकाचे प्रकाशन झाले. त्या वेळी तुषार गांधी व सुनीलकुमार लवटे हेही उपस्थित होते. 'वारसा प्रेमाचा' हेच ते पुस्तक.

यानंतर असे लक्षात आले की, अरुण गांधी यांचेच Gift of Anger हे पुस्तक Legacy of Love चे भावंड आहे. त्यामुळे पुढील वर्षी अरुण गांधी पुन्हा कोल्हापुरात आले तेव्हा सोनाली नवांगुळ व अरुण चव्हाण यांना सांगून त्या पुस्तकाच्या अनुवादासाठीही परवानगी मागितली. आणि मग २ ऑक्टोबर २०२० रोजी त्या पुस्तकाचा सोनालीनेच केलेला मराठी अनुवाद 'वरदान रागाचे' या नावाने प्रकाशित केला. सांगायचे काय तर, ही दोन्ही पुस्तके साधना प्रकाशनाकडून येण्याला कारणीभूत ठरले अरुण चव्हाण. त्यांच्या स्मृतीला विनम्र अभिवादन!

**- संपादक, साधना**

देण्याची अभिजातच रसिक वृत्तीही त्यांच्या ठायी होती. एक बहुआयामी, संपन्न असे त्यांचे व्यक्तिमत्त्व होते. आकर्षक आणि रुबाबदारपणाची त्याला जोड लाभली होती. त्यामुळे प्रथमदर्शनीच त्यांचा समोरच्या व्यक्तीवर प्रभाव पडत असे. अत्यंत मृदू आवाजात आणि हळुवारपणे ते बोलत; पण आपले म्हणणे मुद्देसूदपणे पटवून सांगण्याची त्यांची वेगळी हातोटी होती. जाहीर समारंभ आणि भाषणबाजीचा त्यांना सोस नव्हता आणि प्रसिद्धीचीही हाव नव्हती. उलट प्रसिद्धीपासून दूर राहूनच आपण आपले काम करत राहावे, अशी त्यांची वृत्ती होती. त्यामुळे मोठ्या प्रमाणावर व दीर्घ काळ सार्वजनिक क्षेत्रात कार्यरत राहूनही त्यांना व त्यांच्या कार्याला व्यापक प्रसिद्धी लाभली नाही. किंबहुना जाणीवपूर्वकच ते अशा प्रसिद्धीपासून दूर राहिले.

दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे निकटचे अनेक नातेवाईक व स्नेहीमंडळी राजकारणात असूनही आणि बड्या राजकीय नेत्यांशी स्नेहसंबंध असूनही राजकारणाच्या धबडग्यापासून त्यांनी स्वत:ला दूर ठेवले. त्यापेक्षा आपण व आपले कार्य यांतच ते आनंद मानत राहिले. सतत नवनवे प्रयोग आणि नवनव्या कंपन्यांचा ते पाठपुरावा करीत असत. सार्वजनिक क्षेत्रात कार्य करताना अनेक अडीअडचणींना राजकीय-सामाजिक अडथळ्यांना त्यांना तोंड द्यावे लागले; पण ते कधीच निराश झाले नाहीत. सतत नव्या उत्साहाने व उमेदीने काम करत राहिले. बाहेरचा मदतीचा ओघ थांबल्यामुळे काही काळ त्यांना प्रचंड आर्थिक समस्यांनाही तोंड द्यावे लागले. वीस-पंचवीस लाखांच्या कर्जाचा भार संस्थांवर पडला; पण तो स्वत: सोसून त्यांनी संस्थांची कामे पुढे सुरू ठेवली. विशेष म्हणजे उत्तम पगाराच्या व प्रतिष्ठेच्या नोकऱ्या सोडून आपण सार्वजनिक सेवेच्या ओढीने भलत्याच मार्गाने वाटचाल केली किंवा काय, या प्रकारचे प्रश्न त्यांना कधी पडले नाहीत आणि स्वत: घेतलेल्या धाडसी निर्णयांचा कधीच पश्चात्ताप वगैरे झाला नाही. जो मार्ग निवडला त्यावरून ते मोठ्या उत्साहाने व आनंदाने अखेरपर्यंत चालत राहिले. त्यांच्या परिवर्तनाच्या चळवळीत आणि ग्रामीण विकासाच्या कार्यात अनेक गुणी कार्यकर्त्यांची त्यांना साथ लाभली. ग्रामीण भागातील सामान्य कार्यकर्त्यांपासून ते अनेक बड्या अधिकाऱ्यांचा व नेत्यांचा त्यांनी ग्रामीण विकासाच्या विविध कार्यांत उत्तम पद्धतीने उपयोग करून घेतला. मैत्री आणि स्नेहसंबंधाचा चांगला उपयोग केला आणि हाती घेतलेली कामे पुढे नेण्याचा यशस्वी प्रयत्न केला. त्यांच्या कुटुंबीयांनी त्यांच्या कार्यात मोठे योगदान दिले. हा सामूहिक प्रयत्न होता. आणि त्यातून कोट्यवधी रुपयांची विकासकामे तर उभी राहिली; पण कार्यकर्त्यांची फळीही तयार झाली. महत्त्वाचे म्हणजे या प्रक्रियेत माणसे घडविण्याचे आणि मानवी संबंध दृढ करण्याचे फार मोठे कार्य नकळत पार पडले. हे सारे घडले त्यामागे प्रा. चव्हाण यांची प्रेरणाशक्ती, त्याग आणि सेवाभावी वृत्ती यांचे सुप्त पाठबळ होते, हे महत्त्वाचे.

प्रा. चव्हाण यांचा सांगलीच्या विलिंग्डन महाविद्यालयात मी पहिल्या वर्षाचा विद्यार्थी होतो. पुढे पत्रकारितेत आल्यानंतर त्यांच्या ग्रामीण विकासकार्यातील वाटचालीचा प्रत्यक्ष साक्षीदार बनण्याचा योग आला. या आणि नंतरच्या काळात त्यांच्याशी असलेले स्नेहबंध अधिक दृढ होत गेले आणि प्राध्यापक-विद्यार्थी या आमच्या नात्याचे मैत्रीत रूपांतर झाले. गेल्या काही वर्षांपासून त्यांच्याशी कोल्हापुरात वारंवार भेटी होत असत. सरांच्या डोक्यात सतत नवनव्या कल्पना येत. अरुण गांधी यांच्या नव्वदीनिमित्त त्यांनी त्यांचा कोल्हापुरात सत्कार घडवून आणला. त्या निमित्त एक पुस्तिका इंग्रजी-मराठी अशा दोन्ही भाषांमध्ये तयार करून ती निवडक संस्था व व्यक्तींकडे त्यांनी पाठविली. कोरोनाची लागण होण्यापूर्वी शेवटच्या दिवसापर्यंत त्यांचे कार्यालयात येणे-जाणे सुरू होते. त्यांनीही नव्वदी गाठली होती; पण वयाचा त्यांच्या दैनंदिन कामावर कसलाच परिणाम झालेला नव्हता. भेटी-गाठी, लेखन, पत्रव्यवहार हे सारे अखेरपर्यंत सुरू होते. अगदी रुग्णालयात असतानाही त्यांचे लेखन-वाचन सुरूच होते. त्यांची प्रकृती अगदी ठणठणीत होती. ''मी शंभरी पार करणार,'' असे ते मोठ्या आत्मविश्वासाने व सहजपणे सांगत; पण दुर्दैवाने ते घडू शकले नाही. विशिष्ट ध्येयवादाने झपाटलेले व अर्धशतकाकडून अधिक काळ ग्रामीण विकासकार्यात रमलेले हे सेवाव्रती व्यक्तिमत्त्व अनपेक्षितपणे काळाच्या पडद्याआड गेले. त्यांच्या चाहत्यांच्या मनात त्यांच्या असंख्य आठवणी दीर्घ काळ राहतीलच; पण त्यांनी उभ्या केलेल्या कार्याच्या रूपाने त्यांच्या स्मृतीही सतत प्रवाही व टिकून राहतील, अशी आशा करू या!

**दशरथ पारेकर,** कोल्हापूर
Mob. 94204 54765
dvparekar@rediffmail.com

परशुराम हरी थत्ते

# क्षोभ : १८९६ मधील प्लेगच्या काळातील

**१. प्लेग –** प्लेग म्हणजे गांठ्या ताप. हा ताप नाईल व युफ्राटिस ह्या नद्यांच्या कांठीं हिंदुस्थानांतील बरसातीच्या वाऱ्याप्रमाणें तेथील लोकांस नियतकालिक होतो. त्या प्रदेशाशीं हिंदुस्थानचें दळणवळण वैदिक काळापासून आहे व तें गलबतें व आगबोटी यांनी दिवसानुदिवस वाढत जाऊन तें अलीकडे अत्यंत वारंवार व जलद झालें आहे. म्हणून हा रोग तिकडून इकडे प्राचीन काळीं येऊन पश्चिम व उत्तर हिंदुस्थानांतील कित्येक भागांत अनेकदां पसरल्याचें दिसून येतें. ह्या रोगाचा अत्यंत जुना उल्लेख हिंदुस्थानांतील चरक ग्रंथांत आहे. त्यापुढें इतिहासांत असा उल्लेख सुमारें सात आठ वेळां झाल्याचें आढळतें. त्यांत त्याची बाधा पश्चिम हिंदुस्थानांत बोरिवली, चौल, मंबई व अहंमदाबाद व उत्तर हिंदुस्थानांत आग्रा ह्या शहरांस झालेली आहे.

इ.स.१८९६त प्लेगची पहिली केस तारीख २१ ऑगस्टला मुंबईच्या मांडवी भागांत डाक्तर वाझ यांस आढळली. कोणाच्या मनीं मानसीं नसतांही सदरहू डाक्तरसाहेबांनीं केलेलें अनुमान मोठें प्रशंसनीय होय. पण त्यांस सर वगैरे पदवी देऊन त्यांच्या चतुराईचा थोडाही मोबदला त्यांस कोणीं दिला नाहीं. मांडवींत देशी व्यापाऱ्यांची दाट वस्ती व धान्याचीं मोठमोठीं कोठारें आहेत. त्या कोठारांत व वस्तींत प्रथम उंदीर मरूं लागले, व त्या उंदरांमागून माणसें मरूं लागलीं'! पुढें शेकडों उंदरांचे थवे त्या मांडवींतून इतरत्रं स्थानांतर करूं लागले व नंतर त्याप्रमाणेंच शेंकडों माणसांचे थवे त्या मांडवींतून इतरत्र स्थानांतर करूं लागले. तेणेंकरून डिसेंबरच्या सुमारास मुंबईभर गांठ्या ताप पसरून तो बाहेर गांवीं आगबोटी व आगगाड्यांनीं जाऊं लागला! तेव्हां त्या रोगानें युरोपांत 'ब्लॅक डेथ'प्रमाणें सप्पा उठविण्यास येऊं नये, म्हणून इतालींत जिनोआ येथें युरोपांतील नामांकित वैद्यांची एक परिषद भरली व तिनें मेहेरबानी करून येथील सरकारास 'सेग्रिगेशन' व 'डिसइन्फेक्शन' हे उपाय सुचविले. मुंबईस

अलबत, परशुरामास हा प्लेग क्यांपचा फायदा घेणें शक्य नव्हतें, कारण त्यास पैशाची एवढी अनुकूलता नव्हती, व त्यास वशिलाही सुलभ नव्हता. त्यांत गांव ओस पडल्यामुळें त्याची कोठऱ्यांकडील शिकवणीही सुटली! व त्याच्या चाळींतील सर्व बिऱ्हाडकरू ऐपतदार असल्यामुळें ते झाडून सर्व पळून गेले! व आसपासच्या ओस घरांतही एवढेंच घर या वस्तीचें असल्यामुळें त्यांतील असंख्य उंदीर त्याच्या चाळींत घुसले! व ते जागोजाग रोज मरूं लागले! पण अशा परिस्थितींत परशुराम व लक्ष्मी यांस पांच मुलांसह राहाणें भाग होतें! लोकांची वस्ती मुंबईंत नाहींशी झाल्यामुळें गांवांतील शाळा ओस पडल्या! हजार आठशे मुलांच्या परशुरामाच्या एल्फिस्टन मिडल स्कुलांत फक्त पंधरा मुलें शिल्लक राहिलीं व सरकारच्या बडतर्फीच्या भयामुळे फक्त सर्व मास्तर जागी हजर राहिले तर इतर शाळांची स्थिती काय विचारावी!

तेव्हां कारकीर्द लार्ड सांडहर्स्ट यांची होती. त्यांनीं ह्या उपायांची अंमल बजावणी लोकांच्या दृष्टीनें अपूर्व कठोरतेनें केली. ते संशयित मनुष्यास मुंबईत व बाहेर बंदरोबदरीं व स्टेशनोस्टेशनीं कोंडून ठेऊं लागले! त्यांत नवराबायको, व मुलें आईबाप यांची ताटातूट होऊन अनाथ व बिनवारशी स्थितींत लोकांस मरण्याची पाळी येऊं लागली! त्यांत पक्षपात, अन्याय व दिवसाढवळ्या लुटालूट होऊं लागली! त्यांतील सर्व गोष्टी सांगणें ह्या पुस्तकांत कठीण आहे.

पण नावें गावें न देतां एक उदाहरण मासल्याकरीतां देऊं, गदक म्हणून कर्नाटकांत एक आगगाडीवर सेग्रिगेशन क्यांप होता. त्या क्यांपवर एका तरुण असिस्टंट पो.सुपरिटेन्डेंटाची नेमणूक झालेली होती. एक ब्राह्मणाची बाई पुण्याहून आपल्या नवऱ्याकडून कर्नाटकांत आपल्या बापाकडे जावयास एकटी निघाली. तिला गदक येथें त्या साहेबानें संशयित रोगी म्हणून उतरून घेतलें, व आपल्या राहत्या घरांत पंधरा दिवस घातलें! त्या बाईच्या बापाला ती निघून गेल्याचें पत्र गेलें होतें. त्यास ती वेळीं आली नाहीं हें पाहून तपासास निघावें लागलें. त्यास तिचा पत्ता पुण्यापासून गदक क्यांपपर्यंत लागे, व पुढें लागेना! पण येथील सेग्रिगेशन क्यांपमध्यें इतर सामान्य संशयित रोग्यामध्यें त्याला तिचा मांगमूस मिळाला नाहीं, तेव्हां त्या बापाचा संशय दुणावला व त्यानें कटून फारच बारिक तपास चालविला. ते वेळीं त्यास कळून चुकलें की आपली मुलगी एका मोठ्या स्पेशल प्लेग क्यांपमध्यें झरोक्यांत नेऊन ठेविलेली आहे! त्यानें वात्सल्यानें त्या क्यांपभोंवती किती घिरट्या घातल्या व किती दीनदयाळ आफिसर म्हणविणारांच्या विनवण्या केल्या, पण व्यर्थ! कोठेंही दाद लागून त्याच्या मुलीच्या सुटकेची आशा दिसेना! तेव्हां त्यानें अती धीटपणा करून त्या जिल्ह्यांच्या कलेक्टरकडे दाद मागितली! त्यानेंही प्रथम त्यास पुष्कळ दर्डाविलें, शेवटीं त्याच्या फिर्यादिचा खरेपणा पटून त्यानें एका नेटिव्ह आफिसरास स्वतःचे अधिकार देऊन पाठविलें, पण तो नेटिव्ह होता म्हणून त्या आफिसराची तो युरोपियन अधिकारी पर्वा करीना! शेवटीं, त्या नेटिव्ह आफिसरानें प्रत्यक्ष कलेक्टरच्या अधिकारदानाचा दाखला त्यास दाखविला तेव्हां निरुपाय होऊन टाळाटाळी करतां करतां व हुलकावण्या दाखवितां दाखवितां त्यास आपलें रहातें घर शोधूं द्यावें लागलें! व त्यांत काय झालें? ती बाई त्याच्या घराच्या झरोक्यांत मूर्तिमंत सांपडली! पण परिणाम काय? या बाईची जन्माची माती झाली! पण त्या साहेबाची त्या क्यांपवरून बदली झाली व तो हल्लीं एका मोठ्या हुद्यावर प्रतिष्ठेनें लोकांस नीतीतलें शिकवीत मिरवत आहे!

हीच स्थिती डिसइन्फेक्शनची! त्या उपायांच्या नांवानें किती सच्चा लोकांचें बिछानेच सामान जाळण्यांत आलें व किती लोकांच्या घराच्या जमिनी व भिंती खोदण्यांत आल्या व त्यावरील कौलें काढण्यांत आलीं यांत किती चोऱ्यामाऱ्या, लुच्चेगिऱ्या, व अब्रूलूट होऊं लागली! तेणेंकरून लोक पळू लागले. मुंबईस इतर गांवाच्या मानाने सेग्रिगेशन व डिसइन्फेक्शनचा त्रास कमी होता. पण मुंबई ओस पडली! ती इतकीं कीं ज्या मुंबईत पादचारी लोकांस घोडे, गाड्या, ट्राम, बायसिकल्स वगैरे वाहनांच्या तडाक्यांतून जीव घेऊन मोठ्या मुष्किलीनें जावें लागतें ती झाडून सर्व शुक्क झाली. काळबा देवी सारख्या या रहदारीच्या मोठ्या राजरस्त्यावर सोवळ्या ब्राह्मणांचीं हजारों पात्रें सांडिलीं असती तरी त्यास कोणी व्यत्यय करितना, एवढेच नव्हे तर त्यांचे जेवण सकाळपासून रात्रीपर्यंत होतें तरी त्यास कोणीं विटाळही करिता ना! व्यापार बंद पडला! उन्हाळ्याला मुंबईचा प्लेग शमला, व रोग्याच्या कामावरील अधिकारी आम्ही रोगास आपले 'सेग्रिगेशन व डिसइन्फेक्शन या उपायांनीं हटवून टाकिलें अशा बढाया मारूं लागले! तों तो रोग झाडून सर्व इलाखाभर तर काय पण दक्षिणेस म्हैसूरकडे व उत्तरेस माळवा, कलकता व पंजाबकडे पसरत गेला! तो पुढें प्रत्येक हिंवाळ्याच्या सुमारास मांडवींत हटकून प्रकट होऊं लागला! त्यावर वरिल उपायांची कांहीं मात्रा चालेना! रोग पडला नवा अपरिचित म्हणून शोध चालू असें ठरलें.

ह्या रोगाचीं पहिलीं चिन्हें मनुष्यास सुस्ती येते, त्यांस थंडी वाजूं लागते, त्यास वांती होते. ती वांती अनेक वेळां काळ्या रंगाच्या द्रव्याची असते. रोग्याचा चेहरा जड व मूर्खासारखा वेडावांकडा व विद्रूप होतो, व त्याचे डोळे लाल भडक होतात. त्याला मोठा ताप येतो व त्याच्या जांघा अथवा कांखा यांत दुःख धुसधुसूं लागतें व त्यांतील मांस पिंडांत गांठी उठतात. कधींकधीं शरीरात विषमज्वराप्रमाणें पुरळ उठतो. पुष्कळ घाम येणें हें सुचिन्ह व जुलाब व नांक अथका आंतडीं यांतून रक्तस्राव व बेशुद्धी हीं प्रतिकूल चिन्हें ठरलीं. रोगी अत्यंत अस्वस्थ होतो व त्याचे स्नायूंस पुष्कळ आंचकें येतात. ह्या चिन्हांचें वर्गीकरण करून ह्या रोगाचे दोन तीन प्रकार मानण्यांत आलेः- (१) फुफ्फुस ज्वर अथवा

असा ज्वर कीं ज्यांत फुफ्फुसें विकृत झाली आहेत. हा प्रकार अत्यंत स्पर्शसिंचारी व प्राणघातक असतों. (२) आंत्र ज्वर अथवा ज्यांत असा ज्वर कीं ज्यांत आंतडी विकृत झालीं असतांत व त्यांतून रक्तस्राव होतो. हा प्रकार वरच्या प्रकाराखालोखाल प्राणघातक, व स्पर्शसंचारी समजतात. (३) ग्रंथी ज्वर अथवा असा ज्वर कीं ज्यांत जांघा व काखा यांतील मांसपिंड गांठविकृत होऊन गांठी उठतात. हा प्रकार वरच्या दोहों प्रकारापेक्षा अगदींच कमी प्राणघातक असें म्हणता येत नाहीं, पण हा अत्यंत कमी स्पर्शसिंचारी असतो.

हे प्रकार एका जातीच्या सूम्ह जंतूंच्या योगानें उद्‌भवतात. जे जंतू हवा, पिसवा, रोग्याच्या कपड्यांशीं संबंध आलेले जिन्नस, जीवंत किंवा मृत उंदीर व इतर तसले प्राणी व धान्य यांबरोबर मनुष्यांच्या शरीरांतील रक्तांत संचार करितात व वृद्धी पावतात. हा संचार झाल्यापासून हे जंतू मनुष्यास आठ दहा दिवसांत बाधा करितात. रोग असाध्य असला कीं त्याचा पुरा परिणाम दोन तीन दिवसांत होतो, पण रोग दुःसाध्य असला तर रोगी बरा व्हावयास दोन तीन आठवडेही लागतात. ह्या रोगाचे घातक दिवस म्हटले म्हणजे पहिला, तिसरा व सातवा हे होत. पांच दिवस मधे गेले व गांठी चांगल्या पिकल्या तर रोगी निर्भय बहुत करून होतो. पण ह्या रोगांतील अत्यंत असह्य तापामुळें सर्व इंद्रियें व विशेषतः त्याचें हृदय इतकें दुबळें होते कीं रोगमुक्त काळांतही थोडें कुपथ्य म्हणजे जोरानें उठणे, बसणें, धांवणें, ताणाताण वगैरे त्याज्य क्रिया घडल्या कीं ती आपली कामें करावयाची सोडून देतात व रोगी मरतो. मग रोगयुक्त काळांत तसें कुपथ्य झाल्यास काय होतें हे का निराळें सांगण्याची जरूर आहे? मुळींच नाहीं.

ह्या रोगाच्या प्रसारास अनुकूल परिस्थिति कोणती म्हणावे तर उष्ण, समशीतोष्ण व दमट हवा नद्यांच्या कांठच्या मलईच्या जमिनी; दाट वस्तीची वाईट उजेडाच्या अंधाराची गांवे व निर्वात शहरें व अपुरें व कदान्न खाणारी माणसे ही होय. अशा परिस्थितींत उद्भवलेला एकदां रोग जोरावला कीं तो इतर परिस्थितींतही शिरावयास कमी करीत नाहीं. ह्या सर्व गोष्टींचा केवळ एका जंतुचा विचार करून हाफकिन साहेबानें ह्या जंतूंच्या शवांच्या अर्काचा अंतःक्षेप (इनाक्युलेशन) करण्याची ह्या रोगावरील निवारक औषध होय. अर्थात शोध केला व त्याप्रमाणें त्याच्या योगानें कांहीं निवारकता निरोगी मनुष्यांत उद्‌भवते, पण ती निवारकता

१८९७ चा प्लेग, मुंबईमधील एक छायाचित्र



थोडा वेळ टिकणारी असते व ती पुन्हां पुन्हा मिळविण्याच्या प्रयत्नांत निरोगी मनुष्य त्या विदेशी द्रव्याच्या रक्तांतील मिश्रणानें रोगी होण्याचा थोडा तरी संभव असतो. म्हणून त्या अंतःक्षेपा पेक्षां स्थानांतर हा साधा उपाय जास्त प्रशस्त होय असें उंदरांच्या स्वाभाविक व प्रत्यक्ष पूर्वोक्त स्थानांतरावरून धडधडीत ठरलें. म्हणून 'प्लेग क्यांप' सुरू झाले. त्यांचा फायदा फक्त श्रीमंत लोकांस होऊं लागला. पण त्यांचा फायदा गरीब लोकांस मिळाला नाहीं. त्यांस कारणें तीन होतीं- (१) घर सोडिले तर प्रत्येकास प्लेग सरल्यावर पूर्वीचें बिऱ्हाड मिळावें म्हणून पूर्वीच्या बिऱ्हाडाचें भाडें देत राहावें लागे, (२) प्लेग क्यांप मधील झोंपडीं घेण्यास चाळीस ते साठ रूपये द्यावे लागत व (३) तीं झोंपडीं मिळविण्यास वशिले लावावे लागत.

अलबत, परशुरामास हा प्लेग क्यांपचा फायदा घेणें शक्य नव्हतें, कारण त्यास पैशाची एवढी अनुकूलता नव्हती, व त्यास वशिलाही सुलभ नव्हता. त्यांत गांव ओस पडल्यामुळें त्याची कोठऱ्यांकडील शिकवणीही सुटली! व त्याच्या चाळींतील सर्व बिऱ्हाडकरू ऐपतदार असल्यामुळें ते झाडून सर्व पळून गेले! व आसपासच्या ओस घरांतही एवढेंच घर या वस्तीचें असल्यामुळें त्यांतील असंख्य उंदीर त्याच्या चाळींत घुसले! व ते जागोजाग रोज मरूं लागले! पण अशा परिस्थितींत परशुराम व लक्ष्मी यांस पांच मुलांसह राहाणें भाग होतें! लोकांची वस्ती मुंबईंत नाहींशी झाल्यामुळें गांवांतील शाळा ओस पडल्या! हजार आठशे मुलांच्या परशुरामाच्या एल्फिस्टन मिडल स्कुलांत फक्त पंधरा मुलें शिल्लक राहिलीं व सरकारच्या बडतर्फीच्या भयामुळे फक्त सर्व मास्तर जागी हजर राहिले तर इतर शाळांची स्थिति काय विचारावी! ज्या मराठा हायस्कुलांत परशुरामाची पहिली हरी व यशवंत दोन मुलें जात असत, त्यांतील झाडून सर्व मुलें व मास्तर दोन्हीही नाहींसे झाले. म्हणून परशुरामाचीं दोन मुलें अर्थात घरीं बसलीं! त्यांचा तिसरा मुलगा दतु गिरगांव म्युनिसिपल मराठी शाळेंत जात असे, तो मात्र त्या शाळेंत तसाच जात राहिला! तो एक दिवस घरीं ताप घेऊन आला! त्यास पूर्वोक्त फुफ्फुस ज्वर झाला! त्यास औषध डाक्तर देशमूख ह्यांचें सुरूं करण्यांत आलें. हा ताप स्पर्शसचांरी असल्यामुळें परशुरामाचें धाबें दणाणून गेलें होतें व परशुराम व लक्ष्मी हीं अनन्यभावें देवावर भरीभार ठेऊन राहिलीं होतीं! पण देवाच्या कृपेनें असें झालें कीं दतूच्या आंगांत त्या ज्वराचें वीष फार भिनलें नव्हतें किंवा डाक्तर देशमुख यांचा उपचार चांगला, कसेंही म्हणा, म्हणून दतूच्या तापाला नऊ दहा दिवसांनंतर उतार पडत चालला, पण त्या त्याच्या ज्वरासंबंधें तपास करितां असें कळलें कीं दतू हा त्यांच्या शाळेंत मोठा धीट मुलगा होता म्हणून एके दिवशीं त्या शाळेंत मेलेले उंदीर पडले असतां त्याच्या बेअक्कल मास्तरनें त्याच्याकडून त्याच्या वर्गातील उंदरांची शेपटें धरून त्यांस दूर फेंकविलें होतें व वरील ज्वर हा त्याचा परिणाम होता! ज्याचा शेवट चांगला, तें सर्व कांहीं चांगलें! देवानें खैर केली म्हणून मास्तरच्या बेंवकूफपणाचीं कडू फळें परशुराम व लक्ष्मी यांस चाखावीं लागलीं नाहींत! दतूचा श्वासनलिकादाह उपशम पावत गेला व तो कांहीं दिवसांनीं निखालस बरा झाला!

ह्या सर्व दुःखांत कुटुंबावर ईश्वराकडून एक दोन गोष्टी मोठ्या मेहेरीच्या झाल्या. त्या ह्या कीं ज्या चाळींत परशुराम व लक्ष्मी हीं राहत होतीं, ती सोमणाची चाळ अगदीं नवीन कोरी करकरीत बांधलेली होती व इतर सर्व बिऱ्हाडें निघून गेल्यावर त्याचें बिऱ्हाड अनायासें 'प्लेग हट' प्रमाणें इतर मनुष्यांच्या संसर्गांपासून मोकळें झालें होतें व अशा संकटांत दादर येथें प्लेग क्यांपांत कोठारे यांचें घराणें कोहीनूर मिलजवळ राहण्यास गेलें होतें, तेथे सदरील कोठाऱ्यांनीं आपला भाचा सोकरजी व इतर मुलें यांस इंग्रजी मराठी शिकविण्यास दादरचा पास देऊन थोड्या दिवसांनी परशुरामास बोलाविले! व तेणेंकरून ह्या कुटुंबास पैशाची थोडी मदत झाली व वर सांगितलेल्या उंदारांच्या पाठीमागून एक मोठी चपळ काळी मांजर त्या बिऱ्हाडीं येऊन राहिली व तिनें त्या बिऱ्हाडांत त्या उंदरांच्या शिकारीचा सपाटा चालवून व त्यांत एकही उंदीर फिरेनासा करून त्यांत गांठ्या तापाच्या जंतूंचा संसर्ग व होईनासा केला! तो इतका कीं त्या मांजरीच्या राखणेवर ह्या कुटुंबाने त्या बिऱ्हाडांत प्लेगची पहिलीं चार वर्षे बिनधास्त काढिलीं!

**२. बदली** – पण मध्यंतरी असें झालें कीं परशुरामानें नाशिक येथें काशिनाथ तात्या यांस प्लेगच्या प्रादुर्भावाची हकीगत कळविली, त्याबरोबर तात्यांनीं त्यास जमेल तर नासिक हायस्कुलांत बदली करून घेऊन गांठ्या तापाच्या आपत्तींतून सुटून जाण्याचा उपाय सुचविला. खरोखरी ह्या वेळीं तात्यांचें हृदय खऱ्या मायेनें द्रवल्याचें प्रत्यक्ष चिन्ह त्यांचे पत्रांत दिसत होतें! व म्हणून परशुराम व लक्ष्मी यांनीं त्याप्रमाणें सहज साधलें तर करण्याचा निश्चय केला! मे. चाट फील्ड साहेब डिरेक्टर यांनीं या सुमारास एक हुकूम मिडल

स्कूलच्या हेड मास्तरांस असा दिला कीं या शाळेंतील मास्तरांस मुलांच्या अभावीं कामें नाहींत, म्हणून त्यांनी मुंबईंतील आपलें काम सोडून वाटेल तिकडे जातां कामा नये, त्यांनी शाळेंत मुलें असोत कीं नसोत रोज शिरल्याप्रमाणं वेळच्या वेळीं कामावर हजर राहत जावें, पण ह्या हुकमाप्रमाणें जो वागणार नाहीं त्यास मुंबई सरकारच्या प्लेगांत सरकारी नोकरांनीं कसें वागावें ह्याबद्दल काढलेल्या वटहुकमाप्रमाणें बडतर्फ करण्यात येईल, पण कोणा नोकरास जिल्ह्यांतील इंग्रजी शाळेंत तूर्त किंवा कायमच्या जागीं काम करण्याची इच्छा असेल तर त्या इच्छेप्रमाणें इकडे कळविण्यांत आल्यास त्यास सवडीप्रमाणें तिकडे बदलण्यात येईल. ह्या पत्राचा फायदा घेण्याचा निश्चय करून परशुरामानें आपली इच्छा नाशकास काम करण्याची वरिष्ठांस कळवून ठेविली. तेव्हां त्या वर्षांची सांथ उपशम पावण्याचीं स्पष्ट चिन्हें दिसत होतीं!

पण हें वरिष्ठास कळवितांना परशुरामाचा कोटीक्रम पुढीलप्रमाणे होताः– जे थोडे लोक मुंबईस मरत राहतील त्यांत आपला समावेश कशावरून होणार नाहीं? वर सवड मिळाली तर तिचा फायदा न घेणें म्हणजे शुद्ध मूर्खपणाची दांडगाई हौस! नेहमीं 'सेफ साईडनें' म्हणजे निष्कंटक मार्गानें गमन करीत असावें! कारण म्हटलें आहे कीं 'न्यायें वागे त्यातें तिर्यंच्यांचीहि साह्यता' होते. हे मनांत आणून जी इच्छा परशुरामानें धरिली, तीप्रमाणें त्यास नाशिक येथें हायस्कूलांत गद्रे मास्तर यांच्या जागीं बदली नेमिलें. त्यांस पांच रुपये बढती मिळाली. हायस्कूलचे हेडमास्तर द्वारकानाथ राघोबा तर्खडकर हे होते. बदली तीन महिने चालली. परशुरामाला तिसऱ्या व चवथ्या यत्तेचे वर्ग शिकवावे लागले. परशुराम नाशकास येऊन प्रथम तात्यांकडे उतरला होता. पण त्यांचेजवळ सीताबाई जहागीरदारीण राहत होती व तिच्या एकमुखी राज्यांत तीस परशुरामाचें तात्यांवरील वजन अत्यंत असह्य झालें! म्हणून तिनें त्यास घरांतून पळविण्याकरितां लक्ष्मीस त्रास देण्यास सुरवात केली! तात्यांसारख्या हूद्देदाराच्या घरांत तांदूळ आपले शिजविण्यास बाजारांतून यावयाचे, पण सीताबाईनें आखाड सासू होऊन साळ आणिली व ती रोज लक्ष्मीकडून सडून घेण्याचा सपाटा चालविला! एक दिवस शेतीवरून आवईच्या माजऱ्या शेंगा आणून त्यांची भाजी ह्या कुटुंबास तिनें खाऊं घातलीं, तेणेंकरून तें सर्व कुटुंब बहुतेक बेशुद्ध व बेजार झालें! एवढा कडक उपाय योजण्याचें कारण असें झालें होतें कीं तात्यांनीं ह्या वेळीं पेनशन घेतलें तर त्या नवीन घटलेल्या उत्पन्नाच्या मगदुराप्रमाणें परशुरामानें तात्यांस पूर्वींचा खर्च कमी करण्यास सुचविलें होतें! परशुरामानें लगेच निराळें बिऱ्हाड तात्यांच्या इच्छेविरुद्ध केलें! तो पुलापलीकडे नावरेकरांच्या वाड्यांत राहण्यास गेला. तेथें राहत असतां परशुराम व लक्ष्मी यांचा काळ प्रथम सुखानें जाऊं लागला. पण त्यास व्यत्यय आणण्यास पुढें असें बलवत्तर कारण झालें कीं त्यांची दोन मुलें–यशवंत व कुशी ही आजारानें अत्यंत बेजार झालीं! तो आजार कोणता म्हणाल तर प्लेगाशिवाय दुसरा तिसरा कोणताही नव्हता! मुंबईस असतां त्यांच्या दतू मुलास मेलेले उंदीर उचलल्यानें प्लेग झाला होता, त्याप्रमाणें ह्या मुलांस नाशकास असता अगदी विनाकारण प्लेग झाला! त्या मुलांनीं कधींहीं मेंलेले उंदीर उचलले नव्हतें. एवढेंच नव्हे तर त्यांना मुंबई सोडून एक महिन्यावर दिवस झाले होते व नाशकांत त्यावेळी प्लेगनें आपले बिऱ्हाड अद्याप केलें नव्हतें व त्यामुळें स्पर्शसंचाराचा संशय घेण्यास जागा नव्हती. आपल्या कुटुंबात प्लेगाचा संचार न व्हावा म्हणून परशुरामानें त्यास मुंबईहून नाशकास आणिलें होतें तरी भवितव्यता त्याच्या मागची चुकली नाहीं! त्यांच्या मागून प्लेग मुंबईहून नाशकास आला!

ज्याप्रमाणें दतूस प्लेगाचा प्रकार फुफ्फुस ज्वर याची बाधा झाली होती, त्याप्रमाणें यशवंतास प्लेगाचा प्रकार आंत्र ज्वर याची बाधा झाली व कुशीस प्लेगाचा प्रकार ग्रंथि ज्वर याची बाधा झाली! अशा प्रकारें या यमसिंकर प्लेगानें आपले तिन्ही मासले या कुटुंबास दाखवून यमदरबारचें निरंकुशत्व पूर्णपणें प्रतीतीस आणून दिलें! यशवंत यास अतिशय ताप चढे व तो फार बेफाम होई! तो इतका कीं त्यास दोऱ्यांनीं घराच्या चौकोनीं खांबास बांधून ठेवावें लागत असे! कारण तो गोविंदराव बेलसरे मास्तरसारख्या बळकट पुरुषास आटोपत नसे! बेलसरे हे कोण हें सांगावयास नकोच. हे भुसावळ येथील परशुरामाचे फर्स्ट असिस्टंट. हे भुसावळ येथून बदलून हायस्कुलांत एक असिस्टंट होऊन परशुरामाप्रमाणेंच आलेले होते. हे मोठे धीट व बळकट होते व म्हणूनच परशुरामानें त्यांस बडवणी संस्थानांत पूर्वीं सांगितल्याप्रमाणें वसाहतीच्या कामास नेण्याचा विचार केला होता. हे परशुरामास ह्या आणीबाणीच्या प्रसंगी फार उपयोगीं पडले, संकटांत उपयोगीं पडतो, तो खरा स्नेही! हे रोज रात्रीं निजण्यास परशुरामाकडे येत असत. ते या

आजारास भीत नसत. याप्रमाणें परशुरामानें मुंबईचे डाक्तर सदाशिव वामन काणे यांस सदरीं विराट पुरुषाच्या अक्राळविक्राळ सहस्रानानांत दुनिया कशी जाऊन पडत आहे हें लिहून त्यांस स्वतःच्या मुलांचें प्रकृतिमान कळवून त्यांस उपचार विचारिले. तेव्हां त्यांनीं पत्रानें उत्तर न देतां नाशिकच्या पीची फिप्सनच्या आरोग्य गृहांत बिऱ्हाड आणून ठेविलें व तेथून घोड्याची गाडी करून ते स्वतः परशुरामाकडे आले व त्यांनीं मुलांच्या उपचाराची कांहीं व्यवस्था लावून दिली व त्या व्यवस्थेप्रमाणें पंचवटींतील एका दवाखान्यांतून कांहीं उपचार चालू झाले. पण कांहीं उपयोग झाला नाहीं, कारण मूर्तिमंत प्लेगाला ते बिचारे काय करणार! पण ह्या त्यांच्या कृत्यानें त्यांच्या दयाळूपणाची उत्तम साक्ष पटली.

यशवंत दिवसानुदिवस अधिकाधिक बेफाम होत चालला! त्याचे हातपाय वा कानाच्या पाळ्या वारंवार थंड पडत चालल्या! तो वांचण्याची आशा कमी वाटूं लागली, कारण तो फार खंगत चालला! पण हा मुलगा गोरागोमटा व बराच बुद्धिमान असल्यामुळे परशुराम व लक्ष्मी यांस असें वाटत असें कीं ह्या मुलास आपण चांगलें शिकवून डाक्तर करून हा आपल्या घराण्याचें नांव राखील, एवढेंच नव्हे तर तो घराण्याचें गेलेलें नांव पुन्हां मिळवील. पण तो परलोकीं चालला असें वाटून त्यांस काय दुःख झालें असेल तें अनुमानानेंच ताडणें बरें! त्यांतल्या त्यांत ह्या मुलावर लक्ष्मीचें सर्वांत जास्त प्रेम होतें. तेव्हां तीस परशुरामापेक्षांही जास्त वाईट वाटूं लागलें! ती फार गयांवयां करूं लागली! पण काय करणार! धन्याचा धनी कोण! वगैरे ठराविक समाधानाच्या गोष्टी सांगून परशुराम स्वतः दुःखी असतां लक्ष्मीचें समाधान करण्याचा नेहमीं प्रयत्न करीत असे! पण त्या कोटीक्रमानें का कोठें कोणाच्या पोटांतील खरी दुःखाची कालवाकालव बंद पडते! पुढें ज्वराच्या दहा अक्रावे दिवशीं परशुरामानें तो ज्वर विषम समजून स्वःच्या अकलेने त्रंबकींतून विषम ज्वरावर औषध काढिलें व तें बाजारांतून आणून त्याचा काढा केला व तो त्यास दोनदां तीनदां दिला असेल नसेल व परशुराम व लक्ष्मी यांनी त्याचें आयुष्य वाढविण्याकरितां मोठ्या सद्गदित अंतःकरणानें व मोठ्या भक्तिभावें आपले पुण्याचें पाणी त्याच्या हातावर सोडलें असेल नसेल तोंच त्यास घाम सुटला व अत्यंत दुर्गंधी जुलाब जंतासह झाले व त्यास दिवसानुदिवस आराम पडत चालला! पण तो इतका अशक्त झाला कीं त्याच्या कित्येक दिवस तो उभा राहिला कीं झेंपा जात असत! अशा प्रकारें तो एक दिवस तोंड धुण्यास घराच्या जोत्याच्या कांठाजवळ जात असतां त्याची झेंप गेली व तो जोत्यावरून पडला व त्याचा एक पुढचा दांत पडला व कपाळावर एक खोंक पडली, त्यांच्या खुणा अद्याप त्याचे आंगावर आहेत!

याप्रमाणेंच स्थिती कुशीची होती! तिचे आंगात ताप अत्यंत जोराचा असे. पुढें तिच्या जांघेत गांठी आल्या व ती बेशुद्ध झाली! ती इतकी कीं तिच्या तोंडात अर्ध्याभर दूध ओतलें तर तें गिळण्याची तिला जाणीव नव्हती, मग औषधाची गोष्ट कशास हवी! तिला औषधापाण्यावांचून पाटींत झांकून ठेविलें होतें! उपचार केले नाहींत असें नच म्हणावयास तिच्या गांठीभोंवती समुद्रफळ उगाळून लावून त्यांवर बिब्बा घालण्यांत आला होता! तिच्या वांचण्याची आशा यशवंतापेक्षां जास्त होती असें मुळींच नव्हतें! त्यांत ती परशुराम व लक्ष्मी यांची एकुलती एक मुलगी! ती कुच्चर आहे असें परशुरामास आढळलें होतें म्हणून परशुरामाचें तिजवर लक्ष्मीच्या प्रेमाइतकें प्रेम नव्हतें तरी ती मृत्यूच्या दारीं पडली असतां तिजवर परशुरामाचें लक्ष्मी इतकेंच प्रेम होतें! पण बायकांस मुली मुलांपेक्षां नेहमींच जास्त आवडत असतात या न्यायानें पाहिलें असतां लक्ष्मीचें प्रेम तिजवर परशुरामाच्या प्रेमापेक्षां एकंदरीत जास्त होतें! पण सर्व संततींत ही संतती केवळ परशुरामाच्या प्रथम उचलीनें झाली व ह्या संततीस स्त्रीत्व लक्ष्मीच्या इच्छेप्रमाणें केवळ काकतालीय न्यायानें मिळालें होतें, म्हणून कोणास दुसऱ्यावर प्रेमाच्या बाबतींत उणेपणा दाखवून हिणविण्याचें कारण नव्हतें! तेव्हां ती मरावयास टेकली असतां तिच्या संबंधें ह्यांस अत्यंस दुःसह दुःख होऊं लागलें! पण देव तारी त्यास कोण मारी! ती मृत्यूच्या जबड्यांतून त्या ईश्वरी संकेतानें ओढून दुनियेंत ठेवण्यांत आली! ती हळूहळू बरी होती गेली!

अशीं हीं दोन परशुरामाचीं व विशेषतः लक्ष्मीचीं लाडकी मुलें ईश्वरी दयेनें वांचण्याच्या पंथास लागली तेव्हां त्यांच्या आनंदाचा पारावार काय वर्णावा! ह्याच वेळीं नाशकांतील पेठ तालुक्यांतील पिकें बुडून पडलेला दुष्काळ तेथील लोकांस अत्यंत जाचकारक झाला. म्हणून तेथील लोक पोटाकरितां शहरांस उतरून आले! त्यांचें स्वरूप असें होतें– त्यांच्या हातापायांच्या काड्या, पोटाचें ढेरकें, व तोंडांचा हुक्का झालेला होता! त्यांच्या बृहतींत लंगोटी व आंगावर लकतऱ्या होत्या! अशा स्वरूपाचीं माकडें नव्हेत तर

नांवाची माणसें तेथें गोदावरी नदीभर उतरलीं होतीं! त्यांतील पुरुष व स्त्रिया शहरांतील लोकांच्या दारोदार फिरत व भाकरीतुकडा ओला सुका तसाच खात व गंगेचे पाणी पीत व तिच्या वाळवंटांत किंवा खडकांवर निजत! पण त्यांस धंदेवाल्या व पिढीजाद्या भिकाऱ्यांप्रमाणें भीक कशी मागावी हें मुळींच समजत नसे. तें असें कीं त्यांस कोणी भीक घालण्यास पुढें केली तर ती घेण्यास त्यांस आपला पदर पुढें करण्याची अक्कल नसे! अशीं हीं अकृत्रिम दयेस पात्र माणसें होतीं! हें जाणून परशुराम व लक्ष्मी यांनीं आपल्या मुलाच्या वांचण्याबद्दल कृतज्ञ होऊन चणेचुरमुरे त्यांस वाटण्याची सुरूवात केली! हें त्याचें कृत्य कांहीं दिवस चाललें होतें! त्यांनी सिंहस्थविधी भटाच्या विनवण्यास भुलून केला नाहीं व त्यांनीं सर्व बचत या धर्मकृत्यांत घातली! इतक्यांत ते काम परशुरामाप्रमाणें मुंबईहून प्लेगाकरितां पळून आलेल्या भाट्ये लोकांनीं उचलून मोठ्या प्रमाणावर चालू केलें तेव्हां परशुरामाच्या तुटपुंज्या धर्मादायाचा फारसा उपयोग नाहींसा झाला! तेव्हां त्यानें चणेचुरमुरे त्यांस गंगेवर वांटण्याचें सोडून एकाच मनुष्यास भाकर पुरवून वांचविण्याचें ठरविलें व त्याप्रमाणें तो तें करूं लागला!

इकडे भाट्ये लोकांनीं जे अन्नदान चालू केलें, त्याचा परिणाम तें घेत्याच्या मरणांत होऊं लागला! तीं माणसें कित्येक दिवस उपासमार झालेलीं होतीं. त्यांस भाट्यांच्या अन्नछत्रांतून डाळभात मिळूं लागला. पण तो त्या नाचणी वरी वगैरे निकस अन्न सदां खाणाऱ्या माणसांस मानवला नाहीं. त्यांत पटकी चालू झाली. तिच्या योगानें तींतील फार माणसें मरूं लागलीं! त्याबरोबर तीं नाशकांतून पळून जाऊं लागलीं! व जातां जातां रस्त्यानें मरून पडलेलीं आढळूं लागलीं! व त्यांच्या संसर्गानें तेथील मूळच्या रहिवाशांत पटकी पसरूं लागली! तेव्हां तें पाहून सरकारनें पोलीसमार्फत त्या लोकांच्या टोळ्या पेठेकडे नेऊन घालण्याची सुरवात केली तसे रस्त्यानें मरून पडणाऱ्या लोकांच्या संख्येची कमाल झाली!

परशुरामानें यशवंत बरा झाल्यावर त्यास गंगापूरचा धबधबा पाहण्यास तात्यांच्या टांग्यातून नेलें होतें तेव्हां त्यांच्या हा हृदयद्रावक देखावा नजरेस पडला! एके दिवशीं परशुराम मुलांसह डोंगरउताऱ्यावरून पंचवटींतील कुंभारांच्या विटांच्या भट्ट्यांमधून आग्रारोडनें चालला असतां त्यास सांसर्गिक पटकीनें ग्रस्त झालेली पण जवळ चिटपाखरूंही नसलेली एक कुंभारीण आढळली! तिला वरचेवर जुलाब व वांत्या होत होत्या! तिचे डोळे खोल गेलेले होते! तिच्या हातापायांतून पुन्हः पुन्हां पेटके येत होते! तिची वाचा नीट नव्हती! तिचे जवळ पाणी पिण्यास एक थंड पाण्याचें मडकें होतें! परशुरामाने तीस 'औषध घेतेस का' म्हणून विचारिलें. तेव्हां तिनें मरेन तर बरें असें म्हटलें. त्यानें असें कां? म्हणून विचारिलें. तिने माझेवर प्रेम करणारें कोणी नाहीं, पण गांवीं गेलेल्या माझे नवऱ्याचें आयुष्य वाढो असें म्हटलें. त्याबरोबर परशुरामास तिचें महत्व जास्त वाटलें व त्यानें तीस मरण्याची इच्छा न करण्यास व औषध घेण्यास तिचें मन वळविलें व घरातून त्यानें लक्ष्मीजवळून भिलावे व चिंच यांच्या गोळ्या साबूदाण्याची कांजी करून आणून तीस देण्यास प्रारंभ केला व ती थोडे दिवसांनीं अगदीं निकोप बरी झाली व ती व तिचा नवरा हीं कृतज्ञतेनें परशुरामाच्या बिऱ्हाडीं कधींकधीं येऊंजाऊं लागलीं!

इतक्यांत गद्रे कायमची नोकरी सोडून जाणार होते. पण ते तसें न करितां त्यांची तीन महिन्याची रजा संपतांच एप्रिल महिन्यांत आपले नासिक हायस्कुलांतील जागेवर रुजू झाले. तेव्हां परशुरामास नासिक सोडून परत मुंबईस आपल्या मिडल स्कुलांतील जागेवर रुजू होण्यास परत जावें लागलें! पण गद्रे पुन्हां रजेवर जाण्याचा किंवा रिटायर होण्याचा संभव होता, व नासिकची हवा मुंबईपेक्षां तर काय पण सगळ्या हिंदुस्थानांत अत्यंत आरोग्यकारक होती व परशुराम आठपंधरा दिवसांत मे महिन्यांत उन्हाळ्याच्या सुट्टीनिमित्त परत नाशकास येणार होता म्हणून परशुरामानें लक्ष्मीस मुलांसह नाशकासच ठेविलें व तो एकटाच मुंबईस निघून गेला, पण तो तिकडे जाण्यापूर्वी तो हरीसह तेथील कोरीव लेणी पाहून आला. इकडे लक्ष्मी नाशकास एकटी राहिली असतां तेथें पेठच्या लोकांच्या संसर्गानें मूळच्या लोकांत उठलेल्या पटकीची इतकी कमाल झाली कीं सरकारने पटकीचा गांवोगांव प्रसार बंद करण्याकरितां त्या वेळीं सिंहस्थ पर्वणीनिमित्त येणारी यात्रा बंद करावी लागली! पुढें नाशकास परशुराम परत सुट्टींत आला असतां लार्ड सँडहर्स्ट यांच्या हातून नासिक येथील गंगेवरील काशिनाथ तात्यांनीं सर्व पैसे जमा करून आपल्या हयातीचें व नोकरीचें कायमचें व शेवटचें स्मारक म्हणून उभारलेला पूल चालू करण्यांचा विधी तमाम लोकांच्या टाळ्यांच्या गजरांत उरकण्यांत आला! फक्त या विधीस येथील कांहीं फुकट खाऊ व नवविद्वेकी भटभुक्षुकांचीं रिकामटेकडीं टारगीं व असमंजस

पोरें असंमत्तीपर हुशहुश उद्गार काढतांना कोठेंकोठें दिसत होतीं! पण तींच पुढें बहुजन समाजाच्या लोटाबरोबर त्या नासिक व पंचवटी जोडून लोक कल्याण साधणाऱ्या पुलावरून मोठ्या आतुरतेनें व अहमहिमिकेनें पंचवटींत जाऊन आपण केलेल्या नीच कृत्याबद्दल मनांतल्या मनांत पस्तावल्याचीं उघड चिन्हें प्रदर्शित करीत होतीं! हा विधि पाहिल्यावर परशुराम व सुट्टी सरल्यावर परशुराम एकटाच मुंबईत गेला व नातूच्या चाळींत बिऱ्हाड पाहून त्यानें लक्ष्मीस मुलांसह मुंबईस आणिलें! कारण गद्रे रजा किंवा पेनशन घेऊन त्यास त्याची जागा मिळण्याची आशा बिलकुल राहिली नाहीं.

**३. महत्त्व –** ह्या व ह्यापुढील मिळून एक तपभर परशुरामानें मुंबईस वस्ती केली. त्यांत पूर्वोक्त प्लेगाचें अधिभौतिक संकट ह्या कुटुंबाच्या अखंड राशीस लागलें होतें, व त्यांस पगाराशिवाय त्यांच्या इतर प्राप्तीला अगदीं पुरी चाट बसली होती! ती इतकीं कीं त्यांस प्लेगाचीं पहिलीं चार वर्षें वगैरे कोणाच्याही हेल्थ क्यांपमध्यें एखादी अगदीं लहानशी झोपडी विकत घेऊन राहण्याची एवढेंच नव्हे तर त्यास स्वतःचा चरितार्थ अब्रूनें पुरा चालविण्याचीही ऐपत नव्हती! मग त्यांत मुलांचे कपडेलत्ते व शाळांची फी, त्यांची दुखणी पहाणी व मुंजीलग्नें वगैरे बाबींचे नित्य व नैमित्तिक खर्च कसे निभणारं! पण त्या चार वर्षांत तर काय पण पुढील आठ वर्षें हे झाडून सर्व खर्च मुंबई सारख्या महागाऱ्या शहरीं अगदीं बिनभोभाट भागले, त्यांत त्याचें श्रेय ह्या कुटुंबांतील इतर मेंबरांकडे जितकें आहे त्याहून तें कितीतरी पटीनें खुद्द लक्ष्मीकडे आहे, कारण त्यांतील इतर मेंबरांच्या कर्तृत्वापेक्षां लक्ष्मीचें कर्तृत्व कितीतरी मोठें व महत्वाचें व्यापक होतें!

ह्या कुटुंबाचें तारूं प्लेग व दुष्काळ यांच्या भर तुफानांत एकीवर एक लोटत येणाऱ्या लाटांच्या तडाक्यांनीं संसारसागराच्या एका किनाऱ्यावरील खडकांच्या सुळक्यापासून दुसऱ्या किनाऱ्यावरील खडकांच्या सुळक्यांवर क्षणोक्षणीं आपटूं पाहत असतां त्यावरील एखाद्या उतारूचें धैर्य अगदीं अखंड अचल राहिलें असेल तर ह्या लक्ष्मीचेंच होय व ह्या प्राणावर बेतणाऱ्या संकटांत अमूक एक काम मी करणार नाहीं असें न म्हणून तें छातीनें व आत्मनिरपेक्ष तडीस नेणारी नावाड्याची व नाखव्याची व्यक्ती असेल तर ती ह्या लक्ष्मीचीच होय! ही व्यक्ती इतर उतारूंबरोबर उतारूं, इतर नावाड्यांबरोबर नावाडी, हें तर काय पण सुकाण्या व नाखवा यांचें सहकारितेनें व स्वतंत्रपणानें जसें पडेल तसें काम करणारी होती! ती एका क्षणीं त्या तारवावरील भटारखान्याचें काम करण्यास तत्पर असे तर दुसऱ्या क्षणीं त्या तारवांत पूर्वोक्त तुफानानें शिरलेलें पाणी हवेस करून काढून टाकण्यांत गुंग असे, ती एका क्षणीं तारवांची गती वाढविण्यास इतर नावाड्याबरोबर वल्ह्यांनीं हलेसे मारण्यांत गुंतलेली असे तर दुसऱ्या क्षणीं तारवाच्या सगळ्यांतील उंच तक्तपोशीवर बसून दुर्बिणीनें खडक निरखून ते टाळण्याकरितां सुकाण्यास ओरड न करितां अगदीं गापचुप नेत्रसंकेतानें इशारे देण्यांत गढलेली असे! अशा प्रकारच्या लक्ष्मीच्या अप्रतिम दक्षतेमुळें व बहुगुणीपणामुळें ह्या देवक्षोभाच्या वेळीं परशुरामाचे कुटुंबाचे कोठेंही दगा फटका न होतां गरीबी असतांही अब्रूनें निभावलें, एवढेंच नव्हे तर त्या कुटुंबाचें डोकें इस्टेट गेल्यामुळें आलेल्या हीन स्थितींतून हळूहळू वर निघूं लागलें व तें इतरांस हीन स्थितींतून त्यांचीं डोकीं वर काढण्यास मदत करूं लागलें!

म्हणूनच पूर्वापार कुटुंबवत्सल पुरुषांचें महत्त्व नंग्याभटिंगापेक्षां ह्या देशांत जास्त मानीत आले आहेत, व त्या ध्येयाप्रमाणें ह्या देशांत नंग्याफटिंगापेक्षां बायका मुलांच्या धन्यांची संख्या जास्त आहे, पण निलाजऱ्या भटिंगांनीं भरलेल्या राष्ट्रापुढें सध्याच्या कालमहिम्याप्रमाणें अब्रूदार कुटुंबवत्सलांनी भरलेल्या राष्ट्रांस मात्र हार खावी लागत आहे. येंत तें ध्येय फिकें पडूं पहात आहे ही मोठी दुःखाची गोष्ट आहे! पण थोड्या कालांतरानें नवी दुनिया अनुभवानें शहाणी होऊन आत्मघातकी नंग्याभटिंगाचें ध्येय सोडून देऊन जुन्या आत्मोन्नतिकारक कुटुंबवत्सल धन्यांचे ध्येयाकडे वळेल ही खात्री आहे!

0

(परशुराम हरी थत्ते यांना १८५६ ते १९४० असे ८४ वर्षांचे आयुष्य लाभले. त्यांनी लिहिलेले **अलक्ष्यरूप : सौ.लक्ष्मीबाई व परशुराम थत्ते यांचे चरित्र व संसार** या नावाचे हस्तलिखित पुस्तकरूपाने आले आहे. मराठी संशोधन मंडळ, मुंबई यांनी ते पुस्तक प्रकाशित केले आहे. मंडळाचे अध्यक्ष डॉ.प्रदीप कर्णिक यांनी अभ्यास-संशोधन करून ते पुस्तक दिमाखदार पद्धतीने काढले आहे. त्याला विवेचनात्मक प्रस्तावनाही लिहिली आहे. त्या पुस्तकातील एक प्रकरण येथे प्रसिद्ध करीत आहोत. बरोबर सव्वाशे वर्षांपूर्वीचे म्हणजे १८९६ मधील प्लेगच्या काळाचे वर्णन करणारे प्रकरण.. – संपादक)

नवे पुस्तक

सुहिता थत्ते




# अलक्ष्यरूप : दासी ते स्वामिनी

दासी ते 'स्वामिनी' झालेल्या माझ्या या पणजी-आजीचे, लक्ष्मीबाई थत्ते यांचे चरित्र.

माझ्या वडिलांचे आजोबा म्हणजे यदुनाथ थत्ते यांचे आजे आणि माझे पणजे परशुरामपंत हरी थत्ते यांनी शंभर वर्षांपूर्वी त्यांच्या पत्नीचे सौ.लक्ष्मीबाई थत्ते यांचे आणि दोघांच्या संसाराचे चरित्र लिहून ठेवले होते. ते आजवर अप्रकाशित अवस्थेत थत्ते यांच्या घरात पडून होते. त्याचा शोध माझी वहिनी डॉ. शुभा थत्ते हिने घेतला आणि डॉ.प्रदीप कर्णिक यांच्या सहकार्याने ते प्रकाशात आणण्याचे ठरवले. आज ३१ जानेवारी रोजी ते पुस्तक आले. मुंबईच्या मराठी संशोधन मंडळातर्फे ही त्या दोघांच्या संसाराची अप्रकाशित चरित्रगाथा उजेडात येत आहे, याचा मला परशुरामपंतांची पणती म्हणून खूप आनंद होत आहे.

कर्तृत्ववान स्त्रियांची चरित्रे/आत्मचरित्रे मराठीत अनेक आहेत, परंतु सामान्य गृहिणीचे चरित्र, तिचा संसार, तिच्या वाट्याला आलेला भोग, छळ, कष्ट यांचे वर्णन फारच अल्प सापडत असेल... एका सामान्य गृहिणीचे हे मराठीतील एकमेव चरित्र असावे.

परशुरामपंतांचा जन्म १८५६ मध्ये चिपळूण येथे झाला. त्यांच्या वयाच्या ११ व्या वर्षी त्यांचे लग्न त्यांच्या पत्नीशी, लक्ष्मीशी तिच्या वयाच्या सहाव्या वर्षी झाले.. ती सून घरात यायला व आणि एकामागून एक संकटे घरावर यायला एकाच गाठ पडली आणि या केवळ सहा वर्षांच्या चिमुरडीवर 'हतभागीपणा'चा शिक्का बसला. टोमणे खात खात, तिच्या वाट्याला घरादाराचे सोडाच, साधे नवऱ्याचेही प्रेम न येता केवळ दुर्भाग्यच आले. नवरा शिक्षणासाठी थोरल्या भावाकडे धुळ्याला निघून गेला आणि 'नवरा येईल' या आशेवर घरातल्या साऱ्यांचे काबाडकष्ट उपसत राहिली. तिची जाऊ तिचा जाच करी, शिळेपाके पानात पडे. ती अगदी अस्थिपंजर होऊन तग धरून होती.

मुळात त्यांनी चरित्र लिहून ठेवलंय हे तरी कुठे घराण्यातील कोणाला ज्ञात होते! मराठी संशोधन मंडळाच्या प्रयत्नांमुळे हे चरित्र तरी प्रकाशात येत आहे. आमच्या घरात पत्रकारितेचे जे वलय आलंय त्याचं उगमस्थान परशुरामपंतांमध्ये आहे, हे आज माझ्या लक्षात आले आणि ऊर भरून आला. माझ्या पणजीचे हे चरित्र, त्यांचा संसार, पणजोबांचे चरित्र आमच्यासाठी तर बहुमोल ठेवा आहेच; पण सामान्य वाचकांना 'काळाचा इतिहास' म्हणूनही हा ठेवा लाभणार आहे. यदुनाथ थत्ते यांच्या रक्तात पत्रकारितेचा ऋणानुबंध निर्माण करणारे त्यांचे आजोबा आणि माझे पणजोबा यांना मी मनोमन नमस्कार आणि पणजी-आजीच्या कार्याला सलाम करते. माझ्या पणजोबांची 'साधना' माझ्या वडिलांच्या हातात आली, हे आमच्या घराचे केवढे मोठे भाग्य!

लक्ष्मीचा नवरा शिकतो, खरे तर त्याला डॉक्टर व्हायचे असते, पण घरातून सहकार्य मिळत नाही. मग तो मास्तर होतो. भुसावळला त्याला नोकरी मिळते. तो तिथे रुजू होतो. शाळा भरभराटीला येते इतकी तो मेहनत घेतो. मात्र बायकोला न्यायचे नाव घेत नाही. ''ऋतुमती होऊनही मला माझा नवरा नेत नाही, आता मी जीव देते'' अशा तिच्या निर्वाणीच्या शब्दांनी घर 'जागे' होते. आणि तिची मोट नवऱ्याच्या पदरात बांधून तिला भुसावळला पाठवण्यात येते. ते दोघे भुसावळला येतात, 'संसार' सुरू होतो. पण संसार चालविण्याचे कुठलेच ज्ञान सासरी न मिळाल्यामुळे, किंबहुना स्वयंपाक करण्याच्या कामापासून सर्वच कामांच्या ज्ञानाला वंचित ठेवलेल्या आपल्या पत्नीस तिचा नवरा व्यवहारज्ञानापासून, स्वयंपाकापर्यंत सर्व शिकविण्याचे ठरवतो. आणि तिला इतके तरबेज करतो की, ती शेवटी नर्सिंगचे ज्ञान घेऊन उभी राहते. परशुरामपंतांचा ओढगस्तीचा संसार लीलया आपल्या खांद्यावर तोलून धरते आणि नावारूपालाही आणते.

ही झाली माझ्या पणजीची गोष्ट! याच चरित्रात माझे पणजे परशुरामपंत यांचीही गोष्ट येते. ते शिक्षणात हुशार. काही शिष्यवृत्त्याही त्यांना मिळाल्या. इंग्रजी हस्ताक्षर इतके सुंदर की, सारे चिपळूण त्यांचे हस्ताक्षर पाहून थक्क होत असे. त्यांना रत्नागिरीला पुढील शिक्षणासाठी जायचे असते, मात्र वडील पोराला परवानगीच देत नाहीत. हे वडिलांच्या मागे रोज भुणभुण लावतात, शेवटी वडील इतके मारतात की तो आजारीच पडतो. पण त्याचे शिक्षणाचे वेड संपत नाही. तो धुळ्याला भावाकडे जातो, व अनेक प्रकारचे त्रास सहन करत उत्तम मार्कांनी मॅट्रिक पास होतो. पण पुन्हा पुढच्या शिक्षणाला घरचे सहकार्य मिळतच नाही. मग तो मास्तर होतो. पण या शिक्षणाच्या काळात त्याला वाचनाचे जबरदस्त वेड लागते, ते मरेपर्यंत सुटत नाही. हेच वाचन त्याला उत्तम शिक्षक बनवते.

भुसावळची शाळा त्याच्या येण्याने विस्तारत जाते. मुलांची संख्या वाढते. हा मुख्याध्यापक होतो, साहाय्यक शिक्षक वाढतात. गावात त्याच्या येण्याची/असण्याची चर्चा होते, तोही सक्रिय होतो. इंग्रज दप्तरी अर्ज-विनंत्या करतो. शाळेची स्वतंत्र इमारत उभी राहते, पूर्व-पश्चिम जाण्या-येण्यासाठी पूल असावा म्हणून तो अर्ज-विनंत्या करतो, पूलही बांधला जातो, विद्यार्थी खूश असतात, पालक निर्धास्त होतात आणि शिक्षणव्यवस्था लोकल बोर्डाकडे सोपवली जाते. राजकारणाला रंग चढतो. स्थानिक नेत्यांच्या राजकारणात तो भरडला जातो. शेवटी कंटाळून सोलापूरला बदली स्वीकारतो. मग सोलापूर, नंतर अहमदाबाद व नंतर मुंबईत येतो. मुंबईत यायला व प्लेगची साथ सुरू व्हायला एकच 'गाठ' पडते. तीन मुलांना प्लेगची लागण होते; पण वैद्यकीय ग्रंथांचे वाचन व जवळचे डॉक्टर मित्र यांच्या मदतीने तीनही मुले सुखरूप बाहेर येतात.

'अष्टपुत्रां'चा आशीर्वाद मिळाल्याने लक्ष्मीस एक मुलगी व आठ पुत्र होतात. या आठ मुलांपैकी एक लहानपणीच जातो. आठ मुलांचा संसार एका ३५ रुपयांच्या शिक्षकास कसा करता येणार! ओढग्रस्तीत वाटचाल चालू असतानाही वाचनाचे व्यसन सुटत नाही. शेवटी ते पोलीसखात्यात अध्यापक होऊन निवृत्त होतात.

त्यांच्या या कहाणीत येतो तो त्या त्या काळाचा समाजइतिहास, कुटुंबव्यवस्था, एकत्र कुटुंबाची न टाळता येणारी जबाबदारी, नातेसंबंधांना आलेला व्यावहारिकपणा, आई-मुलांचे संबंध संपत्तीच्या वाटण्या आणि फसवणूक, सोलापूर, भुसावळ, अहमदाबाद येथील जीवन, इतिहास, सामाजिक पद्धती, रीतिरिवाज, परमुलुखातले जीवन, इंग्रज अधिकारी, त्यांचा रुबाब, कामाची पद्धत, कचेरीतील एकमेकांचे हेवेदावे, राग-लोभ, कुरघोडीचे प्रयत्न, चुगल्या, लावालाव्या- अशी अनेक मनोरंजक माहिती वाचताना आपणही स्तिमित होतो.

'मुंबई'चे १८९२ पासून पुढे दहा-बारा वर्षांचे चित्र थक्क करणारे आहे. मुंबईच्या चाळी, चाळींचे जग, त्यातील कुटुंबे, त्यांचे आयुष्य यांचा आलेख परशुरामपंत मांडतात. मुंबईचे रस्ते, गोद्या, दाणेबंदर, बॅकबे, समुद्रकिनारा, मुंबईची देवळे, नव्याने आलेले सायकल नावाचे वाहन, मुंबईच्या शाळा, कारखाने, वस्त्या, प्लेगचे हेल्थ कॅम्प, हाफकीन संस्थेला दिलेली भेट, परळ वर्कशॉपच्या भेटीचा वृत्तान्त, व्ही.जे.टी.आय.ची भेट, लसनिर्मिती, त्याचे प्रयोग, सरकारला केलेल्या सूचना- अशा अनेकानेक नोंदींमुळे आपल्याला मुंबईचा १२ वर्षांचा ताजा इतिहास समजतो. परशुराम हे हाडाचे शिक्षक असल्यामुळे अहमदाबाद, वसई, मुंबईचे प्राचीन, अर्वाचीन इतिहासही ते सांगत राहतात. आणि या सर्वांत केंद्रस्थानी असते पत्नी लक्ष्मीबाई. तिचे मौखिक शिक्षण सुरूच असते. त्या काळात ते बायको-मुलांना घेऊन समुद्रावर फिरायला जातात. मुंबईचा स्वतः तयार केलेला नकाशा घेऊन मुंबईचा

इतिहास आणि इंग्रज सरकार त्या वेळी करीत असलेला मुंबईचा विस्तार कसा आहे, कसा होतोय याची हकिकत सांगतात. हे चित्र तर माझा ठावच घेते! मुलांशी धड बोलायची पद्धत कित्येक घरांत त्या काळी नसताना हे इतके मोकळे कसे वागू शकले?

जी बायको 'हतभागीपणा'चा शिक्का घेऊन वावरली, जिने केवळ नवऱ्याची 'दासी' होणेच गृहीत धरले होते, ती बायको नवऱ्याची 'स्वामिनी' होते हे आपण वाचतो, तेव्हा एका 'पुरुषा'चा झालेला विकास आपण अनुभवत असतो. आणि हेच या चरित्राचे खरे गमक आहे. हतभागी, दासी ते 'स्वामिनी' झालेल्या लक्ष्मीबाईंचे, माझ्या पणजी-आजीचे हे चरित्र मला हेलावून टाकते.

आणखीन एका विशेष गोष्टीने मला खिळवून ठेवले आणि त्या गोष्टीचे माझ्या घराशी, माझ्या वडिलांशी, सख्ख्या काकांशी, चुलत भावांशी अगदी जवळचे नाते आहे ती गोष्ट आहे परशुरामपंतांच्या लेखक असण्याची!

ते लेखक होते. भुसावळमध्ये असताना पुणे, अकोल्याच्या वृत्तपत्रांतून ते लेख लिहीत असत, सभेतून निबंध वाचत असत. अहमदाबादला असताना ठाण्याच्या 'अरुणोदय' पत्रातून त्यांनी क्रमश: तीन पुस्तकांची भाषांतरे केली. शिवाय त्याच पत्रांतून त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांचे चरित्र लिहिले. त्यांपैकी एकही पुस्तकरूपाने प्रकाशित झालेले नाही. मुंबईत असताना त्यांनी राजारामशास्त्री भागवत यांच्या अंकात लिहिले, इतरही अंकांतून लिहिले. त्यांचा वैद्यकीय अभ्यास इतका दांडगा होता की डॉ. गोखले यांच्या अनेक पुस्तकांचे लेखन, भाषांतर, संपादन परशुरामपंतांनी विनामोबदला करून दिले आहे. ना नावाची फिकीर ना प्रसिद्धीची! केवळ ज्ञानावर प्रेम. बस, बाकी काही नाही! शेती, रसायन, विज्ञान, वैद्यक अशा अनेक विषयांत त्यांना कमालीचा रस होता. त्यात त्यांनी लेखन केलंय. पण आज संग्रही काहीही नाही. निवृत्त झाल्यावर त्यांनी अनेक विषयांवर ग्रंथलेखन केले. त्यांपैकी फक्त दोन पुस्तके प्रकाशित झाली. बाकी सर्व हस्तलिखित स्वरूपात पडून होते. त्यांच्या पश्चात त्यांच्या मुलाने ती सर्व बाडे भांडारकर प्राच्यविद्या संस्थेत देऊन ठेवली म्हणून ती किमान शिल्लक राहिली असावीत.

त्यांच्या दोन प्रकाशित पुस्तकांपैकी एका भाषांतरित (उपनिषदपरमामृतम) आणि दुसरे होते 'वेदांच्या काळाचा इतिहास'. या पुस्तकाच्या प्रकाशनार्थ म्हणे, लोकमान्य टिळकांनी त्यांना शिफारसपत्र दिले होते जे पाहून श्रीमंत होळकर संस्थानाने त्यांना पुस्तक छपाईसाठी पैसेही दिले होते. ही दोन प्रकाशित पुस्तकेही पुढच्या पिढीला किती माहीत असतील कोण जाणे! मुळात त्यांनी चरित्र लिहून ठेवलंय हे तरी कुठे घराण्यातील कोणाला ज्ञात होते! मराठी संशोधन मंडळाच्या प्रयत्नांमुळे हे चरित्र तरी प्रकाशात येत आहे.

आमच्या घरात पत्रकारितेचे जे वलय आलंय त्याचं उगमस्थान परशुरामपंतांमध्ये आहे, हे आज माझ्या लक्षात आले आणि ऊर भरून आला. माझ्या पणजीचे हे चरित्र, त्यांचा संसार, पणजोबांचे चरित्र आमच्यासाठी तर बहुमोल ठेवा आहेच; पण सामान्य वाचकांना 'काळाचा इतिहास' म्हणूनही हा ठेवा लाभणार आहे.

यदुनाथ थत्ते यांच्या रक्तात पत्रकारितेचा ऋणानुबंध निर्माण करणारे त्यांचे आजोबा आणि माझे पणजोबा यांना मी मनोमन नमस्कार आणि पणजी-आजीच्या कार्याला सलाम करते. माझ्या पणजोबांची 'साधना' माझ्या वडिलांच्या हातात आली, हे आमच्या घराचे केवढे मोठे भाग्य!

**सुहिता थत्ते,** बांद्रा, मुंबई
Mob.98201 56375

**अलक्ष्यरूप**
लेखक : परशुराम हरी थत्ते
पृष्ठे ४४८ (हार्डबाऊंड)
किंमत ५०० रुपये
(साधना मीडिया सेंटर फोन 020-24459635
येथे हे पुस्तक उपलब्ध आहे.)

शंभर वर्षांपूर्वी लिहून ठेवलेले हे अप्रकाशित चरित्र मुंबईच्या मराठी संशोधन मंडळातर्फे दि.३१ जानेवारी २०२१ रोजी 'अलक्ष्यरूप, सौ. लक्ष्मीबाई व परशुराम थत्ते यांचे चरित्र व संसार' या नावाने त्यांचे नातू भास्कर यशवंत थत्ते, वय वर्षे ९४ यांच्या हस्ते ऑनलाइन प्रकाशित झाले.

# प्रतिसाद

## भक्ष्य तेच राहिले, शिकारी तेवढे बदलले!

साने गुरुजीलिखित 'मानमोडी : १९१८ मधील रोग' हा १२ जूनच्या अंकातील लेख मन विषण्ण करणारा आहे. 'स्पॅनिश फ्लू' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या त्या साथीने भारतातील तत्कालीन लोकसंख्येच्या पाच टक्के माणसांचा बळी घेतला होता, यावरून त्या साथीची भीषणता लक्षात येते. स्पॅनिश फ्लूनंतर शंभर वर्षांनी आलेल्या कोरोना-१९ महामारीने जगातील सर्व देशांना ग्रासून टाकले असून सामाजिक व आरोग्य व्यवस्था, शैक्षणिक व आर्थिक क्षेत्र यांची वाताहत केली आहे. या महामारीने आतापर्यंत आपल्या देशात तीन लाखांहून अधिक जण मृत्युमुखी पडले हे दु:खदायक आहेच; शिवाय विस्कटलेली व्यवस्था भविष्यात कशी व केव्हा पूर्वपदावर येईल ही चिंता आहे. शंभर वर्षांपूर्वी आलेल्या साथीच्या वेळी ब्रिटिशांची सत्ता होती व कोरोना महामारीच्या वेळी आपण लोकशाही पद्धतीने निवडून दिलेल्या पक्षांचे शासन आहे. या पार्श्वभूमीवर शंभर वर्षांत काय बदलले, असा प्रश्न संपादक महाशयांनी त्या लेखाच्या अखेरीस दिलेल्या तळटीपमध्ये विचारलेला आहे.

जवळपास एकशेवीस कोटी लोकसंख्या असलेल्या देशाचा गाडा चालवणे तितके सोपे नाही. शहरांपेक्षा ग्रामीण भागातील आरोग्य व्यवस्था अपुरी असूनही कोरोना महामारीच्या रूपाने देशासमोर उभ्या ठाकलेल्या अक्राळ-विक्राळ संकटाशी आपल्या केंद्र व राज्य शासनांनी समाधानकारक मुकाबला केलेला आहे. तथापि ब्रिटिश राज्यकर्त्यांनी ज्याप्रमाणे भारतातील जनतेला योग्य आरोग्य सेवा पुरवली नाही, तसा प्रकार करोनाच्या दुसऱ्या लाटेच्या दरम्यान आपल्याकडे कसा झाला याची आठवण ताजी आहे. परंतु त्याहीपेक्षा भयंकर प्रकार प्रशासनाकडून झाल्याचे पुढे येत आहे. कोरोना महामारीचा ऐन कहर असताना कुंभमेळ्याचे आयोजन हे संकटाला आमंत्रण देण्यासारखे होते. असे असूनही त्या आयोजनास हरकत असू नये म्हणून, खबरदारीच्या नावाखाली कुंभमेळ्यात सहभागी होणाऱ्यांसाठी कोरोना चाचणीचे आयोजन केल्याचे दाखवले गेले. परंतु आता असे उघडकीस आले आहे की, चारपैकी फक्त एकाचीच चाचणी करून तीन जणांची निगेटिव्ह चाचणी आली असे दाखवले आहे. अर्थातच केलेल्या व न केलेल्या चाचण्यांचे पैसे संस्थेकडून आकारले गेले हे विशेष!

कोरोना चाचणी करून घेतली नाही अशा पंजाबमधील एका युवकाला चाचणी अहवालाची माहिती एस.एम.एस.द्वारे मिळताच त्याने I.C.M.R. कडे तक्रार नोंदवून पाठपुरावा केला. त्यातून स्पष्ट झालेली महिती अजूनही धक्कादायक निघाली. अस्तित्वात नसलेल्या आधार कार्डांची नोंदणी, पन्नास-साठ जणांचे मोबाइल फोन क्रमांक समान असणे, निवासांचे खोटे पत्ते- असले प्रकार चाचणी अहवालात आढळले. त्यापूर्वी बिहारमध्ये प्रतिदिनी चाचण्यांची संख्या अवास्तव वाटली म्हणून चौकशी करण्यात आली; तेव्हा शेकडो जणांनी नोंदणीसाठी दिलेले मोबाईल क्रमांक दुसऱ्या राज्यांतील निघाले व एकच मोबाईल क्रमांक अनेक जणांनी नोंद केलेला दिसला. अधिक खोलात जाऊन पाहिल्यानंतर हजारो चाचण्या बोगस निघाल्या व त्यांचे शुल्क शासनाकडून देण्यात आल्याचे स्पष्ट झाले.

शंभर वर्षांपूर्वी भारतातील जनतेला योग्य आरोग्य सेवा मिळाली नाही. कारण तेव्हाचे शासनकर्ते परकीय होते. परंतु सध्या शासनकर्ते स्वदेशी आहेत. पण झाले काय? भक्ष्य तेच राहिले शिकारी तेवढे बदलले.

**डॉ. श्रीकांत परळकर**, दादर, मुंबई.

## बोलका अभिप्राय, कठोर निश्चयाचे प्रांजळ दर्शन!

जवळपास १४ महिने कोरोना वातावरणात जग केवळ जगण्यासाठी धडपडत आहे. अशा प्रकारच्या टंचाईच्या काळातही 'साधना'चा व्यवहार अव्याहतपणे पूर्वीच्याच ऊर्जेने आणि ताकदीने चालू ठेवला आहे, त्याबद्दल आपले आणि आपल्या सहकाऱ्यांचे कौतुक केलेच पाहिजे.

''साधनाच्या सहा हजार वर्गणीदारांपैकी दोन हजार वर्गणीदारांनी त्या चार महिन्यांतील अंकांची मागणी केली, उर्वरित चार हजार लोकांची वर्गणीची मुदत चार महिने पुढे ढकलली. त्या प्रक्रियेत केवळ सप्टेंबर महिन्यात पाऊण लाख प्रती साधनाने वर्गणीदारांना पोहोचवल्या, अंकांच्या पीडीएफ तर सर्वच वाचकांपर्यंत पोहोचवल्या जात असल्यामुळे वाचकांची वाचनसाखळी तुटली नाही. कठीण काळात अंक वाचकांपर्यंत पोहोचवण्यासाठी साधनाने जाणीवपूर्वक प्रयत्न केल्यामुळे वाचकांनी आपापल्या वर्गणीचे नूतनीकरण करण्यावर भर दिला.'' श्री. राम जगताप यांचा 'अक्षरनामा' या वेबपोर्टलवरील वरील अभिप्राय विलक्षण बोलका आहे.

११ जून दरम्यानच्या अंकातील साने गुरुजींचा मंदिरप्रवेश उपोषणावरील लेख आणि मुलाखत दिशादर्शक आहे, त्यातून गुरुजींच्या कठोर निश्चयाचे, प्रांजळपणाचे दर्शन होते. 'वज्रादपि कठोराणि मृदूनि कुसुमादपि' हेच वर्णन त्यांना लागू पडते.

एका आगळ्यावेगळ्या विषयावरील 'स्त्री मतदान हक्क आंदोलना'ची ओळख करून देणारा स्वरूपा गाडगीळ यांचा लेखही महत्त्वाचा आहे. अमेरिकन महिलांना मतदानाचा हक्क मिळविण्यासाठी किती काळ आंदोलन करावे लागले, किती ऊर्जा खर्च करावी लागली, याचा प्रत्यय या लेखातून येतो.

**डॉ. अनिल केशव खांडेकर**, पुणे

## अनेकांना लिहिते करून फार हाती लागतेच असे नाही!

'अपरिचित सत्यजित राय' विशेषांक वाचला. विजय पाडळकर यांनी अत्यंत सहज व ओघवत्या शैलीत सत्यजित राय यांच्या कार्याचा, कर्तृत्वाचा परिचय करून दिला आहे. सत्यजित राय यांचा सध्याच्या पिढीतील अनेक लोकांना फारसा परिचय नाही. या अंकाने सत्यजित राय यांच्या थोर व्यक्तिमत्त्वाचा चांगला परिचय करून दिला आहे. विजय पाडळकर यांचा या विषयावर खूप अभ्यास आहे. त्यांनी केलेला एकहाती अंक वाचनीय आहे, संग्राह्य आहे.

दि. १२ जूनच्या अंकातील सुषमा दातार यांची त्या अंकासंदर्भात प्रतिक्रिया वाचली. मला वाटते, त्या म्हणतात तसे काही राहिले असेल तर ते राहू देत. कारण हा विशेषांक म्हणजे काही पूर्ण संदर्भग्रंथ नाही किंवा गौरवग्रंथ नाही. सामान्य वाचकांना पाहिजे तेवढे या विशेषांकात आहे, तेवढे पुरेसे आहे. अनेकांना लिहिते करून त्यांच्या वेगवेगळ्या लेखांचे संकलन व संपादन करून प्रत्येक वेळी फारसे काही परिणामकारक वाचकांच्या हाती लागतेच असे नाही. त्यामुळे तुमचा हा एकहाती अंक सिद्ध, प्रसिद्ध करण्याचा निर्णय मला तरी ठीक वाटतो.

**अरुण वि. कुकडे**, नाशिक

## रावसाहेबांची ती मांडणी अतार्किक वाटते!

दि.२९ मे व ५ जून या दोन अंकांतील दत्तप्रसाद दाभोळकर यांनी लिहिलेला रावसाहेब कसबे यांच्या 'गांधी : पराभूत राजकारणी आणि विजयी महात्मा' या पुस्तकाचा परिचय लेख वाचला.

मात्र त्यातून कळलेली 'पुणे करार नव्हे, तर गांधींचा उपवास ही आंबेडकर आणि गांधी यांनी ठरवून खेळलेली खेळी आहे', ही रावसाहेब कसबे यांची मांडणी अतार्किक वाटते. कारण बाबासाहेब आंबेडकर 'जनता पत्रा'तील लेखात म्हणतात, ''आमच्यात तसे काही लोक होते की, त्यांनी गांधींविना या जगात जगणे व्यर्थ आहे असा हट्ट त्यांनी धरला व मला 'पुणे करारा'ला मान्यता द्यावी लागली. त्या वेळेला माझी अशी समजूत झाली की, पुणे करार हा जंटलमन्स ॲग्रिमेंट आहे व काँग्रेस वगैरे सर्व हिंदू लोक स्पृश्यास्पृश्य वाद मिटला आहे, असे समजून या कराराप्रमाणे वागतील व आगामी स्वराज्य हे आपले राज्य आहे असे अस्पृश्यांना वाटण्यासारखी परिस्थिती निर्माण होईल; पण व्यर्थ. निवडणुकीची वेळ आली तेव्हा काँग्रेस आपले खरे स्वरूप प्रकट करू लागली. पुणे कराराने आम्हांला मिळालेल्या पंधरा जागांत लोभाखातर एखाद्या जागेची भर टाकणे दूरच राहो, तर या १५ जागा निष्प्रभ कशा करता येतील ते पाहण्याचा त्यांनी प्रयत्न चालविला. या सर्व जागांकरता अशिक्षित व स्वार्थसाधू असे भाडोत्री गुलाम त्यांनी उभे केले. अशा हेतूने की ते निवडून आल्यानंतर आपल्या ताटाखालची

मांजरे बनावीत. कुठे आपल्या आश्रमातील झाडूवाला तर कुठे कुण्या काँग्रेस पुढाऱ्यांचा बुटलेर, तर कुठे आपला शिपाई- अशी आपली प्यादी उभी करून स्वतंत्रपणे उभे राहिलेले स्वाभिमानी व सुशिक्षित उमेदवार यांचा पाडाव करण्याचा त्यांनी चंग बांधला व आपल्या पैशाच्या जोरावर आपला हेतू तडीस नेला. मिस्टर जीना हे स्वतंत्र मतदारसंघास इतके का कवटाळून बसले आहेत हे यावरून चांगलेच सिद्ध होते. मला विरोधी उमेदवार उभे केले याचा विषाद वाटला नसता. पण नालायक माणसांना हाती धरून त्यांना आमच्या डोक्यावर नाचवायला हे धजावतात म्हणून उद्वेग येतो.''

**संजय लडगे,** बेळगाव

## एक लेख वाचून मनात संदेह, दुसरा लेख वाचून मनात प्रश्न...

शरद जावडेकर यांच्या १९ जून २०२१ च्या 'साधना'च्या अंकांमध्ये भाई वैद्य यांच्याविषयीचा स्मृतिलेख वाचला. त्या लेखामध्ये 'समाजवाद किंवा कल्याणकारी राज्यव्यवस्था,' असा उल्लेख आहे. त्यामुळे माझ्या मनात थोडा संदेह निर्माण झाला आहे. भाई वैद्य यांना समाजवाद म्हणजेच कल्याणकारी राज्यव्यवस्था असे म्हणावयाचे होते का, एक तर 'समाजवाद' नाहीतर 'कल्याणकारी राज्यव्यवस्था' असे (either this or that) म्हणावयाचे होते? दोन्ही समानार्थी, एकाच प्रकारच्या राज्यव्यवस्थेची नावे आहेत का, याबद्दलचा खुलासा समाजवादी म्हणवून घेणाऱ्या विचारवंतांनी केला तर विचारांमध्ये बराच नेमकेपणा येईल. या बाबतीत मतभेददेखील असतील, पण ते सर्वांसमोर मांडले गेले तर बरे होईल. समाजवाद म्हणजे सौम्य भांडवलवादी, समाजकल्याणाला प्राथमिकता देणारी व समाज कल्याणामार्फत संपत्तीच्या वाटपाला मान्यता देणारी लोकशाही व्यवस्था- अशी व्याख्या करता येईल.

त्याच अंकात अरुण डिके यांचा देवजीत सारंगी यांच्यावरील लेख वाचून मनात एक प्रश्न निर्माण झाला. जीएम म्हणजे जनुक बदल केलेल्या बियाण्यांची खरेदी आणि वापर बेकायदेशीर केल्यामुळे शेतकऱ्यांच्या बियाणे निवडण्याच्या स्वातंत्र्यावर बंधन येते, की त्यांचे स्वातंत्र्य वाढते? शेतीविषयक आधुनिक संशोधन विज्ञान व तंत्रज्ञान वापरल्यामुळे अन्नसुरक्षेत भर पडते, की त्या बाबतीत नुकसान होते? सध्याची भारतातील शेतकऱ्यांची गरिबी शेतीमधील अतिरिक्त मनुष्यबळामुळे आहे का? भारतातील एकूण अन्न उत्पादन क्षमता जरुरीपेक्षा जास्त असली तरी प्रतिशेतकरी उत्पादन क्षमता फार कमी आहे का? आदिवासींसाठी स्वायत्त अशी, इतर भारतातील प्रदेशांपासून तुटलेली अशी बेटासारखी, अर्थव्यवस्था व अन्नव्यवस्था असावी काय?

**सुभाष आठले,** कोल्हापूर

## त्याचा पंतप्रधानांनी सकारात्मक विचार करावा

दि. ५ जूनच्या साधना अंकामध्ये देशातील तब्बल ११६ माजी सनदी अधिकाऱ्यांनी कोरोनाच्या पार्श्वभूमीवर आणि विशेषतः दुसऱ्या महाभयंकर लाटेमुळे उदभवलेल्या परिस्थितीबाबत चिंता व्यक्त करणारे आणि काही महत्त्वाच्या सुचना करणारे पत्र पंतप्रधानांना लिहिले ते वाचनात आले. ज्या सनदी अधिकाऱ्यांनी पत्र लिहिलंय ते कोणत्याही राजकीय पक्षांची तळी उचलणारे अधिकारी नाहीत. देशपातळीवर व राज्य पातळीवर विविध विभागांत कामाचा प्रदीर्घ अनुभव असलेले आणि याच देशाचे नागरिक असलेले ते आहेत. त्यांनी केलेल्या सूचना आणि चिंता रास्त असून पक्षीय धोरणापलीकडे जाऊन पंतप्रधानांनी सकारात्मक विचार करून तातडीने पावलं उचलावीत, रंजल्या-गांजल्याना दिलासा द्यावा आणि पक्षीय राजकारणापेक्षा जनकल्याणाच्या राजकारणाचा आदर्श घालून द्यावा.

**नकुल पार्सेकर,** धुळे

## त्यांना प्रेम आहे की आकस?

प्रतिसाद सदरामध्ये दत्ता दामोदर नायक एकीकडे म्हणतात, '...आम्हालाही महाराष्ट्र जिवाभावाचा वाटतो.' आणि दुसरीकडे महाराष्ट्राच्या कथित वसाहतवादाचं तर्कट पुढे रेटतात. यात ढोबळ विसंगती आहे. सार्वमतानंतर गोवा स्वतंत्र राज्य म्हणून अस्तित्वात आला, त्यावर महाराष्ट्राने कोणत्याही प्रकारचा आकस बाळगून कृती केलेली नाही. महाराष्ट्राने गोव्याच्या कलावंतांवर आणि लेखकांवर मनापासून प्रेम केलेलं आहे. त्यामुळे दत्ता नायक यांनी त्यांना महाराष्ट्राबद्दल आणि मराठी भाषेबद्दल प्रेम आहे की आकस आहे हे स्पष्ट करावं.

**सत्यरंजन खरे,** मुंबई



महाराष्ट्र शासन
२६ जून
राजर्षी छत्रपती
शाहू महाराज
जयंती
थोर कल्याणकारी राजाला
मानाचा मुजरा!
उद्धव बाळासाहेब ठाकरे
मुख्यमंत्री
अजित पवार
उपमुख्यमंत्री
बाळासाहेब थोरात
मंत्री, महसूल
www.mahanews.gov.in Follow : /MahaDGIPR Subscribe : MaharashtraDGIPR mahasamvad.in
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन

**Registered** Licence to Post Without Prepayment of Postage No. WPP-6/31-12-2023
एन.डी.नं.आर.एन.आय.१६०१/५७ Postal Regstration No. PCW/080/2021-2023
Posted at PUNE PSO GPO 411001 / Every Monday / Date of Posting: 28-6-2021/ Date of Publication : 28-6-2021

साधना प्रकाशनाची
100
पुस्तके
e-book
स्वरुपात
किंडलवर उपलब्ध

त्यासाठी amazon.in वर चला आणि kindle storeला भेट द्या...!